**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक१३४४ /२००७**

**१) श्री मोहम्मद आरिफ मो. शब्बीर**
**गुजरी बाजार कामठी, ता. कामठी,**
**जिल्हा नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा अति.उप आयुक्त**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर (स्थावर विभाग)**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. व सदरची माहीती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

" (१)नागपूर में कुल कितने सार्वजनिक मैदान (स्थल) नागपूर महानगरपालिका के है। (२) उपरोक्त सार्वजनिक मैदान (स्थल) मे से कितने मैदान (स्थल) ऐसे है की जिसे धर्मिक स्थल बना लिया गया है। (३) इन स्थलों के धार्मिक स्थल बनाने के लिऐ क्या इनको महानगरपालिका ने अनुमती दि है। या महाराष्ट्र सरकार से अनुमती मिली है। उनका आवेदन पत्र व अनुमती की झेरॉक्स मिलने हेतू। (४) सार्वजनिक मैदान (स्थल) को धार्मिक स्थल में परिवर्तन करने का कोई प्रावधान है? तो इस की सरकारी कॅापी मिलने हेतू । ऐसे कितने

मैदान(स्थल) नागपूर महानगर पालिका के रिकार्ड में गैरकानुनी धार्मिक स्थल है इन की यादी मिलने हेतू। "

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

" उपरोक्त विषयाच्या संबंधात संदर्भिय अर्जानुसार खालीलप्रमाणे माहिती पाठविण्यात येत आहे.

मुद्दा क्रं. १ नागपूर महानगरपालिकेला नागपूर सुधार प्रन्यास, हाऊसिंग बोर्ड, नझुल, नगररचना विभागाने मंजूर केलेल्या अभिन्यासातील खुल्या जागा वेळोवेळी हस्तांतरित झालेल्या असून याबाबतची अद्यावत माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. जी माहिती उपलब्ध आहे त्यातील जी माहिती आपणास पाहिजे आहे त्याबाबत निर्धारीत शुल्क जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल.

मुद्दा क्रं. २ याबाबतची माहिती विभागात उपलब्ध नाही.

मुद्दा क्रं.३ सदर मुद्दा नगर रचना विभागाशी संबंधीत असून त्याचे माहिती अधिकारी सहा. संचालक, नगर रचना हे आहेत. तेव्हा याबाबत त्यांच्याकडून माहिती घेता येईल.

मुद्दा क्रं.४ सदर मुद्दा नगर रचना विभागशी संबंधीत असल्यामुळे संबंधीत विभागाचे माहिती अधिकारी यांचेकडून माहिती घेता येईल.

मुद्दा क्रं. ५ याबाबतची माहिती विभागात उपलब्ध नाही. "

४. सदरच्या उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००६ रोजी अपीलीय अधिकारी तथा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.१.२००७ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांनी निर्णय दिलेला असून माहिती प्राप्त झाली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आल्याचे दिसून येते. व त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २४.६.२००६ च्या अर्जामध्ये स्पष्टपणे माहितीचे वर्णन दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००६ रोजी जे उत्तर देण्यात

आलेले आहे ते उत्तर अर्थातच, माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नाही. व त्यामुळे मागीतलेली माहिती उपलब्ध आहे व निर्धारित शुल्क जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल, हे म्हणणे योग्य दिसत नाही. सदरचे पत्रच मुळात विहित मुदतीत नाही व त्यातूनही उपलब्ध असलेल्या माहितीच्या बध्दल शुल्क दिलेले नाही. सोबत अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखाली असल्याचे रेशन कार्ड जोडलेले आहे. याबाबतचा सुध्दा विचार केला गेलेला दिसत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारे मागीतलेल्या माहितीची छाननी केली नाही. दिलेल्या उत्तराच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अवलोकन केलेले दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

६. अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या नागपूर मधील मैदानाच्या संदर्भात संपुर्ण अभिलेखे हे महानगरपालिकाकडे नाही. नागपूर सुधार प्रन्यासकडे काही लेआऊटची माहिती आहे. तसेच हाऊसिंग बोर्ड, नझुल यांचेकडे सुध्दा लेआऊट आहे व त्याची संपुर्ण कागदपत्रे महानगरपालिकाकडे उपलब्ध नाही. व एकत्रित असे अभिलेखे कोणत्याही संस्थेकडे उपलब्ध नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु, नागपूर मधील मैदानाच्या संदर्भामध्ये सर्व्हे करण्यासाठी सुरुवात केलेली आहे व त्यातून काही माहिती त्यांना उपलब्ध होत आहे. परंतु, संपुर्ण मैदानाची माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही. मात्र, त्याकरीता नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, हाऊसिंग बोर्ड, नझुल व नगररचना विभागांची एकत्रित बैठक घेवून जन नागपूर मधील सर्व मैदानाच्या संदर्भामध्ये प्रत्येक संस्थेकडे असलेली माहिती एकत्रित केल्यास संपुर्ण लेआऊटच्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध होऊ शंकतील व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) अन्वये नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, नागपूर, नझुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर व सहाय्यक संचालक, नगर रचना, म.न.पा. नागपूर यांनी एकत्रित येवून सदरची कागदपत्रे महानगरपालिका माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करुन

माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) आयुक्त, महानगरपालिका, नागपूर, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, महाराष्ट्र गृह निर्माण मंडळ, नागपूर, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नागपूर शहरातील मोकळी मैदानांच्या संदर्भात एकत्रित माहिती उपलब्ध करुन देण्याचे करीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपआयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी जन माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका, जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, जन माहिती अधिकारी, हाऊसिंग बोर्ड, जन माहिती अधिकारी, नझुल, जिल्हाधिकारी कार्यालय नझुल विभाग, व जन माहिती अधिकारी ,सहाय्यक संचालक, नगर रचना, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत एकत्रित बैठक घेऊन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.८.२००६ च्या अर्जामध्ये मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्ता यांना सदरच्या बैठकीस उपस्थित राहाण्यास कळवावे.

३) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

४) सदरच्या निर्णयाच्या प्रती आयुक्त, महानगरपालिका, नागपूर, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर, नझुल विभाग, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात याव्यात.

५) सदरच्या अपीलाचा निर्णयानुसार व माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

६) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३४६/२००७**

**१) श्री  हेमंतकुमार श्यामसुंदर साने**
**रा. २ ओंकारनगर, मानेवाडा रिंग रोड,**
**नागपूर.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपवन संरक्षक, वन विभाग, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**वन विभाग, नागपूर (श्याम मुद्रणालयाजवळ),**
**नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. परंतु, " वन विभाग, नागपूर यांचेकडून विचारणा करण्यात आलेली माहिती मला प्राप्त झाली आहे. त्याबाबत मी समाधानी आहे. करीता मी माझे अपील प्रकरण परत घेत आहे, " असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**दिनांक १.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत पुनर्विलोकन अर्ज -**

**पुनर्विलोकन अर्ज क्रमांक ०५/२००८**

**(मुळ अपील क्रमांक८२७/२००७)**

**श्री सुरेश चिंतामन थोरात**
**तहसिलदार अंजनगांव सूर्जी, जि. अमरावती**
**(तत्कालीन जन माहिती अधिकारी अकोट तथा**
**तहसिलदार, अकोट) ... अर्जदार**

**श्री नामदेव रावजी नाथे**
**मु.यात्रा, चौक, पो.ता. आकोट,**
**जि. अकोला ... अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**श्री अशोक अमनकर**
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, अकोट**
**ता. आकोट, जिल्हा अकोला**

**श्रीमती कल्पना दत्तात्रय ढवळे**
**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार, अकोट, जि.अकोला**
**... उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अर्जदार यांनी दिनांक ४.३.२००८ रोजी अपील क्रमांक ८२७/२००७ मधील आयोगाच्या निर्णयातील आदेश क्रमांक १ च्या संदर्भात दिलेल्या शास्तीचे संदर्भामध्ये पुर्नविलोकन करण्यासाठी अर्ज दिलेला आहे. सदरच्या अर्जाची सुनावणी आज घेण्यात आली. अर्जदार हजर आहे. अर्जदाराचे तर्फे ॲड.श्री राजेंद्र पांडे हे हजन असून त्यांनी युक्तिवाद केला.

२. ॲड.श्री राजेंद्र पांडे यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार यांनी अपील क्रमांक ८२७/२००७ मधील अपीलकर्ता यांचा दिनांक २०.१२.२००५ चा अर्ज आल्यानंतर दिनांक २९.१२.२००५ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, अकोट यांना अपीलकर्त्यांच्या दिनांक ११.६.२००५ च्या अर्जाचा संदर्भ देवून संदर्भिय पत्रानुसार आपणास विषयांकित अतिक्रमण हटविण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु आपणाकडून काहीही कार्यवाही झालेली नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता अर्जदार यांनी अतिक्रमण का हटविण्यात आले नाही याबाबत माहिती

अधिकाराच्या अंतर्गत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. सदरच्या अर्जाची छायांकित प्रत संलग्न करुन आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सदर अर्जाचे अवलोकन करुन महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम, १९६५ चे तरतूदीनुसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अवगत करावा व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता अर्जदार श्री नाथे यांना पाठविलेली दिसून येते. व त्यावरुन ॲड. राजेंद्र पांडे यांचे म्हणणे असे आहे की, अतिक्रमण काढण्याची जबाबदारी ही नगरपरिषदेची असल्यामुळे संबंधीताचा अर्ज हा मुख्याधिकारी, नगरपरिषद यांचेकडे हस्तांतरण केलेला आहे. व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे जर माहिती अर्ज केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल व ती दूस-या अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल तर अर्जाचे हस्तांतरण करणे आवश्यक असते व त्याप्रमाणेच अर्जाचे हस्तांतरण केलेले आहे. व तसे अपीलकर्ता अर्जदार यांना सुध्दा कळविलेले होते. व त्यामुळे सदरच्या अर्जाचे हस्तांतरण हे विहित मुदतीत केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे विरुध्द विभागीय चौकशीचा जो आदेश दिलेला आहे त्याचा पुर्नविचार होऊन अर्जदार यांना निर्दोष जाहिर करावे, अशी विनंती.

३. असे असले तरी आयोगाच्या निर्णयामध्ये अपीलकर्त्याचे जे प्रश्न आहे त्या प्रश्नांच्या संदर्भात संबंधीत तहसिलदार यांनी सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याच्या संदर्भामध्ये निर्णय द्यावयास पाहिजे होता. नगरपरिषदेच्या हद्यीतील नझुल प्लॉटावरील अतिक्रमण असल्यामुळे सदरच्या अतिक्रमणाच्या संदर्भामध्ये संबंधीत तहसिलदार यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. व यावरुन अर्ज हस्तांतरण हे योग्य रितीने केलेले असल्यामुळे व तसे अपीलकर्ता यांना सुध्दा कळविलेले नसल्यामुळे संबंधीत माहिती अधिकारी तथा तहसिलदार हे दोषी आढळून येतात असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. सदरचा आदेश हा नगर परिषदेच्या हद्यीतील नझुल प्लॉटावरील अतिक्रमण असल्यामुळे सदरच्या अतिक्रमणाच्या संदर्भामध्ये संबंधीत तहसिलदार यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. यावरुच सदरचा निर्णय दिलेला आहे. परंतु, याबाबत अपीलकर्ता यांचे वकील यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा नझुल प्लॉट हा नगरपरिषदेच्या हद्यीत असल्यामुळे मुख्याधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे व म्हणूनच सदरचा अर्ज हा मुख्याधिकारी यांचेकडे हस्तांतरण

करण्यात आलेला होता. परंतु याबाबत एक निश्चित असे आहे की, नगरपरिषदेच्या हद्दीतील नझुलचा प्लॉट जर असेल तर त्याबाबत त्यावरील अतिक्रमण हटविण्याच्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी हे नेहमीच महसुलच्या अधिका-यांकडे अंगुली निर्देश करतात व त्यामुळे अशा परिस्थिती मध्ये जी व्यथित व्यक्ती असते त्यांना कोणताही मार्ग राहात नाही. तहसिलदार यांनी मुख्याधिकारी यांचेकडे बोट दाखववावयाचे व मुख्याधिकारी यांनी तहसिलदार यांचेकडे बोट दाखववावयाचे व त्यातून कोणताही निर्णय व्हावयाचा नाही अशा परिस्थितीत ही व्यथित व्यक्ती असते व त्यामुळेच सदरच्या अर्जाच्या बाबत सखोल चौकशी करुन मगच निर्णय द्यावयास पाहिजे होता असा निष्कर्ष काढलेला आहे. अजूनही सदरच्या प्लॉटच्या संदर्भामध्ये अतिक्रमण कोणी काढावयाचे हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा त्यांच्या अपीलामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्तर मिळाले नाही असे म्हणतात व त्यामुळे हा प्रश्न अनुत्तरीत राहातो.

४. रिट पिटीशन नंबर १८५८/०२ मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, नागपूरच्या निर्णयाचे जर अवलोकन केले तर सुध्दा सदरच्या रिट पिटीशनमध्ये रिस्पॉन्डंट म्हणून तहसिलदार आकोट, सब डिव्हीजनल ऑफिसर, नझुल ऑफिसर, अकोट, जिल्हाधिकारी, अकोला व विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती असे आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता ंश्री नाथे यांनी माहितीचा अर्ज हा तहसिलदार यांचेकडेच केलेला दिसून येतो. अर्जदार यांच्या वकीलाचे म्हणणे असे आहे की, अंतिमतः अतिक्रमण काढणे ही जबाबदारी तहसिलदार यांची आहे किंवा मुख्याधिकारी यांची आहे. हा प्रश्न माहितीच्या अधिकाराच्या तरतूदीच्या अंतर्गत येत नाही. परंतु, माहितीचा अर्ज आल्यानंतर तत्कालीन जन माहित अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हे महत्वाचे आहे. व त्याचा विचार केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी विहित मुदतीत तो हस्तांतरण केलेलो दिसून येतो. अंतिमतः अतिक्रमण काढण्याची जबाबदारी जर तहसिलदार यांची असेल तर त्याकरीता त्यांनी तहसिलदार यांच्या विरुध्द मा. न्यायालयात अवमान अर्ज करावयास पाहिजे. व त्यामुळे माहितीच्या अधिकारामध्ये ही बाब येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे सुनावणीच्या दिवशी सुध्दा विद्यमान माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना अर्जदाराच्या दिनांक २०.१२.२००५ च्या अर्जानुसार मुख्याधिकारी यांना अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात मुदतीच्या आंत कळविण्यात आलेले आहे. तसेच अर्जदारास

सुध्दा मुदतीच्या आंत कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे अर्ज नस्तीबध्द करावा ही विनंती, असे दाखल केलेले दिसून येते.

५. वरील युक्तिवादावरुन अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही केलेली आहे असा निष्कर्ष काढल्यास निर्णयातील आदेश क्रमांक १ च्या बाबत पुर्नविचार करुन तत्कालीन माहिती अधिकारी यांना निर्दोष कारणे हे क्रमप्राप्त आहे. व त्याकरीता पुनर्विलोकन अर्ज हा मान्य करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अर्जदार यांचा पुर्नविलोकन अर्ज हा मान्य करण्यात येत असून अपील क्रमांक ८२७/२००७ च्या निर्णयामधील आदेश क्रमांक १ हा रद्द करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, अकोला यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अर्जदार यांना निर्णयाची एक प्रत पाठविण्यात यावी.

**दिनांक १.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**१) अपील क्रमांक१२२९ /२००७**
**२) अपील क्रमांक१२३० /२००७**

**१) अपील क्रमांक१२२९ /२००७**

१) श्री जयवंत मधुकर मिश्रा
रा.प्लॅाट नं.१६, जवाहर कालोनी, पुलगांव
पो.पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. .. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, वर्धा. ता.जि.वर्धा.

३) जन माहिती अधिकारी
माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, वर्धा
ता.जिल्हा वर्धा. .. उत्तरवादी

**२) अपील क्रमांक१२३० /२००७**

१) श्री जयवंत मधुकर मिश्रा
रा.प्लॅाट नं.१६, जवाहर कालोनी, पुलगांव
पो.पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. .. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, वर्धा. ता.जि.वर्धा.

३) जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, वर्धा
ता.जिल्हा वर्धा. .. उत्तरवादी

**( आदेश पारित दिनांक २.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

**अपील क्रमांक १२२९** - अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १२२९ /२००७ मध्ये दिनांक "११.८.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून शालांत परीक्षेत नापास विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेशाबाबत माझे दिनांक २५.५.२००४ चे तक्रारीवर मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांचे पत्र क्रमांक नाविमं/गोप/संकिर्ण/४०३/दिनांक १.६.२००४ वर केलेल्या चौकशी अहवालाची माहिती मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी सन २००४. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार " असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २१.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी पूर्वी केलेल्या ५ माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील केलेले दिसून येते. व त्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून व्दितीय अपील केलेले दिसून येते. सदरच्या व्दितीय अपीलात सुध्दा ४ माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून कारणे दिलेली दिसून येते. व तेही वेगळया सार्वजनिक प्राधिकरणाच्या संदर्भात आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कलम ६ प्रमाणे एक अर्ज त्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नसेल तर कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील अशी तरतूद असतांना अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलातच माहितीच्या ५ अर्जाच्या संदर्भामध्ये उल्लेख करुन प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचे प्रथम अपील दाखल करण्याकरीता सकृत दर्शनी मुदतीच्या संदर्भामध्ये परिगणना करणे शक्य नाही. कारण माहितीचा अर्ज ज्या तारखेस केलेला असतो त्या तारखेपासून ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर पुढील ३० दिवसांत प्रथम अपील दाखल करावयाचे असते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ११.८.२००६, २९.३.२००६, ५.९.२००६, १३.१०.२०६ व १२.९.२००६ अशा अर्जांचा उल्लेख असल्यामुळे प्रत्येक अर्जाचे संदर्भामध्ये प्रथम अपील दाखल करण्याची मुदत वेगवेगळी येणार व त्यामुळे प्रथम अपील हे मुदतीत आहे किंवा नाही हा निर्णय देता येणे शक्य नाही. तसेच व्दितीय अपीलाच्या संदर्भात सुध्दा अनेक अर्जांचा उल्लेख केलेला असून न्याय

मागीतला असल्याने द्वितीय अपील हे प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द ९० दिवसांत दाखल करावयास पाहिजे असते. व त्यामुळे त्याहीबाबत आदेशाची परिगणना करता येत नाही व सकृत दर्शनीच सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. वेगवेगळया प्रकारची माहिती ही अनेक अर्जांनी मागून त्याविरुध्द एकच अपील व एकच द्वितीय अपलामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात अपीलीय अधिकारी यांना निर्णय देणे शक्य नाही.

**<u>अपील क्रमांक १२३०/२००७</u>** : अपील क्रमांक १२३०/२००७ मध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ५.९.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. व त्या अर्जाच्या संदर्भात सुध्दा द्वितीय अपील क्रमांक १२२९/२००७ मध्ये अपीलात सुध्दा उल्लेख केलेला आहे. व त्यामुळे एकाच अर्जाच्या संदर्भात दोन द्वितीय अपीले हे सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नाही. अधिनियमाच्या तरतूदी हया सार्वजनिक प्राधिकरणाला ज्याप्रमाणे लागू आहेत त्याचप्रमाणे त्या अर्जदार किंवा अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहेत. अर्जदारानी सुध्दा कायद्याचा आधार घेतल्यानंतर कायद्याच्या सर्व तरतूदीप्रमाणे अर्ज व प्रथम अपील, द्वितीय अपील हे सादर केले पाहिजे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी त्यांच्या आज सादर केलेल्या खुलाशामध्ये जर माहिती उशिरा मिळाली, विलंबाने मिळाली व त्याकरीता दंड करावा अशी विनंती केली आहे, त्याबाबत विचार करता येत नाही.

४. अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे अर्जात नमूद केलेले असल्यामुळे ३० दिवसांत त्यांनी व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावयास माहिती अधिकारी यांचेकडे हजर झाले पाहिजे. माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), वर्धा यांनी सदरची माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः मागीतलेली होती. माहिती घेण्याकरीता संबंधीत कधीही कार्यालयात आलेले नाही. उलट माहिती अधिकारी यांचेकडे अपील दाखल केली. सदर अपीलाच्या अर्जावर दिनांक १९.१.२००७ ला सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत दिलेल्या सूचनेप्रमाणे उपलब्ध माहिती देण्यात आली. श्री मिश्रा, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, नगरपरिषद, पुलगांव यांनी मा. लोक आयुक्त न्यायालयीन प्रकरणी माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मागणे अशा प्रकारचा त्यांचा छंद असून अनावश्यक प्रकरणे निर्माण करीत असतात. श्री मिश्रा हे शासकिय कर्मचारी नाही. ते नगरपरिषदेचे कर्मचारी आहे.

व नगर परिषदेच्या स्तरावर केलेल्या कार्यवाहीची कोणत्याही प्रकारची माहिती या कार्यालयाकडे नसते. त्यामुळे प्रथमतः माहिती अधिकाराअंतर्गत माहिती त्यांनी नगरपरिषदेला मागणे क्रमप्राप्त आहे. तरी देखील आवश्यक ती कार्यवाही श्री मिश्रा यांचे प्रकरणात विहित मुदतीत करण्यात आलेली आहे. व त्यांना माहिती प्राप्त व्हावी या उद्येशाने मुख्याध्यापक यांना सूचना देवून उपलब्ध करुन दिलेली आहे. व या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहिती संबंधीत या कार्यालयात उपलब्ध न झाल्यामुळे देता येत नाही. व सुनावणीच्या दिवशीच दिलेली आहे., असा खुलासा दाखल केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तोंडी असे सांगीतले की, अपीलकर्ता यांनी आतापर्यंत १० माहितीचे अर्ज केलेले आहेत. व यावरुन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) यांनी केलेल्या खुलाशास पुष्टी मिळते. अधिनियमाचा प्रमुख उद्येश असा आहे की, माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीने मागणे आवश्यक आहे.परंतु अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही स्वहिताच्या करीता मागीतलेली असून इतरही माहितीचे अर्ज दाखल केलले दिसून येतात व त्यामुळे व एकाच अपीलामध्ये अनेक अर्जांचा उल्लेख करण्याच्या वरुन सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२२९/२००७ व १२३०/२००७ हे अनेक अर्जाच्या निर्णया संदर्भामध्य एक द्वितीय अपील हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसल्यामुळे खारीज करण्यांत येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२३४/२००७**

**१) श्री गजानन प्रल्हादराव तेलगोटे,**
**मु.पो. सोमवार वेस, आकोट**
**ता.आकोट, जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अकोला**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**समाज कल्याण अधिकारी (गट-अ)**
**जिल्हा परिषद, अकोला, ता.जि.अकोला**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये दिनांक २.५.२००६ रोजी अपील अर्जाची दखल घेतली नाही. माहिती करीता दिनांक २१.३.२००६ रोजी अर्जाची दखल घेतली नाही. कोर्ट फी स्टॉम्प, मुद्रांक शुल्क लावलेले नाही म्हणून पुरविता येत नाही असे स्मरणपत्र देवून सुध्दा दखल घेतली नाही. माहिती पुरविणे हेतुपुरस्पर टाळाटाळ व दिशाभूल केली व त्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे. व माहिती उपलब्ध करुन देवून दंड करण्याची विनंती केलेली आहे.

३.    अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००६ रोजी कार्यालयात प्राप्त दिनांक २१.३.२००६, शासकिय माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" सर्वच वयाचे अपंग व्यक्ती शिक्षीत/अशिक्षीत अपंगाकरीता असलेल्या शासनाचे सर्व योजना बध्दल माहिती योजनेच्या लाभ घेणे करीता पात्रता वय अर्ज कोठे करावा, त्यासोबत कुठले कागदपत्रे जोडावी. इत्यादि माहिती तसेच (अपंग व्यक्ती कायदा १९९५) या कायद्याचे प्रत्येक पानाची प्रत पूरविण्यात यावी. तसेच समाज कल्याण मार्फत अनुसूचित जाती करीता कुठल्या योजना राबविल्या जातात त्याची संपूर्ण माहिती योजनेचे नांव, वय, शिक्षण, पात्रता अर्ज कोठे करावा, त्यासोबत लागणारी कागदपत्रे लाभाचा प्रकार, वस्तु/रोख रक्कम इत्यादिचे विवरण इत्यादि सर्व माहिती पुराव्यासह, कागदपत्रासह देण्यात यावी, ही नम्र विनंती. तसेच जि.प. अकोला येथे सर्वच खात्यांत रिक्त असलेल्या पदासंबंधीची माहिती पदनाम, शैक्षणिक पात्रता, अनुभव, पदसंख्या, आरक्षण, पद भरण्याची विधी, उपविधी, भरती मोहीमेचा कालावधी, विभागाचे नांव, इत्यादि संपुर्ण माहिती कागदपत्र पुराव्यासह पुरविण्यात यावी, ही नम्र विनंती."

सदरच्या माहितीचा कालावधी १९९५-२००६ पर्यंत असून पोस्टाद्वारे माहिती घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५.४.२००६ रोजी आवश्यक मुद्रांक शुल्कासह सादर करुन आपण व्यक्तीशः संबंधीतच माहिती मागणे आवश्यक आहे. सबब आपण तसा अर्ज केला नसल्यामुळे सदरची माहिती आपणास देता येणे शक्य नाही. करीता आपणास कळविण्यात येत आहे. सदरच्या उत्तरामुळे व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००६ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी/वरिष्ठ समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलामध्ये दारिद्रय रेषेच्या कार्डाची सत्यप्रत जोडलेली असून सुध्दा त्याची काहीच दखल घेतली नसुन कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नाही म्हणून माहिती देता येत नाही असे दिनांक १५.४.२००६ च्या पत्राने कळविले. माहिती देण्यास कसूर केला असे कारण दिलेले आहे. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. सदरच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.३.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा समाज कल्याण अधिकारी गट-अ , जिल्हा परिषद, अकोला यांनी केलेला आहे.

" अपीलकर्ता अर्जदार श्री गजानन प्रल्हादराव तेलगोटे यांनी दिनांक २१.३.२००६ रोजी जो अर्ज केला होता त्यास कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नसल्याने सदर अर्जदारास या कार्यालयाचे पत्र जावक क्रमांक ३४८, अकोला दिनांक १५.४.२००६ अन्वये तसे कळविण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने दिनांक २.५.२००६ रोजी पुनश्च अर्ज सादर केला. त्यासंदर्भात दारिद्रय रेषेचे कार्ड जोडले. मध्यंतरीच्या काळात प्रकरणामध्ये असलेले सहाय्यक माहिती अधिकारी दिनांक ७.५.२००६ रोजी मृत्यू पावल्यामुळे दिनांक २.५.२००६ च्या अपील अजा्रवर कार्यवाही होऊ शकली नाही. परंतु, मध्यंतरीच्या काळात श्री गजानन प्रल्हादराव तेलगोटे यांनी पुन्हा माहितीच्या अधिकारात दिनांक २३.४.२००७ रोजी अर्ज व दिनांक ११.६.२००७ मधील अपील अर्ज सादर केला होता. या प्रकरणामध्ये संबंधीतास सर्व योजनांची माहिती पोस्टने दिलेली असून त्यामध्ये अपंगाकरीता राबविण्यात येणा-या योजनांच्या माहितीचा समावेश आहे. तरी देखील श्री तेलगोटे, अर्जदार यांनी अपंग कायद्याची इतर त्यांनी मागीतलेली माहिती तयार करण्यात आली आहे. "

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००६ च्या अर्जामध्ये दारिद्रय रेषेखाली आहे काय? होय. असे म्हटलेले आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे. परंतु, दिनांक १५.४.२००६ च्या उत्तराप्रमाणे दारिद्रय रेषेखालील कार्डाच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडलेली नव्हती असे उत्तरवादी यांनी सांगीतले. व त्यासंदर्भात अपीलकर्ता यांनी सुध्दा खुलासा केलेला नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जो खुलासा सादर केला आहे तो समाधानकारक नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: प्रथम अपीलाची सुनावणी धेणे आवश्यक असते व त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत जे अपील दाखल झाले असते त्या अपीलाच्या संदर्भामध्ये स्वत: दक्ष राहाणे आवश्यक असते. सहाय्यक माहिती अधिकारी यांचेवर अवलंबून राहिल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे. व त्यामुळे त्यांना

सक्त ताकिद देणे आवश्यक आहे. मात्र, अपलकर्ता यांनी वेगवेगळे अर्जाच्या माध्यमातून माहिती मागीतलेली असल्यामुळे व त्यांना ती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे सकृद दर्शनीच खारीज करण्यास पात्र दिसते. परंतु ज्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे त्या अर्जाच्या संदर्भामध्ये चौकशी होणे आवश्यक आहे. व त्यासंदर्भात सुध्दा माहिती अधिकारी व प्रथम अपलीय अधिकारी हे दोषी आढळून येतात. व तसेच अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात यत आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. सदरचा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अर्जात मागीतलेली माहिती विनामुल्य साध्या पोस्टाने अपीलकर्त्यास पाठविण्यात यावी व जावक नोंदवहीमध्ये त्याबाबतची नोंद ठेवावी.

२) सदरच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७०२ /२००७**

**१) श्री अशोक शंकरराव मेंढे**
**रा.चंद्रमणी बौध्द पाली विहाराजवळ,**
**बुध्दनगर, डॉ. आंबेटकर मार्ग, नागपूर-४४००१७**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर विभाग,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय,**
**नागपूर विभाग, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००६ रोजी श्री वि.ग. खांडरे, प्रमुख लिपिक यांच्या जाती प्रमाणपत्र व पदोन्नती संदर्भात आबस ने केलेली दिनांक १४.६.२००६ ची तक्रार, दिनांक १४.६.२००६ ते २६.९.२००६ श्री वि.ग. खांडरे प्रमुख लिपिक यांच्या जाती प्रमाणपत्र व त्या आधारे त्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने श्री विजय भैसारे, सहसंयोजक, आरक्षण बचाव समिती यांनी मा. परशुरामजी राठोड, उपसंचालक,भूमी अभिलेख, नागपूर विभाग, नागपूर यांना पोच देय नोंदणी डाकेने सादर केलेल्या तक्रारी संदर्भात झालेली कारवाई. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार तसेच पोच देय नोंदणी डाकेने घेणार असे दोनही पर्याय अर्जदाराने दिलेले दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली

नाही म्हणून दिनांक १७.११.२००६ रोजी प्रथम अपील पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडेच दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.२.२००७ रोजी दिलेला असून याबाबतची संबंधीत माहिती अपीलार्थी यांना दिनांक २७.२.२००६, २४.४.२००६, ३०.५.२००६ रोजी उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांचे कार्यालयाकडून पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना सदर अपीलाद्वारे आवश्यक असलेली माहिती पुन्हा पुन्हा पुरविण्याचे औचित्य दिसून येत नाही. तरी सुध्दा अपीलार्थी यांना मागीतलेल्या माहितीची आवश्यकता असल्यास संबंधीत कार्यालयात संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलार्थी यांनी दाखल केलेले सदर अपील मंजूर करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही, या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००६ रोजी आबसनी केलेल्या दिनांक १४.६.२००६ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. परंतु, अधिनियमाचे कलम ७ (१) प्रमाो ३० दिवसांत म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सदरच्या अपीलाची सुनावणी ही विहित मुदतीत न घेतल्यामुळे त्यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा दिनांक २८.९.२००६ च्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख न करता अपीलकर्ता यांना पूर्वी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. याचा अर्थ जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा दिनांक २८.९.२००६ चा अर्ज हा वाचलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता अर्जदार यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कितीही अर्ज केले असले तरी त्या अर्जाचे स्वतंत्रपणे विहित मुदतीत उत्तर देणे किंवा माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते व त्यामुळे पुर्वी काय माहिती उपलब्ध करुन दिली होती हा संदर्भ देता येणार नाही. व तक्रार दिनांक १४.६.२००६ रोजी केलेली असल्यामुळे त्या दिलेल्या तक्रारीवर केलेली कार्यवाही

विचारलेली होती. दिनांक २७.२.२००६, २४.४.२००६ व ३०.५.२००६ रोजी जी माहिती पुरविण्यात आलेली होती असे म्हटले आहे, ती अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात नाही. व त्याही बाबतीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची काळजी/दक्षता घेतलेली दिसून येत नाही. किंवा स्वत: कोणतेही आकलन करुन घेतलेले नाही. त्यामुळे त्यांनी सुध्दा वर म्हटल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे व त्याकरीता त्यांना सक्त ताकिद देणे आवश्यक ठरते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना आबस यांनी केलेल्या दिनांक १४.६.२००६ च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहितीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचे दिनांक २८.९.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७ (१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे व त्यांची बदली झालेली असल्याने त्यांचे म्हणणे एकुण घेता येत नसल्यामुळेपोटकलम (२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शास्तीची शिफारस त्यांचे विरुध्द करण्यांत येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत उप संचालक, भूमी अभिलेख, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक ३.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३७५/२००७**

**१) श्रीमती मंजूळाबाई कोंडूजी उके**
**रा. श्री साईकुंज मंगल पांडे वार्ड, भंडारा-४४१९०४**
**ता.जि. भंडारा**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**जिल्हाधिकारी, भंडारा**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुध्याधिकारी,**
**नगर परिषद, (बांधकाम विभाग), भंडारा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ४.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले नाही. माहिती अधिकारी हे विनाअनुमतीने गैरहजर असून त्यांच्या वतीने कनिष्ठ अभियंता यांना पाठविले आहेत. यावरुन माहिती अधिकारी, नगर परिषद यांना अधिनियमाचे कलम २० ची माहिती दिसत नाही. ती त्यांनी लवकरात लवकर करुन घेतल्यास पुढे त्यांना अडचणीना तोंड द्यावे लागणार नाही.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००६ रोजी १) सार्वजनिक विहिरीवरील तसेच सार्वजनिक नालीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत केलेली कार्यवाही. २) दिनांक १०.२.२००५ रोजी आपणाकडून करण्यात आलेली मोका पाहाणी अहवालाबाबतची माहिती. ३) पाणी भरण्यास अडचण निर्माण झाली त्या (मुकरर केलेल्या) रस्त्याबाबत अधिकार अभिलेख व नकाशा प्रत. ३) अतिक्रमीत जागेचे केलेल्या मोजमाप बाबत नकाशा व अहवाल. ४) बांधकाम तोडण्याचे वेळी करण्यात आलेला पंचनामा. ५) सार्वजनिक विहिरीचे जागेवर असलेले

अतिक्रमणाबाबत माहिती. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन माहीती मागीतलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकउे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर दिनांक १५.९.२००६ रोजी माहिती प्राप्त करुन घेतलेली दिसून येते. व सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे व विलंबामुळे व्यथित झाल्यामुळे दिनांक ९.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता हे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता व्यक्तीशः ३० दिवसा पर्यंत माहिती अधिकारी यांचे कार्यालयात गेले होते किंवा नाही याबाबत कोणत्याही प्रकारचा पुरावा हा दाखल केलेला नाही. तसेच मुलगा श्री माधव उके हे आज सुनावणीस हजर आहेत. त्यांनी तोंडी असे सांगीतले की, माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता ते वारंवार माहिती अधिकारी यांचे कार्यालयात गेले होते. परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र, वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी कोणत्याही प्रकारचा लेखी पुरावा सादर केला नाही. माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घेणार असे नमूद केल्यावर जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारे अर्जदाराची वाट पाहाणे किंवा घरी माहिती आणून देणे किंवा अर्जदारास बोलाविणे हे अपेक्षित नाही.

५. त्यानंतर दिनांक ३.६.२००६ रोजी मुख्याधिकारी यांनी अपीलकर्ता यांना "आपल्या मागणीप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती तयार करण्यात आलेली असून आपण नगरपालिका फंडात श्री राजेश परमार (नक्कल लिपिक), नगर परिषद, भंडारा यांचेकडे २/- रुपये जमा करुन पावती प्राप्त करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी," असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००६ रोजी रुपये २/- चा भरणा केलेला दिसून येतो. मात्र, माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. मात्र, जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दाखल केलेल्या दिनांक ३.६.२००६ च्या अर्जावर माहिती प्राप्त दिनांक १५.९.२००६,

मा.जिल्हाधिकारी भंडारा यांचे समक्ष व नांव, निशाणी अंगुठा असे दिसते. यावरुन दिनांक ३.६.२००६ रोजी माहिती उपलब्ध होती, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

६. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी, भंडारा यांनी सुनावणी घेतलेली आहे. व त्याप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक १५.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जिल्हाधिकारी यांचेकडे सुनावणी घेताना मुख्याधिकारी, नगर परिषद, भंडारा यांनी श्रीमती मंजूळाबाई कोंडूजी उके यांनी दिनांक २५.४.२००६ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला होता. त्यानुषंगाने नगरपरिषद कार्यालयाचे पत्र क्रमांक दिनांक ३.६.२००६ अन्वये त्यांना आवश्यक शुल्क जमा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००६ ला आवश्यक शुल्क जमा केले. परंतु शुल्क जमा करताना कार्यालयाच्या संबंधीत कर्मचा-याकडून माहिती प्राप्त करुन ध्यावयाची होती. परंतु अपीलकर्ता यांनी त्याच दिवशी कार्यालयीन संबंधीत कर्मचारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन न घेता सरसकट निघून गेले व या कालावधीत या कार्यालयाशी स्वतः (व्यक्तीशः) कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही. व या कार्यालयाच्या कर्मचा-यांनी स्वतः त्यांच्या घरी साईकुंज मंगल पांडे वार्ड, भंडारा येथे कर्मचारी गेले असता "माझा मुलगा घरी नाही "असे सांगीतले. पुनश्च माहिती घेण्याकरीता गेले असता "आजुबाजुचे नागरिकांचे अतीक्रमण आहे, असेच लिहून घ्यावे" या आधारावर माहिती प्राप्त करुन घेण्यास इन्कार केला. त्यामुळे नगर परिषदेचा पुर्ण त्यांना माहिती केले होते. तथापि अपीलकर्त्यांनी या कार्यालयाशी केलेल्या अर्जानुसार माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा नगर परिषदेचा उद्येश नाही. त्यामुळे न.प. सादर केलेल्या माहितीचे अहवालावर सहानुभूतीपुर्वक विचार करुन अपील खारीज करण्यात यावी," ही विनंती. अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे माहिती दिली आहे असे दिनांक २९.८.२००६ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अर्जदार यांनी उपलब्ध झालेली माहिती ही चुकीची, अपूरी, खोटी, खाडाखोड केलेली माहिती अर्जदार व अपीलीय अधिकारी यांना उपलब्ध करुन देवून अर्जदार व अपीलीय अधिकारी यांची दिशाभूल केली आहे असा अर्ज दिनांक १०.१०.२००६ रोजी सादर करुन मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. त्याचप्रमाणे दिनांक १.११.२००६ रोजी सुध्दा अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचेकडे

उपलब्ध झालेल्या माहिती बध्दल तक्रार केलेली दिसून येते. अपीलाचा निर्णय मुदतीत दिला नाही असेही तक्रारीत नमूद केलेले दिसून येते व त्या प्रकारचा खुलासा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९.१२.२००६ रोजी केलेला आहे. सदरच्या खुलाशाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही खुलासा केलेला नाही. मात्र, माहिती दिनांक ६.६.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली असा दिनांक २.४.२००८ रोजी खुलासा केलेला दिसून येते.

७. वरील सर्व वस्तुस्थितीवरुन एक बाब स्पष्ट आहे की, अपीलकर्ता हे ३० दिवसामध्ये व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता गेलेले नाही हा निष्कर्ष काढण्यात येतो. मात्र, त्यानतर जी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये प्रक्रिया झाली त्या प्रक्रियाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देताना अर्जामध्ये खोडताड मात्र दिसून येते व त्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये किंवा अर्जाच्या संदर्भामध्ये जी खोडताड झालेली दिसून येते त्या संदर्भात चौकशी होणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपील ३० दिवसांत दाखल करावयास पाहिजे होते परंतु, दिनांक १४.८.२००६ रोजी दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील सुध्दा मुदती बाहेर होते. परंतु, त्याबाबतचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला दिसून येत नाही.

८. माहिती अपूरी, दिशाभूल करणारी व खोटी दिली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे त्याबाबत अपीलकर्ता यांनी माहिती कशाप्रकारे चुकीची, अपूरी, खोटी व खाडाखोड केलेली आहे याबाबत स्पष्टीकरण आयोगाला दिलेले नाही. व त्याबाबत आयोग निर्णय देवू शकत नाही. मागीतलेल्या माहितीपेक्षा माहिती खोटी आहे हे सिध्द करुन द्यावे लागते. असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये एकुणच जी खोडतोड झालेली आहे त्या खोडतोडीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी चौकशी करणे आवश्यक ठरेल व तशा प्रकारची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर

कार्यवाही करणे आवश्यक राहील. परंतु, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देताना जी पत्राच्या संदर्भामध्ये खोडताड झालेली आहे त्या खोडताडीच्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी व तसा अहवाल आयोगास पाठविण्यात यावा.

३. निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ४.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३८०/२००७**

**१) श्री लक्ष्मण डेबाजी पवार**
**रा.मोती नगर, घर नं. २९०,**
**नगरपालिका बालक मंदीर शाळेलगत**
**लेबर कॅालनी, पुसद ता. पुसद,जिल्हा यवतमाळ.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद, पुसद, ता. पुसद, जिल्हा यवतमाळ.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ४.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये दिनांक २४.४.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" १) आपले लेखागारातील असेसमेंट रजिस्टर पान नं.१४४ ची दिनांक २१.३.२००० ची नक्कल पाहिजे. २) आपले लेखागारातील जा.क्रं.नपपु/करविभाग/एनओसी//१९९८ कार्यालय, नगर परिषद, पुसदचे दिनांक ११.६.१९९८ ची सत्यप्रतीलीपी पाहिजे. ३) पाणी कर मागणी रजिस्टर पान नंबर १५५ मधिल बिल नं.००१९४७, दिनांक ११ मार्च, १९९९ ची सत्यप्रतिलीपी पाहिजे ४) नमूना ४८ नियम ७७ पुसद नगर परिषद मागणी नोंदवहीतील अनु.क्रं.२५१ बिल नं.००५०९३ ची सत्यप्रतिलीपी पाहिजे ५) पुसद नगर परिषद कार्यालय, पुसद मालमत्ता कर आकारणी नोटीस घर नं. २९० दिनांक ३१.१०.२००० नोटीस वैद्य आहे की,

न.प.पु.जा.क्रं.३०८/१३/१२/०४ नोटीस नी बांध/९५/२००३ ची नोटीस वैद्य आहे, त्याची सत्यप्रतिलीपीची आवश्यकता आहे. तसेच क्रं.७३६ दिनांक १८.३.२००६ ची संपूर्ण नक्कल पाहिजे. आपले कार्यालयाचे जा.क्रं.नपपु/बांध/९५/२००३ दिनांक २१.१०.२००३ पुढे तीच नोटीस न.प.पु.जा.क्रं.३०८/१३/१२/२००४ नोटीस देणारा मुख्याधिकारी वैद्य आहे की, उपरोक्त अनु.क्रं. ३ मधिल १ ते ५ पैकी नगरपरिषदेचा तत्कालीन मुख्याधिका-याने दिलेल्या दस्तऐवजाच्या कायदेशिर लेख देणारा मुख्याधिकारी वैद्य असल्याचा विषय. मागील ४०-४२ वर्षापासून आजपर्यंतच्या पुसद नगर परिषदेने सरकारी नौकर म्हणून मुख्याधिकारी दर्जाच्या अधिका-याचे वैद्य/अवैद्यतेच्या क्रं. ७३६ दिनांक १८.३.२००६ चे नगर परिषद विरुध्दचे द्वितीय अपील दाखल केलेल्या मा.राज्य माहिती आयोग (महाराष्ट्र राज्य) कालावधीतील उपरोक्त सदरील जोडपत्र अ मधिल नियम ३ च्या अर्जात नमूद अनु.क्रं.३ वरील १ ते ५ च्या सत्यप्रमाणित केलेल्या साक्षांकित प्रतिलिपीची आवश्यकता आहे. सदरची माहिती पंजीबध्द पोस्टाने माहितीची आवश्यकता आहे. " असे नमूद केले आहे. परंतु, दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडलेले दिसून येत नाही. व तसे माहिती अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या नस्तीमध्ये दाखल असलेल्या नमूना अ च्या अर्जासोबत दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केलेली नाही, असे सांगितले. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९.५.२००६ रोजी "आपल्या दिनांक २४.४.२००६ दिनांकाच्या अर्जाच्या संदर्भात आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहितीच्या ९ सत्यप्रती तयार आहेत. आपण आवेदनासोबत दारिद्रय रेषेच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर केली आहे परंतु सदर प्रमाणपत्र सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत प्रकरणाचे लाभ घेण्यापुरते मर्यादित असल्याने सदर प्रकरणाच्या संदर्भात त्याचा विचार करता येणे शक्य नाही. आपणास ही माहिती पुरविण्यासाठी नक्कल फी शुल्क खालीलप्रमाणे आहे. (१) अप्रमाणित छायाप्रत २ /- रु.प्रति नग (२) प्रमाणित प्रत १० /- रु. प्रति नग. आपले आवेदेनातील मुद्या क्रं. ५ पासून पुढे ज्या माहिती संबंधी आपण मागणी केली आहे ती मोघम स्वरुपाची असल्याने आपण माझे कार्यालयात उपस्थित राहून मुळ नस्तीची पाहाणी केल्यास व त्यामध्ये आपणास कोणती नक्कल आवश्यक आहे त्या संबंधीची मागणी केल्यास ती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. मुळ नस्तीची पाहाणी करण्यासाठी दिनांक २५.५.२००६ पावेतो माझे कार्यालयात उपस्थित राहावे. त्यासाठी कोणत्याही

शुल्काची आकारणी केली जाणार नाही. हे शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनीऑर्डरने पाठवावे. कृपया दिनांक २५.५.२००६ किंवा त्यापूर्वी प्रदान करावे," असे मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १९.५.२००६ रोजी कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००६ रोजी माहितीच्या करीता शुल्क भरलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ३१.५.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व सदरची माहिती ही शुल्क भरण्याचा कालावधी विचारात घेतल्यास विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे, असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १९.६.२००६ रोजी संचालक, नगर पालिका प्रशासन यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.१०.२००६ रोजी देण्यात आलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगीतले. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व अपीलकर्ता यांना दिनांक १६.८.२००६ रोजी, २९.८.२००६, १२.९.२००६, ३०.९.२००६, १८.१०.२००६ व ३१.१०.२००६ रोजी सूचना पत्र देवून बोलाविण्यात आले होते परंतु अपीलार्थी उपलब्ध झाले नाही. व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर दिनांक ३१.५.२००६ चे पत्रानुसार माहिती दिल्याचे आढळून येत असल्याने प्रकरण निकाली काढण्यात आले, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपूरी, अर्धवट माहिती दिनांक ३१.५.२००६ ला पुरविली असे कारण देवून दंडात्मक कार्यवाही करावी अशी विनंती करुन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील मेमोमधील अपूरी, अर्धवट माहितीच्या संदर्भामध्ये मात्र त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा आयोगाकडे केलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपूरी व अर्धवट माहिती उपलब्ध करुन दिली या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्कर्ष काढता येत नाही. अपूरी व अर्धवट माहिती आहे असे म्हटल्यावर अपीलकर्ता यांनी स्पष्टपणे माहितीच्या संदर्भामध्ये आयोगापुढे स्पष्टीकरण देणे आवश्यक असते. परंतु, अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण

-

दाखल केलेले नाही व स्वतः हजर नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली हा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व अपूरी व अर्धवट माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण आयोगाकडे केलेले नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ४.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३८८/२००७**

**१) श्री पद्माकर जगन्नाथ खर्चे,**
**३५ अे, शुभंम आय.टी.आय.कॅालनी,**
**जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला**
**जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**मोर्शी रोड, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रतनलाल प्लॅाट**
**अकोला, ता.जि. अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक  रोजी राज्य माहिती आयोगाकडे (माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये ) अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये अपीलीय अधिका-याचा तपशिल, ज्या आदेशा विरुध्द अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिनांक यामध्ये लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समोरील महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ च्या कलम ११ (३) अन्वये अपील क्रमांक १५२१/२००५ (लोआ/टे-२), दिनांक १८ ऑक्टोबर, २००६ च्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी प्रथमत: जो अर्ज माहिती मागण्याकरीता केला आहे, तो महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणे केलेला आहे. व त्यामुळेच त्यांनी त्या अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये द्वितीय अपील हे लोक आयुक्त यांचेकडे केलेले आहे.

४. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा दिनांक ११.१०.२००५ रोजी निरसित करण्यात आलेला असून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम (निरसित) अधिनियम, २००६ च्या कलम २ प्रमाणे सदरच्या अधिनियमाच्या प्रमाणे दाखल केलेला अर्ज, त्यावरील अपील हे त्या अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणेच निकाली काढावयाचे असतात. व त्याप्रमाणे मा. लोक आयुक्त यांचेकडील द्वितीय अपील सुध्दा निकाली काढण्यात आलेले दिसून येते.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा केंद्र शासनाचा अधिनियम आहे. व सदरचा अधिनियम हा दिनांक १२.१०.२००५ रोजी अंमलात आलेला आहे. राज्य माहिती आयोग हा सुध्दा दिनांक १२.१०.२००५ रोजी अस्तित्वात आलेला आहे. व त्यामुळे लोक आयुक्त यांच्या निर्णया विरुध्द कोणत्याही प्रकारची पुन्हा अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येत नाही. व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणे सुध्दा संपुर्ण प्रक्रिया ही पुर्ण झालेली असल्यामुळे मा. लोक आयुक्त यांचे निर्णया विरुध्द कोणत्याही प्रकारचे अपीलाची तरतूद महाराष्ट्र माहितीच्या निरसित अधिनियमात सुध्दा नसल्यामुळे मा. लोक आयुक्त यांचा निर्णय हा अंतिम निर्णय आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मा. लोक आयुक्त यांचे निर्णया विरुध्द असल्यामुळे व तशा प्रकारची कोणत्याही प्रकारची तरतूद ही महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ किंवा निरसित अधिनियम किंवा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३९१/२००७**

**१) श्री भानुदास भिमराव पातोडे,**
**मु.पो.तामशी, ता. बाळापूर**
**जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती,**
**बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सचिव, ग्राम पंचायत तामशी, ता. बाळापूर**
**जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची आज सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांना मागीतलेली संपुर्ण माहिती मिळाली आहे. त्यांचे समाधान झाले आहे. त्या संबंधीचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक १५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३९२/२००७**

**१) श्री रामकृष्ण नामदेवराव दांदळे**
**मु.पो. खिरपूरी बु. ता. बाळापूर, जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती,**
**बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामसेवक, ग्राम पंचायत खिरपूरी बु.**
**ता. बाळापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची आज सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. परंतु, अपीलकर्ता यांनी आयोगाकडे संपुर्ण माहिती मिळाली असल्यामुळे व त्यांचे या प्रकरणी संपुर्ण समाधान झालेले असल्यामुळे सदरचे प्रकरण नस्तीबध्द करावे. त्यामुळे मी सुनावणीच्या दिवशी हजर राहू शकत नाही. विनंती करण्यात येते की, प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे व तसेच माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत खिरपूरी बु. यांनी सुध्दा माहितीच्या अधिकारात मागीतलेली सर्व माहिती दिलेली आहे. याबाबतचे संबंधीतांनी लेखी निवेदन दिले आहे ज्यामध्ये मला माहिती मिळाली आहे व माझे समाधान झालेले आहे व प्रकरण नस्तीबंद करण्यात यावे. भविष्यात अडचण निर्माण झाल्यास मी स्वत: व्यक्तीश: जबाबदार राहील, असे लेखी दिले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक १५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३९६/२००७**

**१) श्री चंद्रभान पाराजी खांडेभराड**
**मु. तरोडा, पो. कोथळी, ता. मोताळा,**
**जिल्हा बुलढाणा.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ,**
**मु.पो.कोथळी, ता. मोताळा, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६. २००६ रोजी अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, मु.पो. कोथळी, ता. मोताळा, जिल्हा बुलढाणा यांचेकडे " आपण शिक्षण मंडळ, कोथळी या संस्थेचे ऑडीट रिपोर्ट सन १९६९-७० ते २००५-०६ (१) ऑडिट स्टेटमेंट १९६९-७० ते २००५-०६ पर्यंतचे (२) संस्थेतील सभासदांची अद्यावत यादी. माहितीचा कालावधी १ महिना. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००६ रोजी " मी संस्थेकडे दिनांक २६.६.२००६ रोजी संस्थेविषयीची माहिती मिळावी म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेला अर्ज मागे घेत आहे. मी दिलेला हा अर्ज रद्य समजण्यात यावा असे लेखी अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, कोथळी, तालुका मोताळा, जिल्हा बुलढाणा यांना केलेला दिसून

येतो. असे असले तरी त्यांनी दिनांक ४.९.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.९.२००६ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक ४.१०.२००६ पुर्वी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्ता यांनी आवश्यक तो खर्च भरणा अनामत म्हणून भरावा " असा निर्णय दिलेला दिसून येतो. "त्यानंतर प्रस्तुत अपीलार्थीनी माहिती मिळविण्यासाठी दिलेला अर्ज मागे घेऊनही किंवा त्रास देण्याच्या हेतून प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले " यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना सदरच्या माहितीची कोणत्याही प्रकारची आवश्यकता दिसून येत नाही. असे असले तरी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या उद्येशानुरुप माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे, असे त्यांच्या खुलाशात म्हटलेले आहे. यावरुन अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेतलेली असताना सुध्दा अपीलकर्ता मात्र सदरच्या आदेशाच्या संदर्भात कोणतेही पालन न करता प्रथम अपील किंवा द्वितीय दाखल करीत आहे. यावरुन वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता स्वत: प्रामाणिक नाही. व आयोगाची सुध्दा दिशाभूल करीत आहे, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ११.१०.२००६ रोजी अध्यक्ष यांनी "आपणास या रजिस्टर पत्राद्वारे असे सूचित करण्यात येते की, आपण मागीतलेली माहिती (१) ऑडिट स्टेटमेंट (२) संस्थेच्या सभासदाची अद्यावत यादी आपण योग्य ती फी पोस्टाने पाठवावी.

(१) सभासदांची यादी १० प्रति २०/- रुपये (२) ऑडिट स्टेटमेंट १२ प्रति २४/- रुपये (३) पोस्टेज खर्च अंदाजे ७५/- रुपये असे एकुण ११९/- रुपये पास्टाने पाठविण्यात यावे " असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २६.१०.२००६ च्या द्वितीय अपीलमेमो मध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.१०.२००६ रोजी पंजिकृत डाकेने पत्र देवून उपलब्ध

माहितीसाठी व माहिती पाठविण्यासाठी डाकेचा खर्च म्हणून रुपये ११९/- पाठवावे असे कळविल्याचा उल्लेख केलेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे त्यांनी खर्चाचा भरणा केलेला असून माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असेही म्हटलेले नाही. मात्र, गैरअर्जदार अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, कोथळी यांनी आदेश होऊन आतापर्यंत माहिती दिली नाही, असे अपीलाचे कारण म्हणून दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता हा स्वत: प्रमाणिक दिसून येत नाही. दिनांक ३.१०.२००६ चा आदेश प्राप्त झाल्यावर अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचा खर्च भरणा करणे आवश्यक होते. परंतु, तो खर्चाचा भरणा केलेला नाही. तसेच सदरची माहिती मागण्यासाठी अर्ज केल्या नंतर दिनांक २२.७.२००६ रोजी २६.६.२००६ च्या दिलेला अर्ज रद्य समजण्यात यावा,असेही त्यांनी लेखी दिलेले दिसून येते. यावरुन उत्तरवादी यांनी आयोगापुढील खुलाशातील परिच्छेद ३ मध्ये खालीलप्रमाणे जो खुलासा दिलेला आहे तो योग्य वाटतो-

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा दाखल करताना ते सदरच्या प्रकरणांत प्रथम अपीलीय अधिकारी आहेत किंवा नाही याबध्दल मुद्या उपस्थित केलेला आहे, तो खालीलप्रमाणे-

" सविनय सादर करण्यात येते की, प्रस्तुत उत्तरवादी यास माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बुलढाणा यांनी निकाली वा आदेशित केलेल्या माहिती अर्जातील अपील चालविण्याचा सर्वसाधारणपणे अधिकार आहे त्याबाबतचे प्राप्त आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. मात्र प्रस्तुत अपीलार्थी यांने दाखल केलेले प्रथम अपील हे माहिती अधिकारी, जनता शिक्षण मंडळ, कोथळी यांचेकडेस दाखल केलेल्या अर्जाविरुध्द केलेले असे आहे. प्रस्तुत अपीलार्थी याने सदर अर्जाचे विरुध्द हया उत्तरवादी अपीलीय अधिकारी यांचेपुढेस अपील चालविता येईल किंवा कसे (tanability) याबाबत स्पष्ट स्वरुपात आदेश प्राप्त नाहीत तसेच अपीलार्थीने तसा पुरावा वा कायद्याचा आधार सादर केलेला नाही. याशिवाय अपीलार्थीने/मुळ अर्जदाराने त्यास मागितलेली माहिती देण्यात आली असल्याची जाब देणार याने त्यांचे लेखी म्हणण्यात कथन केले आहे व त्याबाबत अपीलार्थी याने त्यास माहिती मिळाल्याबाबत व अर्ज रद्य करण्याबाबत लिहून दिलेला कागदोपत्री पुरावा प्रदर्शित क्रं. ०६ वर दाखल केला आहे.

असे असले तरी न्यायाचे दृष्टीने व अपीलार्थी यास मागीतलेली माहिती मिळावी हया सदहेतूने जाब देणार याने माहिती दयावी असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. मात्र नक्कीच अपीलार्थी याने हया अपीलीय प्राधिकारी यांचेपुढे अपील चालविता येईल किंवा कसे याचा पुरावा वा कायदेशिर तरतूद सादर करणे गरजेचे आहे ते तसे सादर केलेले नाही व सद्यस्थितीत प्रस्तुत दूसरे अपील दाखल केले नाही."

अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती संस्थेची माहिती आहे. कोणतीही संस्था ही मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणी झालेली असल्यास ती सार्वजनिक विश्वस्त संस्था असते. सदरच्या नोंदणी झालेल्या संस्थेस जर शासनाकडून अनुदान मिळत असेल तर सदरची संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये दिलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरण म्हणून येते. व त्यामुळे प्रत्येक नोंदणीकृत संस्थांना अधिनियमाच्या कलम ५ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच कलम १९ (१) प्रमाणे त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकारी यांचेकडे अपील दाखल करण्याची तरतूद आहे. व त्याप्रमाणे त्याच सार्वजनिक प्राधिकरणामधील वरिष्ठ अधिकारी किंवा पदाधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी असावयास पाहिजे. परंतु, अर्जदार सर्वसाधारणपणे अर्ज दाखल करताना संस्थेच्या अध्यक्षांकडे किंवा सचिवाकडे दाखल करतात. व त्यानंतर प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल करतात. परंतु, सहाय्यक धर्मदाय आयुक्त हे त्या सार्वजनिक प्राधिकरणामधील वरिष्ठ अधिकारी नसल्यामुळे ते प्रथम अपीलीय अधिकारी आहे किंवा नाही अशाच प्रकारचा मुद्या त्यांनी उपस्थित केलेला आहे व त्यांचा सदरचा मुद्या हा योग्य दिसतो. अर्थातच, याबाबतचा निर्णय हा समूचित शासनाने घ्यावयाचा असल्यामुळे मा. धर्मदाय आयुक्त यांनी याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करुन त्याबाबतचा शासनाचा निर्णय घेवून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नियुक्ती संदर्भामध्ये निर्णय देणे आवश्यक आहे. अन्यथा, प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या संदर्भामध्ये निर्णय दिल्यास त्या निर्णयाच्या वैद्यतेबध्दल प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मा. धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,

मुंबई यांनी योग्य ती कार्यवाही केल्यास पुढील गुंतागुंत होणार नाही. याकरीता सदरचे विवेचन केलेले आहे. सहाय्यक धर्मदाय आयुक्त हे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून दिनांक २३.८.२००७ च्या महाराष्ट्र शासन परिपत्रकाप्रमाणे नियुक्त झाले असले तरी ते त्यांच्या कार्यालयाकरीता प्रथम अपीलीय अधिकारी आहे. नोंदणीकृत संस्थेकरीता नाही, असे त्या परिपत्रकावरुन दिसून येते. व त्याकरीता शासनाचे स्पष्टीकरण आवश्यक आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णया प्रमाणे अध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, कोथळी यांचे दिनांक ११.१०.२००६ च्या पत्राप्रमाणे खर्च एकुण रुपये ११९/- चा भरणा हा जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेला नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मा. धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, धर्मदाय आयुक्त भवन, ३ रा मजला, ८३ डॉ.ॲनी बेसंट रोड, वरळी मुंबई ४०००१८ यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १६.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४००/२००७**

**१) श्री अनिल उर्फ शनी भिकुजी इलमे,**
**पुथ्वीराज नगर, परसोडी रोड, ता.धामणगांव रेल्वे,**
**जिल्हा अमरावती ४४४७०९**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सह निबंधक, सहकारी संस्था, चांदूर रेल्वे,**
**जिल्हा अमरावती.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हे स्वत: हजर नसून त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांचा दिनांक २६.६.२००६ चे अर्जानुसार सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, चांदूर रेल्वे यांनी चांदूर तालुका गृह तारण सहकारी संस्था रजिस्टर नंबर २८१ या संस्थेचे आशिर्वाद गृहतारण सहकारी संस्था म.र.न. ६७६ मध्ये विलीनिकरण झालेले आहे काय? असल्यास कोणत्या कारणास्तव. सहाय्यक निबंधक कार्यालयात उपलब्ध असलेली आशिर्वाद गृह तारण संस्था म.र.न. ६७६ चे सभासदांची व संचालक मंडळाची यादी देण्यात यावी. सहाय्यक निबंधक कार्यालयातील उपलब्ध रेकार्ड नुसार चांदूर तालुका गृह तारण सहकारी संस्था मर्यादितच्या सभासदांची यादी व संचालक मंडळाची यादी देण्यात यावी, अशी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००६ रोजी सुध्दा त्यांच्या दिनांक २४.२.२००६ च्या तक्रारीचे अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. त्यातही पुर्वी दिनांक ८.५.२००६ रोजी, दिनांक २७.३.२००६ च्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत दाखल केलेल्या अर्जाचे उत्तर संदर्भिय पत्राने मिळालेले असून असमाधानकारक आहे वगैरे माहिती मागीतलेली दिसून येते. त्याचप्रमाणे सदरच्या अर्जामध्ये संस्थेच्या कार्यालयाच्या संदर्भामध्ये फलक बोर्ड वगैरे लावलेला दिसून येत नाही, अशी तक्रार केलेली आहे व त्याबध्दलची माहिती मागीतलेली दिसून येते.

४. सदरच्या तीनही अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात दिनांक २६.६.२००६ च्या अर्जाची माहिती दिनांक २७.७.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसते. सदरच्या उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात रुपये ८/- खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या इतर अर्जाच्या संदर्भात सुध्दा चौकशीचे आदेश दिलेले दिसून येतात. व ती माहिती सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.९.२००६ रोजी जिल्हा उप निबंधक तथा अपीलीय अधिकारी, सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये दिनांक २६.६.२००६ च्या अर्जामध्ये मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात संचालक मंडळाची यादी उपलब्ध करुन दिली होती. विद्यमान सभासदांची यादी उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच दिनांक २५.५.२००६ च्या अर्जाप्रमाणे पुन्हा तक्रारी किती प्राप्त झाल्या असेही विचारलेले दिसून येते. व दिनांक ८.६.२००६ च्या अर्जानुसार सहाय्यक निबंधक, चांदूर रेल्वे कार्यालयाकडे माहिती उपलब्ध आहे किंवा नाही अशा स्वरुपात खुलासा वजा माहिती मागीतलेली होती. परंतु देण्यात आलेली नाही, असे नमुद केलेले आहे.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे माहिती मागण्याचा अर्ज कलम ६ (१) प्रमाणे केल्यानंतर त्याच अधिनियमात दिलेल्या मुदतीप्रमाणे पुढील प्रक्रिया आहे व त्यामुळे एक माहितीचा अर्ज, त्या निर्णयाविरुध्द ३० दिवसानंतर एक प्रथम अपील व त्या निर्णयाविरुध्द ९० दिवसाचे आंत एक द्वितीय अपील अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे तीन वेगवेगळया तारखांच्या

अर्जाच्या संदर्भामध्ये एक प्रथम अपील किंवा एक द्वितीय अपील हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नाही. व त्यामुळे कोणत्याही अर्जाच्या संदर्भात मुदतीच्या कालावधीची परिगणना करता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाच्या संदर्भात व अनेक अर्जांच्या संदर्भामध्ये द्वितीय अपीलात निर्णय देताना कोणत्याही मुदतीचा विचार करता येणार नाही. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१०.२००६ रोजी देण्यात आलेला आहे. व त्यामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांचे दिनांक २६.६.२००६ च्या अर्जानुसार त्यांच्या दिनांक २५.५.२००६ चे अर्जानुसार व दिनांक ८.५.२००६ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असून अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात आले आहे. प्रतिवादी यांनी अपीलार्थीचे दिनांक २०.९.२००६ चे अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्यावरील उपलब्ध माहितीच्या प्रतीची अपीलार्थीस नियमानुसार आवश्यक शुल्काची रक्कम कळवून हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलार्थीस पुरविण्यात यावी, असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु स्पष्टपणे कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याबध्दल विश्लेषण केलेले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल करुन पुन्हा दिनांक २६.६.२००६ च्या अर्जानुसार प्रतिवादीस अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांना दिलेल्या जबाबानुसार मुद्या-अ बाबतची माहिती प्रतिवादीनी अपीलार्थीस दिलेली नाही. मात्र, याबाबत स्पष्टीकरण दिसत नाही. व अपीलकर्ता सुध्दा हजर नसल्यामुळे त्याबाबतचे स्पष्टीकरण सुध्दा घेता येत नाही. अपीलकर्ता यांनी आर्थिक परिस्थितीमुळे तीनही अर्जाच्या अपीलाकरीता वेगवेगळे अर्ज देणे शक्य होत नाही. तसेच सुनावणीची वेगवेगळी तारीख दिल्यास प्रवास खर्च मला शक्य होत नाही. करीता

माझे तीनही अर्ज एकाच अपीलात सहानुभूतिपुर्वक विचार करुन स्विकारण्यात यावे, अशी विनंती केलेली दिसते व तसेच कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे मुंबई येथे उपस्थित राहाणे शक्य नाही. जर अमरावतीस सुनावणी ठेवली तर उपस्थित राहाणे शक्य होईल. कायद्यानुसार निर्णय द्यावा, असे म्हटलेले आहे. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणती कार्यवाही अपेक्षित आहे हे द्वितीय अपीलामध्ये  दिलेले नाही. एकुणच सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी दाखल केलेली सर्व कागदपत्रे ही त्यांच्या वेगवेगळया अर्जाच्या माहितीच्या अधिकारात किंवा इतर तक्रारीच्या

संदर्भात आहे. दिनांक २६.६.२००६ च्या अर्जावरुन व एकुण कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना आशिर्वाद गृह तारण सहकारी संस्था म.र.न. ६७६ ची सभासदांची यादी व चांदूर तालुका गृह तारण सहकारी संस्था मर्यादितच्या सभासदांची यादी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. जी यादी उपलब्ध करुन दिलेली दिसते ती संचालक मंडळाची यादी आहे. नियोजित आशिर्वाद गृह तारण संस्था अशी यादी उपलब्ध करुन दिलेली दिसते. व नोंदणीच्या वेळची संस्थेच्या सभासदाची यादी उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित दोनही संस्थेच्या सभासदाची यादी उपलब्ध करुन देणे हा मुद्दा त्यांचा दिसतो. व त्याप्रमाणे पुन्हा सदरच्या दोनही संस्थेच्या सभासदांची यादी सहाय्यक निबंधक कार्यालयात उपलब्ध असल्यास ती पुरविणे संयुक्तिक राहील. उपलब्ध नसल्यास तसे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चांदूर रेल्वे हे सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे. अधिनियमाच्या कलम २० (१) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची असते, याची नोंद सहाय्यक निबंधक यांनी घेणे आवश्यक आहे. व त्याबध्दल त्यांना ताकिद देण्यात येत असून आयोगाचा अवमान केल्याबध्दल त्यांच्या गोपनिय अहवालामध्ये सदरची नोंद घेणे आवश्यक राहील.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २६.६.२००६ चे अर्जाप्रमाणे सहाय्यक निबंधक कार्यालयात आशिर्वाद गृह तारण सहकारी संस्था म.र.न. ६७६ ची सभासदांची यादी व चांदूर तालुका गृह तारण सहकारी संस्था मर्यादितच्या सभासदांची यादी उपलब्ध असल्यास छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात व उपलब्ध नसल्यास तशा प्रकारे अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पोस्टाने कळविण्यात यावे.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था हे आयोगापूढे अपीलाच्या सुनावणीस हजर राहीले नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिली आहे किंवा नाही हे सिध्द करण्याची जाबाबदारी त्यांची असल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केला असल्यामुळे त्यांना ताकिद देण्यात येत असून सदरच्या ताकीदची नोंद ही त्यांच्या गोपनिय अहवालात घेण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १६.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**१) अपील क्रं. १४०१/२००७**
**२) अपील क्रं. १४०२/२००७**

**१) श्री म.का. लाडके, सचिव,**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, वणी**
**जिल्हा यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.४.२००८ )**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेकडील अपील क्रमांक १५/२००६ व १२/२००६ मध्ये अनुक्रमे दिनांक २५/९/२००५ व ७/९/२००५ रोजी दिलेल्या निर्णयाचे विरुध्द दोनही द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपील क्रमांक १४०१/२००७ मध्ये दिनांक २५.९.२००५ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी अर्जदार अपीलार्थी श्री भैय्याजी शंकरराव चवने विरुध्द माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वणी जिल्हा यवतमाळ- उत्तरवादी यामधील प्रस्तावनेत नमूद कारण मिमांसेच्या अनुषंगाने अपीलार्थी श्री भैय्याजी शंकरराव चवने यांचे अपील स्विकृत करण्यात येत असून त्यांना उत्तररार्थी यांनी वांछित व विहित माहिती परिपुर्ण व सत्य स्वरुपात विहित कालावधीत विहित रित्या पुरवावी. अपीलार्थी यांना या निर्णयाविरुध्द विहित तरतूदीनूसार दूसरे अपील सक्षम प्राधिकरणापुढे विहित

मुदतीत करता येईल. प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थिती विचारात घेता खर्चा संबंधाने कोणतेही आदेश नाही, असा निर्णय दिलेला आहे.

४. सदरच्या प्रकरणामध्ये श्री भैयाजी शंकरराव चवने अर्जदार यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी सौ. सुलोचना महादेवराव कातकडे, उपसभापती यांना आतापर्यंत दिलेले मानधन, सभा भत्ता व ट्राव्हलींग भत्ता किती दिला आहे. श्री महादेवराव कातकडे यांचे सन २००१-२००२ व १९९९-२००० ला लायसन्स अडते व व्यापाराची सत्य प्रत. सुनिल महादेवराव कातकडे यांचे सन २०००-२००१, २००१-२००२ च्या लायसन्स व व्यापाराकरीता लायसन्सची सत्यप्रत ही व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते.

५. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी दिनांक २८.८.२००६ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती ही शासकिय प्राधिकरण नसल्यामुळे तसेच बाजार समितीला शासनाकडून कोणतेही नियमित अनुदान व अर्थसहाय्य प्राप्त होत नसल्यामुळे ही बाजार समिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. सबब, आपण सादर केलेले वरील संदर्भिय अर्ज या पत्राद्वारे फेटाळण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अर्जदार यांनी दिनांक ८.९.२००६ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व वर नमूद केल्याप्रमाणे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.९.२००६ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला आहे. व त्याच निर्णयाचे विरुध्द द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपील क्रमांक १४०२/२००७ मध्ये अर्जदार कलमनयन द्वारकादास किलावत यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती यांचेकडे सभापती, सचिव व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केलेल्या प्रवास भत्याच्या बिलाची सत्यप्रत, खालील कालावधीत पाणी, वीज व इतर बाबीकरीता (शेतकरी व व्यापा-यांच्या दृष्टीने) बांधकाम इ. बाबीवर झालेल्या खर्चाचा तपशिल, माहितीचा कालावधी १ ऑक्टोबर, २००५ ते ३१ मार्च, २००६ पावेतो दिलेला असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ५.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आपण सादर केलेल्या

अर्जात माहितीचा विषय मोघम स्वरुपाचा असून त्याद्वारे कोणताही अर्थबोध होत नसल्यामुळे त्यांच्या अर्जावर लिहिण्यात आलेली तारीख संभ्रम निर्माण करणारी असल्यामुळे सदर अर्ज फेटाळण्यात येत आहे. सदर निर्णयाच्या विरुध्द या पत्राच्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेकडे अपील करण्याची आपणास मुभा राहील. सदरच्या निर्णयाने अर्जदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयावरुन दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या प्रस्तावनेत नमूद कारण मिमांसेच्या अनुषंगाने अपीलार्थी श्री कमलनयन द्वरकादास किलावत यांचे अपील स्विकृत करण्यात येत असून त्यांनी अपीलार्थी यांना वांछित व विहित माहिती परिपुर्ण व सत्य स्वरुपात विहित कालावधीत विहितरित्या पुरवावी. अपीलार्थी यांना निर्णया विरुध्द विहित मुदतीत विहित तरतूदीनुसार दूसरे अपील सक्षम प्राधिका-यापुढे विहित मुदतीत करता येईल. प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थिती विचारात घेता खर्चा संबंधाने काहीही आदेश नाही, असा निर्णय दिलेला दिसून येतो.

६. सदरच्या दोनही अपीलाच्या निर्णयाविरुध्द दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी श्री भैय्याजी शंकरराव चवने यांनी समिती उपसभापती यांचे संबंधाने व्यक्तीशः माहिती मागीतली होती. सदर माहितीचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नाही. सदर माहिती व्यापक लोक हिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनिय नाही. बाजार समिती ही शासकिय प्राधिकरण नसल्यामुळे तसेच शासनाकडून समितीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणतेही अर्थसहाय्य वा आर्थिक नियमित अनुदान मिळत नाही. त्यामुळे बाजार समिती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. केंद्रिय आयकर कायद्यान्वये समितीचा स्थानिक स्वराज्य संस्थेचा दर्जा काढून घेतल्याने समितीला आयकर भरावा लागत आहे. व त्यामुळे माहिती देण्यात आली नाही. समितीची तातडीची सर्वसाधारण सभा दिनांक २८.८.२००६ मधील ठराव क्रमांक २१ अन्वये ठरल्यावरुन अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली नाही. तसेच अपील क्रमांक १४०२/२००७ मध्ये श्री कमलनयन द्वारकादास किलावत हे समितीला वारंवार माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती मागवितात. तसेच नेहमी अशी माहिती मागवून बाजार समितीच्या दैनंदिन कामकाजात अडथळा

आणत आहे. त्यामुळे समितीचे कामकाज करणे कठीण झाले आहे. यापूर्वी त्यांना दोनदा माहिती दिली. त्याचा उपयोग त्यांनी सदर माहिती इतरांना पुरवून सभासदांची बदनामी केली होती. सदर कायद्याअंतर्गत माहिती मागवून इतरांना पुरवून दैनिक वृत्तपत्राला देवून समितीची नाहक बदनामी केली आहे. व अर्जदार यांनी मागीतलेल्या माहितीचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नाही. सदर माहिती ही व्यापक लोक हिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनिय नाही. बाजार समिती ही शासकिय प्राधिकरण नसल्यामुळे शासनाकडून समितीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणतीही आर्थिक सहाय्यता वा आर्थिक नियमित अनुदान मिळत नाही. त्यामुळे बाजार समिती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. त्यामुळे केंद्रिय आयकर कायद्यान्वये समितीचा स्थानिक स्वराज्य संस्थेचा दर्जा काढून टाकल्याने समितीला आयकर भरावा लागत आहे. व त्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. समितीची तातडीची सर्वसाधारण सभा दिनांक २८.८.२००६ मधील ठराव क्रमांक २१ अन्यये ठरविल्यावरुन अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली नाही व त्यामुळेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील दाखल करण्यात येत आहे.

७. सदरच्या अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. अे.के. सोमानी हजर झाले असून त्यांनी युक्तीवाद केला की, १) अर्जदाराने त्यांच्या अर्जामध्ये माहिती मागण्याचे कारण दिलेले नाही. २) सदरची मागीतलेली माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. ३) व कृषि उत्पन्न बाजार समिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

८. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (२) प्रमाणे अर्जदारास त्याला संपर्क साधण्याच्या पत्याव्यतिरिक्त माहिती विचारण्यासाठी कोणतेही कारण विचारता येत नाही, अशी तरतूद आहे. व त्यामुळे दोनही अर्जात अर्जदाराने माहितीचे कारण दिलेले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हे म्हणणे संयुक्तिक नाही. (२) सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती किंवा उपसभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती यांचे मानधन व भत्ते याबध्दल जी माहिती विचारलेली आहे ती माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती होऊ शकत नाही. सभापती व उपसभापती हे निवडून आलेले पदाधिकारी असल्यामुळे सार्वजनिक संस्थेच्या पदावर आहेत व त्यामुळे सार्वजनिक संस्थेच्या निधीमधून पदाधिकारी म्हणून जे कोणतेही मानधन किंवा

भत्ते दिले जातात ती वैयक्तिक माहिती होत नाही. व त्यामुळे ही त्रयस्थ पक्षाची माहिती होऊ शकत नाही. (३) कृषि उत्पन्न बाजार समिती यास केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही याकरीता सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेची व्याख्या अधिनियमाचे कलम २ (ज) मध्ये दिलेली आहे.

" (ज) "**सार्वजनिक प्राधिकरण**" याचा अर्थ ; (क) संविधानाद्वारे किंवा त्याअन्वये, (ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे, (ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे (ख) समूचित शासनाने काढलेले अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा गठीत करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे. व त्यात (एक) समूचित शासनाची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे तीला प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जाते अशी निकाय ; (दोन) समूचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकिय संस्था असा आहे. या व्याख्येतील प्रत्येक निकष हा स्वतंत्रपणे तपासून पाहाणे आवश्यक असते. व त्याप्रमाणे " (ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे," या निकषाचा विचार केला असता कृषि उत्पन्न बाजार समिती ही मुळातच राज्य विधान मंडळाच्या महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या तरतूदीने गठीत झालेली असल्यामुळे अधिनियमातील वरील व्याख्येच्या अंतर्गत येते व त्यामुळे सदरचा अधिनियम हा कृषि उत्पन्न बाजार समीतीस लागू आहे. शासनाद्वारे निधी मिळतो किंवा नाही हा निकष (घ) मध्ये दिला आहे. परंतु तो सुध्दा स्वतंत्र असा निकष आहे. व कोणत्याही एका निकषात प्राधिकरण येत असेल तर ते अधिनियमाप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यांस सदरचा अधिनियम लागू आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे वकीलाचे म्हणणे हे ग्राहय धरता येत नाही.

९. वरील सर्व कारण विचारात घेवून अपीलकर्ता यांचे दोनही अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले हे खारीज करण्यात येत आहेत.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १७.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४०५/२००७**

**१) श्री दिलीप लक्ष्मणराव एडतकर**
**सी-२६, औद्योगिक सहकारी वसाहत, सातुर्णा**
**बडनेरा रोड, अमरावती- ४४४६०५.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**अमरावती.**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, मोर्शी,**
**ता. मोर्शी, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १९.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२००६ रोजी " आपल्या कार्यालयातील भूसंपादन प्रकरण क्रमांक २८/४७/१९९७-९८ मौजा पेनटाकळी येथील वाळू रेती/मुरुम लिलाव बाबत या प्रकरणातील भूसंपादन जाहिरात दैनिक विदर्भ मतदार उपरोक्त कालावधीमध्ये प्रकाशित झालेली असून त्यांची देयके अप्राप्त आहेत. त्यामुळे त्याबाबत प्रकरण निहाय सदर जाहिरातीचे देयक क्रमांक/प्रकाशन दिनांक/देयक रक्कम/ देयक अदा केले असल्यास त्याचा पावती क्रमांक व दिनांक/धनादेश क्रमांक व दिनांक तसेच देयक अदा झालेले नसल्यास त्याची सविस्तर कारणे द्यावी. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी," असे नमूद करुन शासकिय सार्वजनिक माहिती अधिकारी उपविभाग तथा भूसंपादन अधिकारी उपविभागीय कार्यालय, मोर्शी, जिल्हा अमरावती यांचेकडे मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.१.२००६ रोजी संपादक, दैनिक विदर्भ मतदार, अमरावती, सातुर्णा रोड अमरावती या पत्यावर " आपण आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन केलेले भूसंपादन प्रकरण क्रमांक २८/४७/१९९७-९८ मौजा पेनटाकळी वाळु,रेती/मुरुम लिलावाबाबत, असे नमूद केलेले आहे. मौजा पेनटाकळी हे गांव या

उपविभागत येत नसल्यामुळे आपला विषयांकित अर्ज खारीज करण्यात येत आहे. माहितीस," असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अथवा त्याबाबत काहीही कळविलेले नाही, असे अपील करण्याचे कारण दिलेले दिसून येते.

३. सदरच्या प्रथम अपीलामध्ये २ जुलै, १९९८ ते ३ ऑगष्ट, २००० या कालावधीमध्ये प्रकाशित झालेल्या जाहिरातीचा संदर्भ त्यांनी दिलेला दिसून येते. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु, द्वितीय अपीलामध्ये पहिले अपील दाखल झाल्यानंतर संबंधीत माहिती अधिकारी यांचे पत्र क्रमांक २१२, दिनांक ४.४.२००६ रोजी अर्जदाराला प्राप्त झाले आहे. त्यामध्ये अपूर्ण माहिती असल्याबाबत अपीलकाराने जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे अपील खारीज करण्याबाबतचे संबंधीत माहिती अधिकारी यांनी माहितीची मागणी फेटाळण्यात आली. संबंधीत माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला अपेक्षित असलेली माहिती त्यांचे पत्र क्रमांक ७८१ दिनांक २५.७.२००६ नुसार उपलब्ध करुन दिलेली असून ही माहिती तब्बल १६६ दिवस उशिरा मिळालेली आहे. जिल्हाधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांना दोषी न धरता सदर अपील प्रकरण निकाली काढले. तसेच पुढे माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधीत आहे त्यांचे नांव उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, मोर्शी तालुका मोर्शी, जिल्हाधिकारी परिसर बुलढाणा, तालुका बुलढाणा असे नमूद केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ६.१.२००६ च्या अर्जामध्ये मौजा पेनटाकळी येथील भूसंपादन प्रकरणाच्या संदर्भात माहिती विचारलेली दिसून येते व त्यामुळेच पेनटाकळी हे मोर्शी उपविभागत येत नाही, असे कळविलेले दिसुन येते. त्यानंतर प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती सुधारुन मागीतलेली असल्यामुळे व जाहिरात प्राप्त झालेली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना स्वतःच मागीतलेल्या माहितीचे निश्चित वर्णन माहिती नसल्यामुळे त्यांनी माहितीचे वर्णनच मुळात चुकीचे केलेले दिसून येते. व त्याबाबत द्वितीय अपीलामध्ये माहिती ज्या कार्यालयाशी, विभागाशी संबंधीत आहे त्या संदर्भामध्ये मोर्शी व बुलढाणा असे दोनही उपविभागाचे वर्णन दिलेले आहे. म्हणजे अपीलकर्ता यांनीच माहितीचे वर्णन माहितीच्या अर्जात चुकीचे दिलेले होते

असे दिसते. पत्र क्रमांक ७८१ दिनांक २५.६.२००६ प्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती मोर्शी विभागातील जाहिराती संबंधी आहे. अपीलकर्ता हा पत्रकार दिसून येतो. व त्यांच्या वर्तमान पत्रामध्ये जी जाहिरात प्रसिध्द होतात त्या जाहिरातीच्या संदर्भामध्ये देयक मिळाले नाही व त्याबध्दल त्यांनी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु, जाहिरात एका विभागातील व माहिती दूस-या विभागातील अशा प्रकारचे वर्णन अपीलकर्ता यांनी केलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.१.२००६ रोजी दिलेली उत्तर योग्य आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील/द्वितीय अपील मध्ये माहितीच्या वर्णना संदर्भात सुधारणा केलेली असल्यामुळे सदरच्या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना दोषी धरता येणार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिला असता तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाची आवश्यकता अपीलकर्ता यांना राहीली नसती. परंतु, दुदैवाने प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणी घेत नसल्यामुळे व प्रशासकिय पत्रांवर अवलंबून राहात असल्यामुळे सदरची प्रकरणे प्रलंबित राहातात व अपीलकर्ता अर्जदार यांना माहिती सुध्दा मिळत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केले आहे, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्याबाबत त्यांना ताकिद देणे सुध्दा आवश्यक राहील.

५. परंतु, मुळातच अपीलकर्ता यांचे वर नमूद केल्याप्रमाणे मुळ माहितीचे अर्जातील माहितीचे विवरण चुकीचे असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १९.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४११/२००७**

**१) श्री अतुल रत्नाकर बुरांडे,**
**द्वारा- श्री शिवाजीराव रनवरे, ५५८-चिटणविस नगर,**
**पंचवटी आश्रम मागे, उमरेड रोड, नागपूर-४४०००९**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापिका, श्री उच्च प्राथमिक शाळा, राजेंद्रनगर,**
**झोपडपटटी के.डी.के.कॅालेज रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व अपीलकर्ता यांचे वकील श्री बी.आर. वाघ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी म्हणून प्रभारी मुख्याध्यापिका सौ.सुमन तरवटकर हया हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपशिक्षणाधिकारी यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीकरीता प्राधिकृत केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी श्रीमती सुमन तरवटकर, प्रभारी मुख्याध्यापिका यांचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जामध्ये- " आपल्या शाळेतील शिक्षिका श्रीमती अरुणा अरुणराव पत्की (कु. भारती रामभाऊ पेठे ) यांनी १९८६ च्या ऑक्टोंबर मध्ये महाराष्ट्र शासनाची अद्यापन पदविका प्रमाणपत्र (विशेष अभ्यासक्रम) माध्यम मराठी उत्तीर्ण केल्याचे दिनांक १५.१.१९८७ च्या प्रमाणपत्राची झेरॅाक्स आपण दिनांक १९.९.२००६ च्या पत्रासोबत

आपण पाठविली आहे. त्या प्रमाणपत्रानुसार श्रीमती अरुणा पत्की यांनी सेवा अंतर्गत शिक्षकांसाठी असलेले पोस्ट द्वारा 'डी.एड.' प्रशिक्षण केल्याचे दिसते. त्यामुळे हे प्रशिक्षण घेताना-

अ) श्रीमती अरुणा अरुण पत्की कोणत्या सरकारमान्य प्राथमिक शाळेत केव्हापासून केव्हापर्यंत शिक्षिका होत्या. त्या शाळेचे बिनचुक नांव व पत्ता द्यावा.

ब) ती शाळा कोणती संस्था संचलित करते, त्या संस्थेचे बिनचुक नांव व पत्ता द्यावा.

क) त्या शाळेच्या मुख्याध्यापकाने श्रीमती अरुणा अरुण पत्की यांना दिलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत ही माहिती सौ. अरुणा अरुणराव पत्की यांचेकडून प्रतिज्ञापत्रावर लिहून घेऊन ती अर्जदारास पुरवावी.

टिप :- सदर माहिती मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे मागीतली होती. परंतु ती शाळा स्तरावरील असल्यामुळे शाळा स्तरावरुन मागवावी असे शिक्षणाधिका-यांनी दिनांक २३.३.२००७ अन्वये कळविलेले आहे. व त्या पत्राची प्रत आपणाकडे संबंधीत कार्यालयाने पाठविलेली आहे. तरी पण आपल्या माहितीसाठी मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. नागपूर हयांचेकडे केलेला अर्ज व त्यांचे उत्तर हयांच्या प्रति सोबत जोडल्या आहेत. " सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता पुर्वी शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज केलेले दिसून येते. तसेच पुन्हा अपील दाखल केलेले दिसून येते. वास्तविक, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणातील निश्चित माहिती मिळण्याकरीता विशिष्ट अशा तरतूदी करुन त्याकरीता मुदत देवून तरतूदी केलेल्या आहेत. परंतु, अपीलकर्ता हे सुध्दा त्या कायद्यातील कोणत्याही प्रकारची तरतूदींचे पालन न करता फक्त अधिकार मिळाला आहे या जाणिवेतून अर्ज करीत असतात. ज्या सार्वजनिक

प्राधिकरणाची माहिती असेल त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती अधिका-यांना माहिती मागणे अपेक्षित असते. तरच ती ३० दिवसांत उपलब्ध होऊ शकते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे इतर अर्ज किंवा अपीले हे विचारात घेण्याची आवश्यकता नाही. दिनांक ३.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे जर त्यांना ३० दिवसांत माहिती उपलब्ध झाली नसेल तर त्या विरुध्द संस्थेचे सचिव हे प्रथम अपीलीय अधिकारी त्यावेळेस होते. त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. वास्तविक अपीलकर्ता हे सुध्दा संस्थेचे उपाध्यक्ष आहे, असा युक्तीवाद करताना त्यांचे वकील यांनी सांगीतले. संस्थेचे उपाध्यक्ष असताना त्यांना याबाबत या कायद्याच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी कोण याचे ज्ञान असणे आवश्यक होते. दिनांक २५.५.२००७ च्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा जर प्रथम अपीलीय अधिकारी हे शिक्षणाधिकारी म्हणून त्यांचेकडे केलेले असेल तर त्यांनीही कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, दिनांक २८.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांचे पत्र क्रमांक दिनांक ९.३.२००७ प्रमाणे मुख्याध्यापिका, श्री उच्च प्राथमिक शाळा, श्रीमती अरुणा पत्की यांच्या संदर्भातील वैयक्तिक माहिती मागीतलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११ प्रमाणे ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने ती देण्यासंदर्भात श्रीमती अरुणा पत्की यांनी संमती दिल्यानंतर आपणास पुरविण्यात येईल. दिनांक ११.४.२००७ रोजी श्रीमती अरुणा पत्की यांनी मुख्याध्यापिका यांना लेखी दिलेले दिसते. पुन्हा दिनांक २१.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अशा प्रकारे अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज व प्रथम अपीले दाखल केलेली असली तरी त्यांचा विचार न करता दिनांक ३.४.२००७ च्या अर्जाचा विचार करणे हे न्यायाचे होईल. परंतु, त्याबाबत कोणत्याही प्रकारची मुदत ही विचारात घेता येणार नाही.

४. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.४.२००७ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री उच्च प्राथमिक शाळा यांनी श्रीमती अरुणा पत्की यांचे संदर्भात मागितलेली माहिती अ व ब या संदर्भात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. क मध्ये मागीतलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळे ती देण्याची आवश्यकता नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

५. प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उप शिक्षणाधिकारी यांचेकडे जे प्रथम अपील दाखल केलेले होते, त्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना योग्य ते मार्गदर्शन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करुन तसा निर्णय द्यावयास पाहिजे होता. प्रथम अपीलीय अधिका-याने याबाबत सुध्दा माहिती ही शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता यांना द्यावयास पाहिजे होती व ती दिलेली नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे, असे दिसून येते. यापुढे शिक्षणाधिकारी यांनी अशा प्रकारे आलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे उडवाउडवीचे उत्तर न देता अर्जदारास योग्य ते मार्गदर्शन करणे हे संयुक्तिक राहील.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.४.२००७ च्या अर्जामधील आवश्यक माहितीच्या वर्णनातील अ व ब मधील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना विनामुल्य जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापिका, श्रीमती सुमन तरवटकर यांनी रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २१.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४१४/२००७**

**१) श्री केशव गोविंदा तिजारे**
**रा.मोदी नागसेन नगर, कामठी**
**ता. कामठी, जिल्हा नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलसा व कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.३.२००६ रोजी अपील दाखल केलेली आहे. याचा अर्थ मुदतबाहय अपील दाखल केलेले आहे. असे असले तरी सदरच्या अपीलाची सुनावणी ही घेणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या उद्येशाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी श्री पी.पी. निकास यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

" आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- नगर परिषदेची वर्ग १ ते ४ मराठी माध्यम उघडण्याची मनाई केली आहे. संस्थेत चेंज रिपोटचा वाद धर्मादाय यउपआयुक्त नागपूर यांचेकडे सुरु आहे. शाळेची इमारत आरक्षित जागेवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम आहे. इमारतीचे अतिक्रमण काढण्याचे आदेश जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिले आहे. (केस क्रं. १३ एनएलए/२२-९८-९९) मा. लोक आयुक्त यांचेकडे प्रकरण सुरु आहे. त्या अनुषंगाने माहिती देण्यात यावी. १) शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी शिक्षणाधिकारी प्राथ. यांना दिनांक १४.१.२००५ रोजी योग्य कार्यवाही करण्याबाबत पत्र दिले. शिक्षणाधिकारी प्राथ. यांनी पत्राची कोणती दखल घेवून कार्यवाही केली. (दिनांक १४.१.२००५ च्या पत्राची प्रत शिक्षणाधिकारी यांना दिनांक २८.१.२००५ रोजी.. ..) २) मा. धर्मादाय उपआयुक्त नागपूर यांचेकडे संस्थेचा चेंज रिपोर्ट वाद सुरु असतांना याची दखल घेण्यात आली का? शिक्षणाधिकारी यांनी कोणती दखल घेतली. ३) इमारत संसथेची नाही. अतिक्रमण आहे. अतिक्रमण काढण्याचे आदेश आहेत. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी कोणती दखल घेतली. ४) कर्मचा-यांच्या नियुक्तिस मंजूरी देताना शिक्षणाधिकारी यांनी स्वतःचे क्रं.शिक्षण/प्राथ/३४६३/कार्यालय शिक्षण विभाग प्राथमिक जि.प. नागपूर दिनांक १६.५.१९८६ च्या परिपत्रकाची दखल घेतली कां? कोणती? ५) वर्ग १ ते ४ मराठी माध्यम उघडझ्याची परवानगी नगर परिषदेची दिलेली नाही. हे शिक्षणाधिकारी प्राथ. यांनी मान्य केले आहे. न.प. ची परवानगी नसतांना शाळा काढण्यात आली. यावर केलेली कार्यवाही कोणती? ६) वर्ग १ ते ४ च्या तुकडया किती आहेत व खात्याने किती तुकडयांना मान्यता दिली आहे? ७) सहयोग निधी या गोंडस नांवाखाली डोनेशन म्हणून शाळेनी किती रक्कम गोळा केली आहे? खात्याने केलेली कार्यवाही कोणती."

४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १९.६.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्या क्रमांक १, ३, ४, ५ व ६ यामधील माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असली तरी ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता येते. सदरच्या मुद्यांच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय विचारलेले नाहीत तर झालेल्या कार्यवाही बध्दल माहिती विचारलेली आहे. व ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होऊ शकते. व त्यामुळे ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्या क्रमांक २ मधील माहिती ही धर्मदाय उपआयुक्त, नागपूर यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे व ते स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांनी त्या कार्यालयातून उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. मुद्या क्रमांक ७ मधील माहिती ही शाळा स्तरावरील असल्यामुळे व त्यातही माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये येत नसल्यामुळे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही.

६. वास्तविक, सदरचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नसेल तर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन माहितीची छाननी करुन माहिती कशी उपलब्ध करुन देता येईल, याबध्दलची कारण मिमांसा देणारा निर्णय द्यावयास पाहिजे होता. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची अपीलाची किंवा अर्जाचे संदर्भात अवलोकन केले नसून, छाननी केली नसून निर्णय पण दिलेला नाही. यावरुन त्यांनी आपली वैधानिक जबाबदारी टाळली असे दिसून येते व अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. आज त्यांची इतरही अपील होते. व इतरही अपीलांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी त्यांनी घेतलेली नव्हती व त्यामुळे कदाचित आज त्यांनी आयोगापुढे हजर राहाण्याचे टाळले असावे, असे दिसून येते. एकतर अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन करायचे व त्याप्रमाणे आयोगापूढे सुध्दा हजर राहाण्याचे टाळायचे ही प्रवृत्ती आयोगाचा अवमान करणारी आहे व त्याबध्दलची दखल ही विभागीय शिक्षण

उपसंचालक यांनी घेणे आवश्यक आहे. व त्याबाबतची ताकिद त्यांना देण्यात येवून सदरची बाब त्यांच्या गोपनिय अहवालामध्ये घेणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १९.६.२००६ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १,३,४,५ व ६ प्रमाणे झालेल्या कार्यवाहीची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.६.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशीची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ३ महिन्यांच्या आंत करुन त्याबध्दलचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्ह परिषद, नागपूर यांना स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २१.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४१६/२००७**

**१) प्रा. राम माधवराव हळदे,**
**ह.मु.ता.नेर (शिवाजीनगर)**
**जिल्हा- यवतमाळ.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. परंतु, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे "काही अपरिहार्य कारणास्तव माझे विचारानुसार सदर अपील खारीज करण्यासाठी हरकत नाही. करीता सदर अर्ज सादर करण्यात येत आहे," असे लेखी दिलेले आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सुध्दा " सदर अर्ज माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव आपणाकडे सविनय सादर करण्यात येत आहे. सदर अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी विनंती केल्यानुसार अपील खारीज करण्यात यावे. भविष्यात अपीलकर्ता यांनी या संदर्भीय आपीलाबाबत आक्षेप घेतल्यास मी जबाबदार राहील," असे लेखी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक २१.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३९९/२००८**

**१) श्री गोविंदराव फकरुजी आत्राम,**
**C/o व्ही.जी. आत्राम, फॅारेस्ट कॅालनी, पुसद,**
**ता. पुसद, जिल्हा यवतमाळ.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**४) उप मुख्य कार्यपालन अधिकारी (सामान्य प्रशासन)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी ही दिनांक ९.५.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. व त्याकरीता दिनांक ४.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना नोटीस सुध्दा काढण्यात आलेल्या आहेत. आज उत्तरवादी यांनी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात एक अर्ज दाखल करुन निदर्शनास आणून दिले की, सरदच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता त्यांनी पुर्वी सुध्दा दिनांक २९.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते व त्याच द्वितीय अपीलाची प्रत ही पुन्हा आयोगाकडे द्वितीय अपील म्हणून दाखल केलेली आहे.

अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११७७/२००७ मध्ये दिनांक १०.३.२००८ रोजी निर्णय देण्यात आलेला असून सदरचे अपीलातील वस्तुस्थिती ही दिनांक २१.९.२००६ हया कार्यालयात प्राप्त दिनांक ५.१०.२००६ रोजीचे अपील प्रमाणे आहेत. तसेच दिनांक ३०.७.२००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ च्या अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. त्याच अर्जाची छायांकित प्रत सदरच्या विद्यमान अपीलात सुध्दा दाखल केलेली आहे. व त्यामुळेच एक अपीलाच्या संदर्भात निर्णय झालेला असताना पुन्हा त्याच अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय देणे हे योग्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे नवीन दाखल केलेले अपील क्रमांक ३९९/२००८ हे खारीज करण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी

**दिनांक २१.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४२०/२००७**

**१) श्री अजय लक्ष्मण टप**
**मु.पो. ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा चाळीसबोधा**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**कृषि विभाग, ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**कृषि अधिकारी कार्यालय, मलकापूर**
**ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कृषि विभाग, तालुका मलकापूर म्हणून मलकापूर तालुक्यातील सिमेंट बंधारे झालेल्याची माहिती मिळण्याबाबत, मलकापूर तालुका सिमेंट बंधारे बांधकाम किती अपूर्ण, किती झाले माहितीबाबत. माहितीचा कालावधी २००४-२००५. माहितीचे वर्णन १) जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशाची प्रत. २) एकुण किती सिमेंट बंधारे पुर्ण झाले त्याची झेरॅाक्स प्रत ३) टेंडर काढले तयाची झेरॅाक्स प्रत ४) किती मजूरांना काम दिले ५) प्रत्येक बांधकाम केलेल्या बंधा-याचे मस्टर पेमेंटची झेरॅाक्स प्रत. माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी दिनांक १३.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००६ रोजी दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. मात्र प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १४.९.२००६ रोजी प्राप्त झाले होते, अपील केले नाही वगैरे अशा प्रकारचा खुलासा केलेला दिसून येतो. व त्यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारे काळजीपुर्वक अवलोकन केले नाही, असे दिसते. माहिती काढून ठेवलेली आहे. परंतु, व्यक्तीश: घेण्यासाठी आले नसल्यामुळे दिली नाही असे उत्तरवादी यांनी सांगितले. परंतु, त्याबाबत पुढील कार्यवाही केलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही. यावरुन एकुणच या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी दोषी आढळून येतात. त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याबध्दल कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागीतलेल्या माहितीप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला नाही किंवा आलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये आयोगाकडे

सुध्दा खुलास केलेला नाही व त्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) जिल्हा कृषि अधिकारी, बुलढाणा यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीचे अहवाल आयोगाकडे ३ महिन्यांत सादर करावा. त्याकरीता निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने जिल्हा कृषि अधिकारी, बुलढाणा यांचेकडे पाठवावी.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकिद देण्यात येत आहे.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २२.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**१) अपील क्रमांक१४२२/२००७**
**२) अपील क्रमांक१४२३/२००७**

**१) श्री अशोक सुखदेवराव बोर्डे,**
**मु.पो. वाडी इसापूर, ता. तेल्हारा**
**जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तेल्हारा**
**(कृषि उत्पन्न बाजार समिती द्वापार)**
**ता. तेल्हारा, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अध्यक्ष, वानप्रकल्प पाणी वापर सहकारी संस्था शिखर संघ मर्या. तेल्हारा,**
**ता.तेव्हारा, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहेत. दोनही अपीलांची आज सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**<u>अपील क्रमांक १४२२/२००७</u>** :- मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून, अध्यक्ष, शिखर महासंघ वानप्रकल्प विभाग, तालुका तेल्हारा यांचेकडे शिखर महासंघाचे प्रवर्तक श्री र.श. तिडके आहे. ते वानप्रकल्पाचे लाभधारक आहे काय. शिक्षर महासंघाकडे याचा पुरावा आहे तो देण्यात यावा. २) प्रवर्तक यांचे ७/१२ चा उतारा द्यावा. ३) प्रवर्तक लाभधारक नसल्यास कोणत्या नियमानुसार शिखर महासंघ स्थापन केला आहे. ४) प्रवर्तक यांचे कारकिर्दीत झालेल्या सभेंचे प्रोसिडींग बुकाची नक्कल देण्यात यावी. टिपः ही सर्व

माहिती अध्यक्ष या नात्याने आपणाकडे आहे तरी सदर माहिती त्वरीत देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००६ रोजी प्रथम अपील सहाय्यक निबंधक, कृषि उत्पन्न बाजार समिती आवार तेल्हार यांचेकडे दाखल केलेले दिसून येते.

२. दिनांक १४.१०.२००६ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तेल्हारा यांना अध्यक्ष, वानप्रकल्प पाणी वापर सहकारी संस्थेचा शिखर संघ मर्या. तेल्हारा यांनी "सर्व पाणी वापर संस्थाचे अध्यक्षांच्या सभा लवकर होत आहे. अध्यक्षांशी चर्चा करुन श्री अशोकराव बोर्डे यांनी मागीतलेली संस्थेविषयीची माहिती योग्य ती लवकर देण्यात येईल," असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.१०.२००६ रोजी श्री तुळशिराम देवरावजी ढोले, अध्यक्ष वानप्रकल्प पाणी वापर सहकारी संस्था शिखर संघ मर्या. तेल्हारा यांना "उपरोक्त विषयानुसार प्राप्त अर्जदार श्री अशोक सुखदेवराव बोर्डे यांचे अपील अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.९.२००६, दिनांक ११.१०.२००६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यात आली असे दिनांक १४.१०.२००६ च्या अर्जाने कळविलेले आहे. अर्जदाराने केलेले अपील योग्य असल्याचे दिसून येत असून माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पुरविली नसल्याचे निष्पन्न होत आहे. तरी सदर प्रकरणी अर्जदारानी मागीतलेली माहिती, माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या विहित तरतुदीनुसार तात्काळ पुरविण्यात यावी, असा आदेश देण्यात येत आहे. प्रतिलीपी अर्जदार यांना त्यांचे अपील अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, उपरोक्त आदेशाप्रमाणे त्यांनी माहिती प्राप्त करुन घ्यावी, " असे कळविलेले दिसून येते.

**अपील क्रमांक १४२३/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००६ रोजी शिखर महासंघ स्थापन करणे व त्याबाबतची माहिती पुरविणे. १) अध्यक्ष म्हणून आपली निवडणुक झाली किंवा नेमणुक झाली याबाबतची माहिती २) शिखर महासंघाचे सभासद कोण आहेत त्यांची नांवे व पत्ते ३) अ.क्रं. २ दर्शविलेल्या व्यतिरिक्त सभासद कां करण्यात आले नाही माहिती द्यावी ४) शिखर महासंघाचे सभासद कोणास होता येते माहिती द्यावी. ५) शिखर महासंघाच्या जास्तीत जास्त व कमीत कमी किती सभासद होऊ शकतात. ६) शिखर महासंघाचे

अध्यक्ष निवडण्यासाठी जास्तीत जास्त सभासद करण्यासाठी काय कारवाई केली जसे- अ) कोणत्या वर्तमाण पत्रात जाहिरात दिली अथवा जाहिर पत्रक जाहिर निवेदने काढले होते काय त्याची माहिती देण्यात यावी. ब) जास्तीत जास्त सभासदाशी कसा संपर्क साधला पुरावा देण्यात यावा. ७) शिखर महासंघाचे अध्यक्ष या नात्याने आतापर्यंत कोणता प्रस्ताव अथवा पत्रव्यवहार तसेच शेतक-यांच्या अडचणी विषयी वान प्रकल्प विभागशी मांडल्या हया बाबत प्रती देण्यात यावी. ८) आपले अध्यक्षतेनुसार कारकिर्द मध्ये झालेल्या सभेचे प्रोसिडींग बुकाची आजपर्यंत ठरावांच्या नक्कल मिळणे बाबतची माहिती पुरविण्यात यावी. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. परंतु, अध्यक्ष, वानप्रकल्प पाणी वापर सहकारी संस्था शिखर महासंघ मर्यादित यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे. " वानप्रकल्पाचे लाभधारकांना सिंचन विषयक प्रगती व प्रकल्पाची यशस्वीतेकडे वाटचाल करण्यसाठी नाशिक जिल्हयातील वाघाड प्रकल्पासारखा महासंघ स्थापन केला. महासंघ स्थापन करण्यासाठी पाटबंधारे खात्यातील अधिका-यांनी मार्गदर्शन केले व कायदेशिर मार्गाने शिखर महासंघ स्थापन केला. व यामध्ये सहाय्यक निबंधक, तेल्हारा यांनी मंजूरी दिलेली आहे. सद्या महासंघाकडे कोणत्याही प्रकारचा पैसा नाही. माहिती मागणारी व्यक्ती लाभक्षेत्रामध्ये लाभधारकांमध्ये अयोग्य पत्रके वाटून कलुषित करतो. यासाठी आपणाकडे सुनावणीसाठी येताना वकीलाची नियुक्ती करावयाची होती. परंतु, पैशा अभावी तेव्हा करु शकलो नाही. आपण पाठविलेल्या नोटीसचा मान ठेवण्यासाठी मी माझ्या स्वखर्चाने आलो आहे. मी आपणास निवेदन सादर करतो की, मला कोठेही हजर राहावयाचे कळविले तरी माझा जाण्यायेण्याचा व प्रवासातील खर्चाचा भार शासनाने सोसावा अन्यथा मी हजर राहाण्यास हतबल आहे. त्याचप्रमाणे सादर करतो की, आपण मला अधिनियमाच्या प्रमाणे कोणत्याही प्रकारची शास्ती लावू नये, ही विनंती. " सदरच्या खुलाशासोबत श्री ढोले यांनी सभासद पावतींची छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. सभासदांनी शेअरपोटी जमा केलेली रक्कम तसेच प्रवेश फी वगैरे जमा केलेली आहे ती सदरची सर्व रक्कम ही बँकेमध्ये जमा केलेली असून सहाय्यक

निबंधक यांच्या परवानगीशिवाय सदरची रक्कम काढता येत नाही व त्यातून खर्चही करता येत नाही. तसेच संघास कोणत्याही प्रकारे शासनाकडून निधी मिळत नाही. संघ हा फक्त पाणी वापर संस्थेमध्ये समन्वय साधण्यासाठी गठीत केलेला संघ आहे. व त्यामुळे सदरचा संघ हा सार्वजनिक प्राधिकरण होत नाही, असे त्यांनी तोंडी सांगीतले. त्यावर दिनांक १४.१०.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन देणार असे आपण कां लेखी दिले, असे विचारले असता त्यांनी असे सांगीतले की, माहिती उपलब्ध आहे परंतु पाठविण्यासाठी पैसे नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी स्वत: माहिती उपलब्ध करुन घेतल्यास ती त्यांना देता येईल.

४. असे असले तरी अध्यक्ष, वानप्रकल्प पाणी वापर संस्था शिखर संघ मर्या. यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले असल्यामुळे सदरची माहिती ही अशोक सुखदेवराव बोर्डे यांनी व्यक्तीश: खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले- अपील क्रमांक १४२२/२००७ २) अपील क्रमांक १४२३/२००७ अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००६ च्या दोनही अर्जात मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने अध्यक्ष, वानप्रकल्प पाणी वापर सहकारी संस्था शिखर संघ मर्या. यांचेकडून माहितीच्या खर्चाचे विवरण उपलब्ध करुन घेवून त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती व्यक्तीश: उपलब्ध करुन घ्यावी. व अपीलकर्ता हे स्वत: खर्चाचे विवरण घेण्यास आल्यास तसे ते त्यांना देवून खर्चाचा भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २२.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३७४/२००७**

**१) श्री हरदास किसन पाटील,**
**बजाज नगर प्लॉट क्रं. १३६,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रं. २, नागपूर शहर,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**पोलीस उपआयुक्त कार्यालय, नागपूर** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.४.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून पोलीस उपआयुक्त यांचेकडे Details of patient admitted name Madan Kisan Patil admitted in Meyo Hospital, Nagpur by Wadi Police Station on १३.९.२००४ as missing person. सदरची माहिती पर्सनली घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१०.२००६ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी यांनी संबंधीत उपविभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त यांना माहिती अधिकारी तसेच संबंधीत उपविभागाचे पोलीस उपआयुक्त यांना अपीलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. करीता आपला अर्ज संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे आपणास माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आलेला असून आपण परस्पर त्यांच्याशी संपर्क साधून माहिती प्राप्त करावी. सदरच्या पत्राची प्रत ही शासकिय माहिती अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर नागपूर शहर यांना अग्रषित केलेली दिसून येते.

४. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २९.१०.२००६ रोजी श्री पी.डी. गवई, शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सदर विभाग यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या रा. १३६ बजाजनगर, नागपूर-१० या पत्यावर आपण मागीतलेली माहिती या कार्यालयास संपर्क साधून घेवून जाण्याबाबत आपणास कळवून त्याची प्रत या कार्यालयास पाठविली. तरी आपली दिनांक ३०.९.२००६ चे अर्जाचे अनुषंगाने माहिती घेवून जाण्यास या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.१.२००७ रोजी अर्जदार यांना पोलीस स्टेशन वाडी मार्फत दिनांक १३.९.२००६ रोजी मेयो हॉस्पीटल येथे मदन किसन पाटील यांना भरती केल्याबाबत कोणतीही नोंद पोलीस स्टेशनच्या रेकार्डवर उपलब्ध नाही. तसेच सदर इसम हरविल्याबाबतची नोंद मिसिंग रजिस्टर मध्ये आढळून आलेली नाही, असे पोलीस निरीक्षक वाडी यांनी कळविले आहे.

५. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००७ रोजी मिळाले आहे. असे असले तरी दिनांक १७.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी उपआयुक्त पोलीस, झोन क्रं.२ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अमितेश कुमार, पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्रमांक २ यांनी दिनांक १३.९.२००४ रोजी "मेयो हॅास्पीटल येथे भरती केल्याबाबत कोणतीही नोंद पोलीस स्टेशनच्या रेकार्डवर उपलब्ध नाही व हरविल्याबाबतची नोंद सुध्दा मिसिंग रजिस्टर मध्ये आढळून आलेली नाही. तसेच मेयो हॅास्पीटल येथून माहिती घेतली असता दिनांक १३.९.२००४ रोजी मदन किसन पाटील या पेशंटची नोंद काही मिळून आलेली नाही. यापूर्वी आपणास पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१ यांनी त्यांचे कार्यालयीन जावक क्रमांक पोउपआ/परि-१/नाग/वाचक/०७-२४३, दिनांक १५.१.२००७ अन्वये माहिती पुरविलेली असून आपले प्रकरण हे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन अंबाझरी यांचे हद्दीतील असल्याने आपण संबंधीत अधिका-यांशी पत्रव्यवहार करावा" असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमो मध्ये कोणत्याही प्रकारची योग्य माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे त्यांनी नमूद केलेले आहे.

६. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.९.२००६ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी Details of patient admitted असे जे म्हटलेले आहे व नांव मदन किसन पाटील असे दिलेले आहे, तारीख १३.९.२००४ दिलेली आहे व त्यामुळे सर्वसाधारणपणे मेयो हॉस्पीटलचे दिनांक १३.९.२००४ चे आवक रजिस्टर शोधणे हे साहजिकच आहे. व मदन किसन पाटील हे नांव दिनांक १३.९.२००४ रोजी दिसत नसेल तर त्याप्रमाणे उत्तर हे दिलेले दिसून येते.

७. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मदन किसन पाटील हे बेशुध्द होते. व त्यांना दिनांक १३.१०.२००४ रोजी मेयो हॉस्पीटल येथे मदन किसन पाटील म्हणून ओळखले आहे. याचा अर्थ दिनांक १३.९.२००४ ते १३.१०.२००४ पर्यंत त्या व्यक्तीचे नांव हे कोणालाही माहिती नव्हते. व त्यामुळे नांव दिलेले असल्यामुळे शोध हा त्या नांवाच्या व्यक्तीचा घेतला हे नैसर्गिक आहे. व त्यामुळे चुकीची माहिती दिलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. दिनांक २९.१०.२००६ चे जे पत्र आहे ते सुध्दा माहिती उपलब्ध आहे, घेवून जावी, असे असल्यामुळे कार्यपध्दतीप्रमाणेच आहे. व मुदतीत आहे. कारण अपीलकर्ता यांनी मुळ अर्ज हा अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केला होता. जन माहिती अधिकारी यांचेकडे तो अर्ज दिनांक १६.१०.२००६ रोजी पाठविण्यात आलेला होता व त्यामुळे दिनांक २९.१०.२००६ चे पत्र हे मुदतीत असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली किंवा विलंबाने माहिती दिली असा निष्कर्ष काढता येत नाही. दिनांक २९.१०.२००६ चे पत्र हे, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मिळालेले नाही. अपीलकर्ता यांना इतर सर्व पत्र, नोटीसेस मिळातात. दिनांक २९.१०.२००६ चे पत्र त्यांना दिलेल्या पत्यावरच दिलेले आहे,ते मात्र त्यांना मिळत नाही. असे असले तरी सदरच्या पत्रास जावक नंबर असल्यामुळे सदरचे पत्र हे माहिती अधिकारी यांनी पाठविलेले आहे हे गृहीत धरण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जरी दिनांक ४.१.२००७ रोजी मिळाली असली तरी सदरची माहिती ही त्यांनी स्वत: न घेतल्यामुळे विलंबाने दिलेली आहे, हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केल्यावर अर्जदाराने व्यक्तीश: माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी

यांचेकडे जाणे क्रमप्राप्त आहे. कोणत्याही प्रकारे पत्राने माहिती येईल किंवा माहिती पाठवून देतील ही अपेक्षा करता येत नाही. व त्यामुळे सुध्दा अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती वस्तुस्थितीप्रमाणे असून कार्यपध्दतीप्रमाणेच आहे.

८. प्रथम अपील सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाल्याच्या नंतरच दाखल केलेले आहे. सदरचे पत्र सुध्दा दाखल करावयास काहीही कारण नव्हते. व त्यामुळे द्वितीय अपील सुध्दा दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २.२.२००७ रोजी योग्य ते उत्तर त्यांना मिळाले आहे व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २२.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९६/२००७**

**१) श्री  कृष्णा गणबाजी ठवरे**
**मु.पो. पारशिवणी, ता. पारशिवणी**
**जिल्हा नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक, शाखा काटोल**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २३.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००६ रोजी व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक, शाखा काटोल यांना राज्य शासकिय माहिती अधिकारी म्हणून १) शासनाच्या आदेशाची प्रत २) करारनाम्याची प्रत व हमी घेणा-याची माहिती ३) कर्ज परतीचे हप्ते किती हप्त्याची रक्कम ४) कर्ज परतीची मुदत. सदरची माहिती टपालाने धेणार असे नमूद केलेले दिसून येते. माहितीचा विषय कर्जाची माहिती असा दिलेला आहे परंतु कर्ज कोणाचे याचा तपशिल दिलेली नाही. अपीलकर्ता यांना खुलासा विचारला असता स्वत:चे कर्जाबाबतची माहितीच त्यांनी मागीतली. परंतु दिनांक १७.११.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र यांचेकडून प्राप्त परिपत्रकाचे अनुषंगाने आपणास कळवू इच्छितो की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा आमच्या बँकेला लागू होत नसल्यामुळे आपण मागीतलेली माहिती पुरविण्यास आम्ही असमर्थ आहो. ( संदर्भ : सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रक जावक क्रमांक अर्वनि/के.मा.अ./शा.प्रा.अ./२००६).

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात सुध्दा महाव्यवस्थापक श्री दि.अे. अलोणी यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा करताना सदरच्या वर नमूद केलेल्या परिपत्रकाचा संदर्भ दिलेला असून माहितीचा अधिकार अधिनियम हा सदरच्या बॅंकेस लागू होत नाही. तसेच पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅंक लि. अमरावती यांनी सुध्दा सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे स्थगनादेश प्राप्त केल्याचे कळते. व सदरच्या प्रकरणाचा निकाल लागेस्तोवर श्री कृष्णा गणबाजी ठवरे यांचे प्रकरण संस्थगित ठेवावे अशी विनंती दिनांक ३१.१.२००८ रोजी केलेली होती. सदरची विनंती मान्य करुन एप्रिल, २००८ मधील मुदत द्यावी असे आदेश दिले होते. व त्याप्रमाणे आज सदरचे द्वितीय अपील सुनावणीस ठेवण्यात आलेले आहे.

४. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅंक लि. अमरावती यांचे प्रकरणात मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी स्थगनादेश दिलेला आहे,असे निदर्शनास आणले असले तरी सदरचा स्थगनादेश हा सर्वच सर्वच सहकारी बॅंकांच्या संदर्भात नसून पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅंक लि. करीताच असल्यामुळे इतर सहकारी बॅंकांच्या संदर्भात तो लागू होईल किंवा नाही हे निश्चित करता येत नाही. व, सदरच्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाचा निर्णय येईल तोपर्यंत इतर सर्वच बॅंकांच्या संदर्भात व्यक्तींना माहिती उपलब्ध करुन देणे हे अशक्य होईल व त्यातही सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती माहिती ही त्यांच्या स्वत:च्या कर्ज खात्याचे संदर्भात आहे. त्यांच्या स्वत:च्या कर्ज खात्याच्या संदर्भात असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ४० प्रमाणे स्वत:च्या खात्याची माहिती ही प्रत्येक सभासद किंवा खातेदारास उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. व त्याअर्थाने सुध्दा अपीलकर्ता यांना त्यांच्या कर्ज खात्याच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध करुन देणे हे बॅंकेचे कर्तव्य ठरते व त्यामुळे जरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या संदर्भात अधिनियम लागू आहे किंवा नाही ही बाब अनावश्यक असली तरी सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे

संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी स्वतःच्या कर्ज खात्याच्या बाबत माहिती मागीतलेली असल्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भात त्यांना छायांकित प्रती हया उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदरच्या छायांकित प्रतीच्या खर्चाचे विवरण हे अपीलकर्ता यांना कळवून त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २३.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४३४/२००७**

**१) श्री कु. संगिता श्रीराम मडावी,**
**तालुका नियंत्रक, महिला विकास परिषद,**
**मु.पो. सेंदूरवाफा, ता.साकोली, जिल्हा भंडारा**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २४.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर यांचेकडे माहे ऑगष्टला घेण्यात आलेल्या आरोग्य सेविकेची वेतन श्रेणी व पुर्नवसनासंबंधी अशी माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले असून जोडपत्रामध्ये जे दिनांक १४.१२.२००६ ची प्रत आहे ती जिल्हा परिषद आरोग्य विभाग, गोंदियाद्वारा सदर आरोग्य सेविकांची जी पुरविण्यात आलेली आहे ती कोणत्या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेली आहे व त्याची वेतन श्रेणी किती घेण्यात आलेली आहे व तसेच त्याची नेमणुक ही दुर्गम व डोंगराळ नक्षलग्रस्त व अति नक्षलग्रस्त या भागात देण्यात आलेली आहे व अशा क्षेत्रात काम करताना एखाद्या आरोग्य सेविकेसोबत दुदैवाने घटना घडली तर त्यांचे पुर्नवसनाकरीता आरोग्य सेवकाकडून कोणती प्रक्रिया व्यवस्था (योजना) करण्यात आलेली आहे, अशी विचारणा केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ५.१.२००७ रोजी उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर यांनी जिल्हा

आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना कुमारी संगिता श्रीराम मडावी, तालुका नियंत्रक महिला विकास परिषद, मु.पो. सेंदुरवाफा, तालुका साकोली, जिल्हा भंडारा यांना आरोग्य सेविकेची वेतन श्रेणी व पुर्नवसनासंबंधीची माहिती मागीतलेली आहे. सदर माहिती आपल्या कार्यक्षेत्रातील असल्यामुळै सदर माहिती विहित मुदतीत संबंधीतांना पुरविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. व सदरच्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उप संचालक यांचेकंडेच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही.

अपीलकर्ता यांचे अर्जाचे संदर्भामध्ये खुलासा सादर करतांना उप संचालक यांनी असे सांगीतले की, सदरची माहिती ही जोडपत्रात म्हटल्याप्रमाणे गोंदियाच्या संदर्भात असल्यामुळे सदरचा अर्ज हा ज्ल्हिा आरोग्य अधिकारी हे माहिती अधिकारी असल्यामुळे जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे पाठविण्यात आला आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी तोंडी असे सांगीतले की, दिनांक ५.२.२००७ रोजी जावक क्रमांक ५१३/२००७ प्रमाणे अपीलकर्ता यांस दिनांक १८.१२.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात त्यांना तीन मुद्यांवर व त्यानंतर तीन मुद्यांच्या बरोबर आदेशाच्य छायाकिंत प्रती हया उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.२.२००७ चे पोस्टाचे संदर्भामध्ये प्रमाणपत्र असलेले व पोस्टाने पाठविलेले इतर टपालाच्या सोबत टपाल पाठविलेले आहेत, असे प्रमाणपत्र सादर केलेले आहेत. त्याचप्रमाणे जावक नोंदवहीमध्ये सुध्दा सदरचा जावक क्रमांक ५१३ ची नोंद आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही टपालाने पाठविली हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. कोणत्याही प्राधिकरणाने माहिती पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना जावक वहीमध्ये नोंद असेल व पोस्टाचे प्रमाणपत्र असेल तर ती

माहिती किंवा तो पत्रव्यवहार पुर्ण झाला आहे असे समजण्यात येते. अपीलकर्ता यांना जी माहिती पाठविलेली आहे ती त्यांनी माहितीच्या अर्जात दिलेल्या पत्यावर आहे व त्यामुळे माहिती पाठविलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपील हे पुन्हा उपसंचालक यांचेकडेच केले आहे. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी हे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया हे असल्यामुळे त्यांच्याकडे प्रथम अपीलाचा निर्णय घेण्याकरीता पाठविण्यात आलेला होता. कुमारी संगीता श्रीराम मडावी यांनी त्यावर असे सांगीतले की, त्यांना जी माहिती आता उपलब्ध करुन दिलेली आहे त्या अर्जावर तारखेची खोडतोड केलेली आहे. परंतु सदरचा अर्ज हा मुळातच कार्यालयामध्ये दिनांक २१.१२.२००६ रोजी प्राप्त झालेला असल्यामुळे दिनांक १४/१२ किंवा १८/१२ असे कोणताही फरक माहितीच्या अधिकारी यांचे संदर्भामध्ये कार्यालयाच्या दृष्टीने गौण ठरतो. व त्यामुळे अशा प्रकारची खोडतोड जन माहिती अधिकारी यांनी केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. स्टॅाम्प जो दिलेला आहे त्यावर १८/१ ही एकच तारीख आहे ती खोडतोड केली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरता येत नाही. अपीलकर्ता यांना माहिती पुर्वीच उपलब्ध करुन दिलेली होती. पुन्हा त्यांना आता माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे खुलाशामध्ये म्हटलेले आहे. सदरच्या माहितीच्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, प्रत्यक्ष माहितीच्या संदर्भामध्ये तपासणी केली असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या जोडपत्रातील ३ मुद्यांच्या अनुषंगाने सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपीलकर्ता यांनी तोंडी युक्तिवाद करताना असे सांगितले की, मानधनाच्या संदर्भामध्ये तफावत करण्यात आलेली आहे, वगैरे त्याचप्रमाणे त्यांना कोणत्याही प्रकारे नियुक्ती देण्यात आलेली नाही असे सांगीतले. परंतु, सदरचा मुद्या राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. राज्य माहिती आयोगास माहिती उपलब्ध करुन देणे या मर्यादेपर्यंतच अधिकार असल्यामुळे गुणवत्तेच्या संदर्भामध्ये निर्णय करता येत नाही. सदरची माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यांच्यां मनातील प्रश्नांच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांची काही तक्रार असेल तर त्यांनी ती तक्रार उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे

योग्य त्या सक्षम अधिका-याकडे करणे योग्य राहील. व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खरीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना दिनांक ६.२.२००७ रोजी व त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २४.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४३६/२००७**

**<u>अपील क्रमांक १४३६/२००७</u>**

**१) श्री शिवसिंग चत्तरसिंग सुरडकर**
**मु.पो.गोदरी, ता. चिखली, जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी श्री जी.एम. कडाळे**
**उप कार्यकारी अभियंता, विद्यूत भवन, म.रा.वि.वि.कंपनी मर्या.**
**चिखली रोड जिल्हा बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**अधीक्षक अभियंता कुर्वशी साहेब, वी.वी.क. बुलढाणा.** **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक १४३७/२००७</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी श्री जी.एम. कडाळे**
**उप कार्यकारी अभियंता, विद्यूत भवन, म.रा.वि.वि.कंपनी मर्या.**
**चिखली रोड जिल्हा बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**बुलढाणा.**

**( आदेश पारित दिनांक २४.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर असून उत्तरवादी यांचे तर्फे Advt. Shri R.E. Moharir व Advt. Mrs P.R. Moharir हजर आहेत.

२. **अपीलक क्रमांक १४३६/२००७** :- मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी मौजा गोदरी येथील दिनांक १३.६.२००६ चा शिवसिंग सुरडकर यांच्या तक्रार अर्जावरील कार्यवाही, आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल- विद्युत चोरीचा तक्रार अर्ज अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी प्रथम अपील उप कार्यकारी अभियंता, विद्युत भवन यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. व सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.८.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दिनांक २३.८.२००६ रोजी अधीक्षक अभियंता यांनी माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभाग, बुलढाणा यांना पत्राद्वारे माहितीचा अधिकार या विषयांतर्गत अर्जदाराने माहिती मागविलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. तरी त्याबाबतची सविस्तर माहिती विचारल्याप्रमाणे ७ दिवसांचे आंत मंडळ कार्यालयात सादर करावी. माहिती न आल्यास संपुर्ण जबाबदारी आपली राहील, असे कळविलेले दिसून येते. सहपत्र तक्रार अर्ज-१ असे जोडलेले दिसून येते.

४. माहिती अधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपले संदर्भिय पत्र क्रमांक २ बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास संदर्भिय पत्र क्रमांक ३ नुसार सादर केलेला आहे. तसेच पत्र क्रमांक १ मध्ये श्री सुरडकर यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे "आपण विचारणा केल्याबाबतचा खुलासा सुध्दा या कार्यालयास पत्र क्रमांक ३ मध्ये अंतर्भूत आहे. याची अतिरिक्त प्रत या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे" असे कळविलेले दिसून येते. सोबत दिनांक ११.७.२००६ च्या अहवालाची प्रत जोडलेली आहे व सदरच्या अहवालामध्ये श्री सुरडकर यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी केलेली दिसून येते. व त्यानंतर दिनांक २१.११.२००६ रोजी श्री सुरडकर यांना त्यांच्या दिनांक १८.८.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध

करुन दिलेली आहे. सदरच्या उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या विलंबाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांचा मुळ तक्रार अर्ज हा मुख्य कार्यकारी संचालक, म.रा.वि.वि.कंपनी सब डिव्हीजन, अमरावती यांचेकडे दाखल केलेला असल्यामुळे त्या संदर्भात कार्यवाहीची माहिती मात्र त्यांनी अधीक्षक अभियंता श्री कुवैशी साहेब, वि.वि.क.,बुलढाणा यांचेकडे मागीतलेली असल्यामुळे सदरच्या अर्जाचा प्रवास हा अर्थातच विलंबाने झालेला दिसतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मात्र विलंबाने उपलब्ध झालेली आहे.

५. अपीलकर्ता यांनी जो तक्रार अर्ज केलेला होता त्या तक्रार अर्जाची चौकशी दिनांक ११.७.२००६ रोजीच्या अहवालावरुन झालेली दिसून येते व त्याबध्दलची माहिती योग्य त्या जन माहिती अधिका-यांस माहिती मागितली असती तर विहित मुदतीत मिळाली असती व त्यामुळे सदरच्या विलंबास अपीलकर्ता स्तत:च जबाबदार आहे. अपीलकर्ता हे प्रथम अपील सुध्दा माहिती अधिकारी यांचेपेक्षा कनिष्ठ अधिकारी यांचेकडे करतात, असे प्रथम अपीलीावरुन दिसते. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दिनांक ९.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. सदरच्या प्रमाणे विलंबाचा मुद्दा निकाली निघतो. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक १३.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २१.११.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती अपूर्ण आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी व त्यांचे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, श्री खंडु बारी, सखाराम बारी व श्री तुकाराम बारी यांच्याबध्दल चौकशी केली होती. परंतु त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची बाब आढळून आलेली नसल्यामुळे त्यांचा उल्लेख उत्तरात केला नाही. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आजही बारी यांचे संदर्भामध्ये अवैद्य विज संदर्भामध्ये आहे तीच परिस्थीती कायम आहे. त्यावर उत्तरवादी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्ता यांनी आतापर्यंत त्यांच्याकडे अनेक माहितीचे अर्ज केलेले असल्यामुळे व अनेक अर्जामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अनावधानाने सदरची माहिती त्या उत्तरामध्ये देण्याचे राहून गेलेले दिसते.

**<u>अपील क्रमांक १४३७/२००७ :-</u>** अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, बुलढाणा यांचेकडे सहाय्यक अभियंता श्री मधुकर हाके

यांचे विरोधात दिनांक १७.५.२००६ ला दिलेला तक्रार अर्ज अपमानीत केल्याबध्दल माहिती मागीतलेली असून माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.१०.२००६ रोजी प्रथम अपील श्री जी.एम. कडाळे कार्यकारी अभियंता, विद्यूत भवन, म.रा.वि.वि.कंपनी मर्या.बुलढाणा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. व सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.८.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने उत्तरवादी यांनी दिनांक २८.८.२००६ रोजी उत्तर दिलेले आहे, असे सांगीतले व त्याप्रमाणे उत्तर दाखल केलेले आहे. सदरच्या उत्तरामध्ये " आपला संदर्भिय अर्ज प्राप्त झाला असून आपणास आवश्यक असलेली माहितीच्या तपशिला पुढे आपण सहाय्यक अभियंता श्री मधुकर हाके यांचे विरोधात दिनांक १७.५.२००६ रोजी दिलेला तक्रार अर्ज अपमानित केल्याबध्दल असा उल्लेख केलेला आहे. परंतु, आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत काहीही कळविलेले नाही. आपला दिनांक १७.५.२००६ चा तक्रार अर्ज सहाय्यक अभियंता यांनी अपमानित केले हे आपल्या तक्रारीचे स्वरुप आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपण आवश्यक ती माहिती मागू शकता. परंतु, एखाद्या विरुध्द आपली तक्रार असेल तर त्याचे निरसन कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी, बुलढाणा यांचेकडे सविस्तर तक्रार दाखल करुन दाद मागावी किंवा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपणास कोणती माहिती हवी आहे, याचा खुलासा करावा ," असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही, असे उत्तरवादी यांचे वकील यांनी सांगीतले. तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपीलात सदरच्या पत्राचा उल्लेख केलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १७.५.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे, तो अर्ज जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांचेकडे दिलेला आहे व त्या अर्जाची प्रतिलीपी ही वरिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी, बुलढाणा, ठाणेदार साहेब, पोलीस स्टेशन, चिखली यांचेकडे दिलेली होती, असे उत्तरवादी यांनी आयोगाचे निदर्शणास आणले. व यावरुन मात्र अपीलकर्ता यांनी

माहितीच्या अधिकारात जी माहिती मागीतली आहे ती माहिती ही योग्य त्या जन माहिती अधिका-यांकडे मागीतली नाही, असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जो अर्ज जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडे दिलेला आहे, तो त्यांनी कार्यवाहीसाठी दिलेला आहे, असे सांगीतले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांचकडे माहिती मागणे हे अपेक्षित होते. ज्या कार्यालयामध्ये प्रतिलीपी दिली जाते ती त्या कार्यालयामध्ये माहितीसाठी असते. त्यासंदर्भात कार्यवाहीची अपेक्षा नसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी शासकिय माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, बुलढाणा यांचेकडे दिनांक १७.५.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती मागणे हे अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नाही. सदरची माहिती सुध्दा त्यांनी संदिग्ध व मोघम मागीतलेली आहे. व त्यामुळे दिनांक २८.८.२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी जे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले आहे ते पत्र योग्य आहे. तसेच दिनांक ९.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांना दिलेले उत्तर सुध्दा योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने ज्या ज्या स्तरावर माहिती उपलब्ध असते त्या त्या स्तरावर जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे व त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिका-यांची प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करणे अशी तरतूद आहे जेणेकरुन मागीतलेली माहिती ही कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांत उपलब्ध होऊ शकेल. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज एका सार्वजनिक प्राधिकरणाकडे केला व त्या अर्जाच्या वरील कार्यवाहीची माहिती मात्र दूस-या सार्वजनिक प्राधिकरणास मागीतली असल्यामुळे सदरचा अर्ज मुळात हा विचारात घेण्यासारखा नाही. व त्यामुळे सदरचे अपील हे सकृत दर्शनीच खारीज करण्यास पात्र आहे.

७. वरील दोनही अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी सामायिक असा खुलासा दाखल केला तो खालीप्रमाणे आहे-

" अर्जदार श्री शिवसिंग चतरसिंग सुरडकर रा. गोद्री ता. चिखली यांनी सर्व प्रथम माहिती अधिकारी बुलढाणा यांचेकडे माहिती अधिकारी अधिनियम २००५ अन्वये दि. १८.८.२००६ ला अर्ज केला होता. त्यामध्ये त्यांनी अर्जाचा विषय सहाय्यक अभियंता मधुकर हाके साहेब यांचा दिनांक १७.५.२००६ ला दिलेला अर्ज अपमानीत केल्याबध्दल असा होता

अर्जासोबत सविस्तर कांहीही जोडले नव्हते. तसेच नेमकी कोणती माहिती पाहिजे यांचा स्पष्ट उल्लेख नव्हाता. या अर्जाची दखल घेवून माहिती अधिकारी बुलढाणा यांनी त्यांचे पत्र क्रं. ६७१८ दि. २८.८.२००६ नुसार अर्जदारास उत्तर दिले. त्यामध्ये अर्जदारास नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत कांहीही कळविले नसल्याने माहिती अधिकारी यांनी याबाबत अर्जदारास नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा खुलासा करण्याबाबत कळविले तसेच माहिती अधिकारी यांना देखील दि. १७.५.२००६ च्या पत्राबाबत कांहीही माहिती नव्हती. त्यामुळे विषय न कळल्यामुळे अर्जदारास कळविले. त्यावर अर्जदाराने कांहीही कळविले नाही. परंतु, दिनांक ४.९.२००६ ला अर्जदाराने वरील विषयाबध्दलच परत माहिती मिळण्याबध्दल अर्ज केला. याच दरम्यान आधी नियुक्त केलेले माहिती अधिकारी श्री व्ही.एस. राजपूत यांच्या ऐवजी नवीन माहिती अधिकारी श्री एच.एच. नारखेडे सहा. अभियंता (विभागीय कार्यालय) बुलढाणा यांची नियुक्ती मुख अभियंता अकोला यांच्या दिनांक २९.८.०६ च्या आदेशान्वये दि. ८.९.०६ पासून करण्यात आली. मध्यंतरी दि. १७.५.०६ च्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता बुलढाणा यांनी श्री मधुकर हाके, सहाय्यक अभियंता चिखली यांची चौकशी करुन बयान नोंदविले तसेच दिनांक १७.५.२००६ चा तक्रार अर्ज मा. पोलीस अधिक्षक बुलढाणा यांना अग्रेषित असल्यामुळे पोलीस स्टेशन ऑफीसर चिखली यांनी देखील या तक्रारीची पोलीस विभाग मार्फत स्वतंत्र चौकशी केली. पोलीस स्टेशन ऑफिस चिखली यांनी त्यांचा चौकशी अहवाल पोलीस अधिक्षक बुलढाणा यांना सादर केला. त्यांनी केलेल्या चौकशीची सबंधीताकडून दूरध्वनी द्वारे माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांनी माहीती घेतली. तसेच कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या चोकशीची माहिती  सुध्दा घेतली व त्यानुसार अर्जदारास माहिती अधिकारी बुलढाणा यांनी पत्र क्रं.८०५४ दि. ९.११.०६ नुसार अर्जदारास सविस्तर माहिती दिली. त्या पत्रांमध्ये अर्जदाराच्या दि. १७.५.२००६ च्या तक्रारीचा सविस्तर खुलासा केलेला आहे.

त्यानंतर अर्जदाराच्या प्रथम अपिल दि. ३१.१०.०६ चा अर्ज १.११.०६ ला प्राप्त झाला. त्या अर्जाची दखल घेवून अपिलीय अधिकारी बुलढाणा यांनी सविस्तर चौकशी करुन अर्जदारास पत्र क्रं.८०५६ दि. ९.११.०६ नुसार निर्णय कळविला. याबाबत सन्माननीय राज्य माहिती

आयोगास सविनय विनंती की अर्जदारास प्रामाणिकपणे वेळोवेळी मुदतीच्या आंत सर्व माहिती दिलेली आहे. तरी देखील अर्जदार प्रत्येक वेळी वेग वेगळया तारखा टाकून माहिती मागत आहे. अर्जदाराच्या तक्रारीची पोलीस विभागामार्फत देखील चौकशी झालेली आहे. त्या चौकशी अहवालाची सत्यप्रत विभागीय कार्यालयाला प्राप्त झाली असून त्यामध्ये पोलीस स्टेशन अधिकारी चिखली यांनी अर्जदार हा त्याचे चक्कीचे कनेक्शनवर मंजूर ५ एच.पी. ऐवजी १३.५ एच.पी. म्हणजेच ८.५ एच.पी. जास्तीचा भार अवैधपणे जोडून वापरत होता व घरातीलही कनेक्शन अवैध सुरु होते. त्याचे हे कनेक्शन विज वितरण कंपनीच्या सहा. अभियंता चिखली व त्यांच्या सहका-यांनी दिनांक १०.४.०६ ला पकडल्यामुळे कायदेशिर पंचनामा करुन त्यांना रु. ८९००/- रुपयांचा अवैध वापराबध्दल दंड ठोठावण्यात आला व तो त्यांनी दि. २०.४.०६ रोजी भरला.

सदर अर्जदार यांनी जास्तीची विज वापरल्याने त्यांना अतिरिक्त दंड झाल्यामुळे अर्जदार यांनी जाणूनबूजून चिडून कनिष्ठ अभियंता व सहा. अभियंता चिखली यांचे विरोधात खोटा तक्रार अर्ज दिलेला आहे, असे पो. स्टेशन चिखली यांच्या चौकशीमध्ये देखील निष्पन्न झालेले आहे. याच प्रकारे कार्यकारी अभियंता बुलढाणा यांनी श्री मधुकर हाके सहा. अभियंता चिखली यांची चौकशी करुन ते दोषी नसल्याचे कळविले आहे.

महोदय, वरील कारणांमुळेच अर्जदार हा विज वितरण कंपनीच्या अधिका-यांविरुध्द त्रास देण्याचे दुष्ट हेतूने माहिती अधिकारांतर्गत प्रत्येक वेळी वेगवेगळया तारखा टाकून दि. ४.५.०६ पासून ते २०.११.०६ (द्वितीय अपिलापर्यंत ) पर्यंत माहिती मागत आहे व प्रत्येक वेळी त्यांना माहिती वेळेत देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्जदाराने दि. ६.१०.०६ रोजी मा. जिल्हा ग्राहक न्यायमंच बुलढाणा यांचेकडेही जवळ जवळ याच प्रकारची तक्रार दाखल केली होती. त्यावर मा. ग्राहक न्यायमंचाने सदर तक्रार दि. २०.१२.०६ च्या आदेशान्वये खारीज केलेली आहे. तसेच विज वितरण कंपनीच्या अधिका-यांनी श्री शिवसिंग सूरडकर यांनी वर्षेगणती थकीत असलेले रु. ३००३० /- बील न भरल्यामुळे त्यांचा विज पुरवठा खंडीत केला असतो त्यांनी विज पुरवठा पैसे न भरता अवैधपणे जोडून घेतला होता. अवैधपणे जोडून घेतलेला वीज पुरवठा परत तोडण्यासाठी अधिकारी गेले असता अर्जदारांनी त्यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली या प्रकारची फिर्याद कनिष्ठ अभियंता चिखली यांनी पोलीस स्टेशन चिखली येथे गुन्हा

क्रं. ३०७/७० अन्वये दाखल केलेली आहे. अर्जदाराने विज पूरवठा तर तोडून दिला नाहीच उलट कनिष्ठ अभियंत्या विरुध्द पोलीस कान्स्टेबल व महिल कॅान्स्टेबल सोबत असतांनाही खोटी विनयभंगाची तक्रार केली. परंतु, पोलीस व महिला पोलीस हे सोबत असल्यामुळे व त्यांना सत्य परिस्थिती माहिती असल्यामुळे त्यांनी त्यांची केस पोलीस स्टेशन मध्ये घेतली नाही त्यामुळे अर्जदाराने सदर विनयभंगाची तक्रार चिखली न्यायालयात प्रायव्हेट फौजदारी म्हणून दाखल केली आहे व ती केस सध्या न्यायप्रविष्ठ आहे. अर्जदार हा प्रामाणिकपणे विजेचा वापर व विज देयकाचा भरणा न करता अधिका-यांविरुध्द खोटया नाटया तक्रारी करुन अधिका-यांचे मनोर्धर्य खच्ची करण्याचा प्रयत्न करीत आहे व माहिती अधिकाराचा सुध्दा दुरुपयोग करुन त्रास देण्याचा मार्ग अवलंबित आहे.

तरी सन्माननीय आयोगास नम्र विनंती की, वरील बाबीची योग्य ती दखल घेवून न्या द्यावा, ही विनंती. "

८. वरील खुलाशाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांची विज चोरी ही पकडलेली होती. त्याबध्दल त्यांना दंडही ठोठावण्यात आलेला होता. तसेच त्यांनी ग्राहक मंचात सुध्दा त्यांनी तक्रार केलेली होती व सदरची तक्रार ही खारीज करण्यात आलेली आहे. व त्यानंतरच अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे वीज मंडळातील अधिका-यांकडे अनेक अर्ज सादर केलेले दिसून येतात. त्यातही उत्तरवादी यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की, सदर अर्जदार यांनी जास्तीची वीज वापरल्यामुळे त्यांना दंड झाल्यामुळे अर्जदार यांनी चिडून कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता, चिखली यांचे विरोधात खोटी तक्रार अर्ज दिलेला आहे. कार्यकारी अभियंता, बुलढाणा यांनी श्री हाके यांची चौकशी करुन ते दोषी नसल्याचे कळविलेले आहे. व यावरुनच अपीलकर्ता यांनी सदरचा अर्ज हा व्यापक जन हिताचे दृष्टीने दाखल न करता स्वहिताच्या दृष्टीने स्वतःचे गैरकृत्याचे समर्थनार्थ दाखल केलेला दिसून येतो व हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा गैरवापर आहे. सदरच्या चोरी प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांनी खुलासा करण्याचा प्रयत्न केलाला आहे परंतु खुलासा मात्र ५ एच.पी. ऐवजी १३.५ एच.पी म्हणजे ८ एच.पी. जास्तीचा वीज भार अवैद्यपणे चोरुन वापरत नव्हता वगैरे.. .. जो खुलासा आहे त्या खुलाशामुळे समर्थन ठरत

नाही. तसेच कनिष्ठ अभियंता, चिखली यांनी पोलीस स्टेशन चिखली येथे दिनांक गुन्हा क्रमांक ३०१७/२००७ दाखल केलेला आहे. व त्या संपूर्ण खुलाशावरुन अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४३६/२००७ हे सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४३६/२००७ व अपील क्रमांक १४३७/२००७ या मध्ये अपीलकर्ता यांना विहित मुदतीत अर्जाच्या संदर्भात कळविलेले असल्यामुळे व अपील क्रमांक १४३६/२००७ मध्ये माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे दोनही अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २४.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४४०/२००७**

**१) श्री महेशचंद्र दामोदरप्रसाद गुप्ता**
**पंचशिल सर्व्हीस स्टेशन इंडस्ट्रिज इस्टेट,**
**मुल रोड, चंद्रपूर-३३२४०१**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा चेअरमन**
**चांदा औद्योगिक सहकारी वसाहत, मुल रोड,**
**चंद्रपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २५.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी विना अनुमतीने गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल करण्यात आली असून कार्यालयीन अधीक्षक, उद्योग सहसंचालक कार्यालय, नागपूर हया हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२०६ रोजी चंद्रपूर उद्योग वसाहतीला शासनाने मंजूर केलेल्या भूखंडाचा मूळ ले आऊट व नकाशा प्रमाणित प्रत नोंदणीकृत टपालाने मिळावी म्हणून राज्य शासकिय माहिती अधिकारी, आयुक्त, उद्योग भवन, मुंबई यांचेकडे मागीतलेली दिसून येते. परंतु, दिनांक २१.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ अन्वये अशा प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या आस्थापनेतील शासकिय माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे कायद्यान्वये बंधनकारक आहे. आपण मागीतलेली माहिती चांदा औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित चंद्रपूर या संस्थेस शासनाने जमीन तसेच भाग भांडवल दिलेले असल्यामुळे ही संस्था सुध्दा सार्वजनिक

प्राधिकरणामध्ये येत असून आपण या संस्थेकडे जोडपत्र - अ मध्ये अर्ज करणे कायद्यान्वये आवश्यक आहे. सोबत आपले जोाडपत्र-अ अर्ज चेअरमन, चांदा औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, चंद्रपूर, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१ यांचेकडे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. आपण परस्पर वरील संस्थेशी आपणास हव्या असलेल्या माहितीसाठी मागणी करावी, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ३०.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी अध्यक्ष, चांदा औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, चंद्रपूर, मुल रोड यांना माहिती करीता अर्ज केलेला दिसून येतो. दिनांक ४.१२.२००६ रोजी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर यांनी चेअरमन, चांदा आद्योगिक सहकारी वसाहत यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु, विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, दिनांक २१.१२.२००६ रोजी श्री चुनीलालजी भवानजीभाई चव्हाण, चेअरमन, चांदा औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे कळविलेले दिसून येते. व ती उद्योग विभागाकडून उपलब्ध होताच उपलब्ध करुन देता येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ५.१.२००७ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना पत्र देवून सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिली. पुन्हा दिनांक २२.१.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक यांनी अपीलकर्ता यांना सदरच्या सहकारी औद्योगिक वसाहतीस माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दिनांक ११.१२.२००६ नुसार कळविण्यात आले आहे असे कळविलेले दिसून येते. मात्र सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे अपीलकर्ता

यांनी दिनांक १७.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयास कळविलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४४२/२००७**

**१) श्री राजु किसन वानखेडे,**
**श्रीराम वार्ड, बल्लारपूर,ता.बल्लारपूर**
**जिल्हा चंद्रपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**नवजीवन माध्यमिक विद्यालय, गोजोली,**
**ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २५.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नवजीवन माध्यमिक विद्यालय, गोजोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून यते. "आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- पुढील प्रमाणे माहिती पाहिजे. क्रं.शिक्षण/माध्य/६०३/२००६, कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. चंद्रपूर दिनांक १९.११.२००६ (१) श्री एन.डल्यू. भ्सारकर यांच्या रुजू प्रतिवेदनाची सत्यप्रत,मान्यता प्रस्तावाची सत्यप्रत तसेच इतर बाबी (२) शाळेची सिनिआरीटी यादी झेरॉक्स सत्यप्रत (सध्याची) (३) रोस्टरची सत्यप्रत (प्रचलित) (४) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सेवेत कायम केल्याचा आदेशाच्या सत्यप्रती (५) शैक्षणिक सत्र ९८-९९ च्या कर्मचारी हजेरी पुस्तक (स्वाक्षरी करण्याचे) च्या सत्यप्रत आदि छायांकित प्रती पाहिजे. " सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे

नमूद केले आहे. परंतु, दिनांक १४.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहिती देण्यात येते की, क्रमांक शिक्षण/माध्य./६०३/२००६, कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर दिनांक १३.११.२००६ चे पत्रान्वये श्री एन.डब्ल्यू. भसारकर यांची केस न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे केलेल्या आदेशानुसार त्यांना रुजू करुन घेतले नाही. शाळेमध्ये शिक्षकांची पदे रिक्त नसल्यामुळे व श्री भसारकर यांची केस न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे त्यांचे सेवासंबंधाने कोणतीही माहिती देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.१२.२००६ रोजी मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) शिक्षण विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ११.१.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मुख्याध्यापक यांना सुनावणीसाठी व माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आदेश दिलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना सुध्दा दिली आहे. पुन्हा दिनांक १९.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मा. शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. दिनांक २२.१.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी पुन्हा मुख्याध्यापक यांना माहितीच्या संदर्भामध्ये पत्र दिलेले दिसून येते. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नव्हती. परंतु, दिनांक १९.४.२००८ रोजी त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ५ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली होती, असे अपीलकर्ता यांनी सांगितले. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी विवेचन करुन सांगितले व त्यांची काही माहिती नंतर उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असेही सांगितले व त्याबाबत त्यांचे समाधान झाले आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे.

३. असे असले तरी, त्यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही, असे जे अपीलकर्ता यांना कळविले आहे त्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण करणे जरुरीचे असल्याने अधिनियमांच्या कलम ८ मध्ये माहिती प्रकट करण्याकरीता अपवाद दिलेले आहेत, त्या कलम ८ मधील पोटकलम (१) (ख) मध्ये " कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यासाठी स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे माननीय न्यायालयाचा अवमान होऊ शकतो अशी माहिती " प्रकट करण्यास

अपवाद करण्यात आलेला आहे व त्यामुळे कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ट आहे म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही हे म्हणणे त्या कलमाशी सुसंगत नाही. जी माहिती स्पष्टपणे न्यायालयाने प्रकाशित करु नये असे आदेश दिलेले असतील ती माहिती किंवा जी माहिती प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होइल अशी माहिती. अर्थातच, त्या संदर्भामध्ये एखाद्या पक्षकाराची माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली माहिती ही उपलब्ध करुन दिल्यास न्यायालयाच्या अवमान होईलच असे नाही, त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नसते.

४. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी सद्‌भावनेने सदरची माहिती नाकारलेली असल्यामुळे व तसेच अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान झालेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झालेले असल्यामुळे सदरची अपील ही निकाली काढण्यात येत आहे.

**२)** निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४१२/२००७**

**१) श्री रत्नाकर नारायणराव बुरांडे,**
**द्वारा-श्री शिवाजीराव रनवे, ५५८, चिटणविस नगर**
**पंचवटी आश्रम मागे, उमरेड रोड, नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष (संस्था)**
**रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, काटोल रोड,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, काटोल रोड,**
**नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २५.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी (प्राप्त दिनांक २४.७.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २१.४.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, नागपूर यांचे तर्फे वकील श्री प्रदिप अग्रवाल सुनावणी करीता हजर झाले होते. त्यांनी उत्तरवादी यांचे म्हणणे दाखल करण्याकरीता वेळ देण्यात यावी, अशी विनंती केली असल्यामुळे आज दिनांक २५.४.२००७ पर्यंत उत्तरवादी यांचे म्हणणे दाखल करण्याकरीता मुदत दिली होती. आज सुध्दा सदरचे अपील हे दूपारी २ नंतर ७ क्रमांकावर सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले आहे. परंतु, १७.०० वाजता सुध्दा उत्तरवादी यांचे वकील यांनी उत्तरवादी यांचे म्हणणे दाखल केलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकुण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी प्राचार्य, रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, काटोल रोड, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली माहिती

मिळण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जामध्ये " आपल्या रामदेवबाबा इंतिनिअरिंग कॅालेजमध्ये वरील (१९८९ ते १९९५) दिलेल्या कालावधीत श्री जानबाजी शंकरराव मस्के हे विज्ञान परिचारक (लेबोरेटरी अटेन्डेंट) हया पदावर कार्यरत होते. अशी माहिती आहे. अ) श्री जानबाजी शंकराव मस्के हे आपल्या कॅालेजमध्ये निश्चित कोणत्या पदावर, कोणत्या वर्षापासून ,कोणत्या वर्षापर्यंत कार्यरत (काम करीत) होते त्याची बिनचुक माहिती द्यावी. ब) त्यांच्या त्या कालावधीत किती पगार होता. कोणत्या वर्षापासून तर कोणत्या वर्षापर्यंत त्यांनी किती पगार घेतला, शेवटचा पगार त्यांनी कधी घेतला, त्याची बिनचुक माहिती द्यावी. क) कोणत्या वर्षापर्यंत त्यांनी सेवा केली व किती पगार घेतला " याची माहिती मागीतलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी अध्यक्ष (संस्था) रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, काटोल रोड, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय हा विहित मुदतीत दिला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांचे युक्तीवादाप्रमाणे रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेजची ही संस्था धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजिबध्द केलेले आहे. तसेच रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज मध्ये जो शैक्षणिक अभ्यासक्रम राबविल्या जातो तो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विश्वविद्यापीठ, नागपूरशी संलग्न असल्यामुळे विद्यापीठ अधिनियमाप्रमाणे नियंत्रित केले जाते. व नागपूर विद्यापीठाची पदवी दिली जाते. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण देत असल्यामुळे सार्वजनिक कामकाजाचे कार्य (public interest) हे महाविद्यालयाच्या माध्यमातून होते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी हयाप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सदरच्या रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज किंवा संस्थेस लागू होतात व त्यामुळे सदरच्या महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे हे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या संस्था किंवा महाविद्यालयाने जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे केली नसल्यामुळे त्यांनी माहिती ही प्राचार्य, रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज, काटोल रोड, नागपूर यांचेकडे मागीतलेली आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही सार्वजनिक प्राधिकरण म्हणून रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॅालेज किंवा संस्था यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे जन माहिती अधिकारी नियुक्त करुन विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु सदरची माहिती त्यांना विहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे सदरच्या संस्थेतील पदाधिकारी जे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असेल ते दोषी आढळून येतात. तसेच संस्थचे अध्यक्ष जर प्रथम अपीलीय अधिकारी असेल तर प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून संस्थेचे अध्यक्ष यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक २३.४.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागीतलेली माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना सदरची माहिती १० दिवसात रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन न दिल्यास सदरचे महाविद्यालयातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, महापालिका मार्ग कं. ३, मुंबई यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २५.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३३/२००७.

श्री. मनोहर नारायणराव जोशी
"साईप्रभा" अपार्टमेंट, दुध केंद्राजवळ,
गोरेपेठ, नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.नि.र.वऱ्हाडपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा,
"संस्कृत भवनम्" जवाहर विद्यार्थी गृहाजवळ,
वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१.

श्री.सी.एस.वर्णेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा,
"संस्कृत भवनम्" जवाहर विद्यार्थी गृहाजवळ,
वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१ मे २००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी, सचिव, राज्य जनमाहिती अधिकारी म्हणून संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, "संस्कृत भवनम्" यांचेकडे संस्थेच्या आर्थीक तथा इतर व्यवहाराविषयी वित्तीय वर्ष १९९४-९५ ते १९९९-२००० सहा वर्षाचा कालावधी. १) रोकड वही, लेजर बुक, व्हावचर फाईल, २) पावती पुस्तक (सर्वसाधारण), रेकॉर्ड निरिक्षणासाठी तारीख व वेळ कळवावी. ३) कार्यकारिणी ठराव पुस्तिका,

... २



४) जमा खर्चाचे विवरण आणि वार्षिक इतिवृत्त, ५) संस्कृत भवितव्यम् साप्ताहिकाच्या वर्गणीदारांची यादी तसेच ग्राहकांना विनामूल्य वितरणाची यादी. ६) वर्गणीदाराचे रजिस्टर, ७) मानधन रजिस्टर, ८) पत्र व्यवहाराचे आवक जावक रजिस्टर, ९) अंशकालीन शिक्षक व कर्मचारी यांचे हजेरी पुस्तक, १०) अग्रीम रजिस्टर, ११) दिनांक ७ व ८ सप्टेंबर, २००६ ला लेखाधिकारी, शिक्षण विभाग, नागपूर यांनी १९९८-९९ ते २००५-०६ या वर्षाच्या अंकेक्षण अहवाल व तद्संबंधी पत्र व्यवहाराची

फाईल मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून डॉ.नि.र.वऱ्हाडपांडे, अध्यक्ष, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल कलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही व निर्णय उपलब्ध इ ाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी पूर्वी दिनांक ५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयुक्त कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये तक्रार अर्ज दाखल केला होता. सदरच्या तक्रार अर्जात संस्थेला महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी अनुदान मिळते. परंतु माहितीचा कायदा अंमलात येवून १ वर्षापेक्षाही जास्त कालावधी उलटला असून या संस्थेच्या कार्यालयातील १) राज्य जनमाहिती अधिकारी, २) अपीलीय अधिकारी याबाबत नामफलक अद्यापही लावलेला नाही म्हणून तक्रार केली होती. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता तक्रारदार यांनी श्री.एन.आर. पत्तरकिने, सचिव यांनी महालेखाकार, महाराष्ट्र, नागपूर यांना २००१-२००२ या वर्षाचे संदर्भातील पत्राची प्रत दाखल केलेली होती व त्या प्रती मध्ये This applicant is a public trust registered under the Bombay Public Trust Act and fully aided by the Govt. of India. असे नमुद केलेले असल्यामुळे व सदरच्या तक्रारीच्या सुनावणीस संस्कृत भाषा प्रचारिणी सभा सहकार्यवाह श्री.प्र.श.सेनाड हे हजर होते. त्यांनी सांगितले की, सदरची संस्था ही धर्मदाय संस्था असून शासनाचे फक्त ५,०००/- रुपये अनुदान मिळते व सर्व सदस्य ऑनररी सभासद म्हणून काम करतात. असे असले तरी सदरच्या सभासदांना त्या संस्थेस शासनाचे अनुदान मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक

... ३



आहे व सदरची नियुक्ती झाल्यानंतर कार्यालयाच्या बाहेर नामफलक लावणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा आदेश देण्यात आला होता. आदेश दिनांक २.४.२००७ रोजी देण्यात आला होता.

४. सदरच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये संस्कृत भाषा प्रचारिणी सभा तर्फे जो खुलासा दाखल करण्यात आला आहे त्या खुलाश्यामध्ये श्री.मनोहर नारायणराव जोशी यांनी दिनांक ८.३.२००७ व दिनांक १२.४.२००७ या तारखांना संस्कृत भाषा प्रचारिणी सभा या सेवा संस्थेला दोन पत्रे पाठवून काही माहिती मागितली. सदर पत्रांची उत्तरे न देण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत. १.१) ज्या संस्थांकडून अशी माहिती मागण्याचा अधिकार आहे त्यांना या Act ने Public Authority असे म्हटले आहे व Public Authority ची जी व्याख्या दिली आहे त्यातील A, B, C व D ही कलमे सदर संस्थेला लागू पडत नाहीत हे स्पष्ट आहे. कलम I / II हे लागू आहे असे वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः तो देखील लागू होत नाही. कारण त्यात वरील Public Authority चा अर्थ Body ouned, Contolled or substantially fuianced, directly or indirectly by funds provided by appropriale Governmentछ असे नमुद करण्यात आलेला आहे. सदर संस्कृत भाषा प्रचारिणी सभेचे वार्षिक बजेट चार लाखावर असून, सरकारी अनुदान केवळ अकरा हजार पाचशे रुपये मिळते. तसेच या सर्व रकमांच्या हिशेबाचे ऑडीट मा.धर्मदाय

आयुक्त कार्यालयातर्फे वेळोवेळी होत असते. सबब ही संस्था वरील प्रमाणे Substantally aided by Government या कलमात बसत नाही. १.२) श्री. मनोहर जोंशी यांना "संस्कृत भाषा प्रचारिणी सभा ही वरील प्रमाणे माहिती अधिकार कायदाखाली येत नाही" ही बाब मा.धर्मदाय आयुक्त, नागपूर यांच्याकडे त्यांनी केलेल्या फिर्यादीवरील कामकाजाचे वेळी, तेथील अधिकाऱ्यांनी देखील स्पष्टपणे सांगितली नाही. वरील मुद्यांचा विचार करता श्री. मनोहर जोशी यांना संस्थेने उत्तर देणे अपेक्षित नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ प्रमाणे आपणासमोरील तक्रार क्रमांक ९/२००७ मधील आपले विवेचन व त्यावरील आपल्या दिनांक २.४.२००७ च्या निर्णयाचे कृपया अवलोकन करावे व त्यानुसार संस्कृत भाषा प्रचारिणी सभा या संस्थेला माहितीचा अधिकार लागू आहे किंवा नाही या विषयावर पडदा पडलेला आहे. या निर्णयाचे संदर्भात उत्तरवादी संस्थने आजतागायत कोणतीही निर्णय घेतलेला नाही त्यामुळे हा निर्णय संस्थेवर पूर्णतः बंधनकारक

... ४



आहे. या प्राश्र्वभूमीवर संस्थेच्या दिनांक १५.९.२००७ च्या पत्राची दखल घेण्याची मुळीच आवश्यकता भासत नाही. त्यामुळे संस्थेतर्फे दिनांक १५.९.२००७ चे उत्तरात दिलेली माहिती ही विसंगत व खोडसळपणाची वाटते. कारण यापूर्वी याविषयाचे संदर्भात संस्थेच्या सचिवांनी महालेखाकार, (ए व ई) द्वितीय, महाराष्ट्र, नागपूर यांना पाठविलेल्या त्यांचे पत्र क्रमांक एसकेटी-३५/२००१-०२, दिनांक १५.१२.२००१ च्या परिच्छेद १ मध्ये स्पष्ट नमुद केले की, This applicant is a public trust registered under the Bombay Public Trust Act and fully aided by the Govt. of India. असे असतांना दिनांक १५.९.२००७ च्या उत्तरात/पत्रात त्यांनी घेतलेली भूमिका ही सोयीस्कररित्या आपले अधिकार क्षेत्र टाळण्यासाठीच घेतली आहे. १) ही संस्था शासनाच्या पूर्णतया नियंत्रणाखाली येते या संदर्भात Bombay Public Trust Act Chapter VI Control च्या संलग्न प्रतीचे कृपया अवलोकन करावे. २) माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंतर्गत सरकारी खात्यां बरोबरच शैक्षणिक संस्था धर्मदाय संस्था यांचा पण अंतर्भाव होतो या संबंधित पेपर कटींग सुध्दा संलग्न आहे. एकंदरीत वरील विवेचन व संलग्न पत्रे लक्षांत घेवून संस्थेचे दिनांक १५.९.२००७ च्या पत्राद्वारे दिलेले टाळाटाळीचे व दिरंगाईचे उत्तर माननीय आयुक्तांनी खारीज क रुन तक्रारकर्त्याने मागितलेल्या रेकॉर्डचे Inspetion ची परवानगी देवून उपकृत करावे तसेच दिरंगाई व टाळाटाळी बद्यल उत्तरवादी संस्थेवर माहिती अधिकार कायद्याअंतर्गत योग्य ती कारवाई करावी अशी विनंती केलेली आहे. त्यावर पुन्हा संस्था सचिव यांनी खुलासा करतांना त्यात एच या अक्षराखाली चPublic authorityछ ची व्याख्या दिली आहे. या व्याख्येतील ए.बी. व सी. हे संस्कृत भाषा प्रचारिणी सभेला स्पष्टपणेच लागू नाहीत. एच खालील ii व iii लागू आहेत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. पण ही कलम एच मध्ये म्हटल्याप्रमाणे सरकारी नोटिफिकेशनने निर्माण केलेल्या संस्थासाठी आहेत. संस्कृत भाषा प्रचारिणी सभा कोणत्याही सरकारी नोटिफिकेशनने निर्माण केलेली नाही. त्यामुळे ही कलमे सभेला लागू होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व पुन्हा दिनांक ४.१.२००८ रोजी आयोगाच्या आदेशानुसार खुलासा केलेला आहे. खुलाश्यामधील परिच्छेद २) मध्ये या संस्थेचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे पावणे पाच लाख रुपये (रुपये ४,७५,०००/-) रकमेचे असून, यातील बहुतांश रक्कम या संस्थेच्या विविध उपक्रमातून उभी केली जाते. तसेच संस्कृत, ऊर्दु, फारसी सारख्या अभिजात भाषांची परंपरा टिकविण्याच्या लोकोपयोगी कार्याला प्रोत्साहनपर मदत देण्याचे आपल्या राज्य व केंद्र सरकारांचे धोरण आहे. त्यानुसार राज्य

... ५



सरकारच्या शिक्षण विभागातर्फे संस्थेला पाच हजार रुपये (रुपये ५,०००/-) ची वार्षिक मदत मिळते. याच धोरणांतर्गत आपल्या केंद्र सरकारच्या स्वायत्त मानित राष्ट्रीय संस्कृत संस्थान डिम्ड विद्यापीठातर्फे मान्य केलेले तेरा हजार पाचशे रुपये (रुपये १३,५००/-) संस्कृत प्रचारकाचे मानधन संस्थेमार्फत अदा केल्या जाते. तसेच सभेच्या संस्कृत प्रचाराचे वार्तापत्र "भवितव्यम्" ची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने याच डिम्ड विद्यापीठातर्फे सहा हजार पाचशे रुपयांची (रुपये ६,५००/-) वार्षिक मदत मान्य केली आहे. (एफ नं. ३६०१०/१९२/२००६-०७/योजना द्वितीय/१०७६) ही स्कीममार्फत मदत आहे. ३) अशा प्रकारे मिळणाऱ्या सरकारी योजनेतील मदतीतून संस्थेने संस्कृत प्रचारासाठी व्याख्यानांचे आयोजन, पुस्तक खरेदी, प्रकाशनांचे विनामूल्य वितरण, संस्कृत तज्ञांचा सत्कार, स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. हे कार्य ही संस्था विधिवत पारपाडीत असते. यात संबंधितांची कुठलीही तक्रार नाही. थोडक्यात या संस्थेला अभिजात भाषांच्या प्रोत्साहनपर उपक्रमासाठी मिळणारी धोरणात्मक सरकारी मदत एकूण वार्षिक अंदाजपत्रकांच्या रकमेपेक्षा दोन टक्के देखील नाही. सबब ही संस्था माहिती अधिकाराच्या व्याख्येनुसार (RTI Act see २ h (i) (ii)) Substantially fuianced by Government)छ या सदराखाली येत नाही. ४) त्याचप्रमाणे ही सभा एक सरकारी कचेरी किंवा संस्थान (P S U) नसल्यामुळे त्याच RTI Act नुसार Body owned by the Governmentछ या प्रकारातील देखील नाही. ५) या सभेचे विविध उपक्रम ठरवितांना सरकारी पूर्वानुमती घेणे बाध्य नाही, कारण की Body controlled by Governmentछ या सदरातील संस्था नाही. तरी देखील देशाच्या नागरिकांप्रमाणे किंवा खाजगी संस्था प्रमाणेच ही सभा घटनात्मक कायद्यानुसार वरील सर्व आर्थीक व्यवहारांचे रीतसर लेखापरीक्षण करवून त्याचा अहवाल मा. धर्मादाय आयुक्तांना सादर करीत असते. एवढयावरुन या सभेला Body controlled by Government असे म्हणता येणार नाही. सदर अपीलाचे अर्जदार देखील काही काळ या सभेत मानधनावर स्वेच्छेने सेवा देण्याचे काम करीत होते. ते स्वतः पेंशनधारी निवृत्त सरकारी कर्मचारी आहेत. हल्ली त्यांनी या सभेविरुध्द मा.धर्मादाय आयुक्तांकडे, शिक्षण विभागाकडे तसेच नव्या माहिती अधिकाराखाली तक्रारी करणे सुरु केले आहे. यात त्यांचा हेतु समाजहिताचा वाटत नाही. नुकतेच मा.राज्य माहिती आयुक्त श्री.विनय कुवळेकर यांनी नवीन माहिती अधिकाराच्या मागे समाजहिताचा उद्येश आवश्यक असल्याचे प्रतिपादन के ले आहे. तसेच केंद्र माहिती आयोगाने देखील अशा रीतीने माहिती अधिकाराचा दुरुपयोग करुन

... ६



संस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्नांवर ताशेरे ओढले. या दोन्ही वृत्तांच्या संदर्भाने अपीलाचा विचार केला असता सदर अर्जदाराच्या दुरुद्येशाने संस्था कार्यावर विनाकारण विपरीत परिणाम होत असल्यामुळे तसेच ही सभा माहिती अधिकाराखाली येत नसल्यामुळे अर्जदाराचे अपील मान्य करु नये अशी प्रार्थना केलेली आहे. कार्यवाह, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा संस्कृत भवन-२ नागपूर यांना शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे दिनांक १४ जुलै, २००६ च्या पत्रात संस्कृत भाषा प्रचारीणी सभा सन २००६-२००७ करिता अनुदान मंजूर करणेबाबतचे पत्र दाखल केले आहे. उपरोक्त विषयान्वये संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसाराकरिता आपल्या संस्थेला सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात रुपये ५,०००/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले होते त्याअनुषंगाने वितरीत अनुदानाबाबतचे विनियोग प्रमाणपत्र व खर्चाचा अहवाल द्विप्रतीत या कार्यालयास

तात्काळ सादर करावा. अहवाल प्राप्त न झाल्यास आपणास अनुदान मंजूर करता येणार नाही याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच डॉ.प्रकाश पांडे, सहाय्यक संचालक (आर. ॲन्ड पी.) यांनी संस्कृत भवितव्यम् संपादकांना २०००-२००१, २००१-२००२ या वर्षाकरिता दिलेल्या अनुदानाचे संदर्भामध्ये पत्र दिलेले दाखल केलेले आहे. सदरचे विशेष अनुदान ६,७५०/- चे दिसून येते. तसेच राष्ट्रीय संस्कृत संस्थान, डिम्ड विद्यापीठाकडून रुपये १३,५००/- चे अनुदान दिसून येते. यावरुन अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या दाव्याचे संदर्भातील पुन्हा संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, नागपुरम् यांचे वार्षिक इतिवृत्त तपासूनच निर्णय घेणे हे योग्य असे वाटल्यामुळे वार्षिक इतिवृत्त दाखल करण्याये आदेश देण्यात आले होते व त्याप्रमाणे २००५-२००६ चे वार्षिक इतिवृत्त दाखल केलेले आहे. दिनांक ३१.३.२००६ चा जमा व खर्चाचे तक्त्यावरुन असे दिसून येते की, वार्षिक उत्पन्न २,८७,८७१,७५/- रुपये दाखविले आहे व त्यात एकूण अनुदान रुपये ३२,०००/- दाखविले आहे. तसेच दिनांक ३१.३.२००६ पर्यंत आवक व देयके याबाबत दाखल केलेले विवरणामधून केंद्र शासनाकडून २७,०००/- रुपये व राज्य शासनाकडून ५,०००/- अशा प्रकारचे अनुदान दिसून येते. सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकावरुन एकूण अनुदान २७,०००/- व ५,०००/- रुपये दिसून येते. यावरुन सार्वजनिक प्राधिकरण ही संस्था आहे किंवा नाही या निर्णयाचा पुन्हा पूर्ण विचार करणे आवश्यक ठरते. तक्रार क्रमांक ९/२००७ निर्णय दिनांक २.४.२००७ मध्ये जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाचे वेळेस अशा प्रकारे संपूर्ण विवेचन आलेले नव्हते व त्या निकषावरुन पुन्हा सार्वजनिक प्राधिकरणाची

... ७



व्याख्या तपासून पाहणे आवश्यक ठरते. अधिनियमाचे कलम २ (ज) याचा अर्थ "सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ (क) संविधानाद्वारे किंवा तद्न्वये, (ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे, (घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे, स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे व त्यात (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्यांचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो असा निकाय, (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश आहे.

५. या निकषांचे संदर्भामध्ये सदरची संस्कृत भाषा प्रचारिणी सभा ही संविधानाद्वारे संस्थापित नाही. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे संस्थापित नाही. राज्य विधान मंडळाने कोणत्याही कायद्याद्वारे स्थापन करण्यात किंवा घटित करण्यात आलेली नाही किंवा शासनाचे अधिसूचनेप्रमाणे स्थापन करण्यात आलेली नाही. इतर सार्वजनिक न्यास असून Bombay Public Trust खाली पंजीबध्द असा सार्वजनिक न्यास आहे. त्यातही समुचित शासनाना मालकीचा न्यास नाही किंवा शासनाचे निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशा प्रकारची अशासकीय संघटना नाही. अशा अशासकीय संघटनेकरिता शासनाचे अनुदान हे एकूण ४,७५,०००/- रुपये तुलनेत एकूण ३२,०००/- रुपयाचे जवळपास आहेत व त्यातही संस्थेने म्हटल्याप्रमाणे अनुदान हे अटीवर आधारित आहे व त्यामुळे विशिष्ट उपक्रम राबविले तरच अनुदान मिळते व त्यामुळे सदरची सभा ही सार्वजनिक प्राधिकरण म्हणून सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये येणार नाही. अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे धर्मादाय आयुक्त यांचे नियंत्रण आहे व त्यामुळे हे सार्वजनिक प्राधिकरण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. नियंत्रणाचे संदर्भात त्यांना Bombay Public Trust Act च्या तरतुदी

असलेली छायांकितप्रती दाखल केलेली आहे. त्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरच्या संस्थेवर नियंत्रण हे शासनाचे नसून धर्मादाय आयुक्तांचे आहे व त्यामुळे प्रत्येक सार्वजनिक न्यास हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमधील

... ८



सार्वजनिक प्राधिकरण असेलच असे नाही. प्रत्येक न्यास हा त्या त्या न्यासाच्या अटी व शर्तीवर अवलंबून आहे तसेच तर उपक्रम राबविण्याकरिता शासनाची परवानगी आवश्यक नाही असे निदर्शनास आणले आहे व त्यामुळेही सदरचा उपक्रम हा शासनाचा उपक्रम आहे असे म्हणता येत नाही. श्री.एन.आर.पत्तरकिने यांनी दिलेल्या पत्राची छायांकित प्रतीचे विषयाचे इतिवृत्त पाहिल्यास fully aided असे दिसून येत नाही. अर्थात असे त्या वेळेस सचिवांनी महालेखाकार, द्वितीय, नागपूर यांना कां लिहिले हे अपीलकर्ता यांना सांगता येत नाही व त्यामुळे सुध्दा संस्कृत भाषा प्रचारिणी सभा ही सार्वजनिक प्राधिकरण आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यामुळे दिनांक २.४.२००७ रोजी दिलेला निर्णय हा रद्यबातल ठरतो. कोणत्याही प्राधिकरणाने एका वेळेस दिलेला निर्णय हा नवीन बाबी /मुद्ये समोर आल्यास हा बदलता येतो व त्यामुळे सदरचा निर्णय हा बदलणे आवश्यक आहे व सदरची संस्कृत भाषा प्रचारिणी सभा हे सार्वजनिक प्राधिकरण नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १.४.२००८**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३१/२००७ व अपील क्रमांक १२३२/२००७.

श्री. गजानन प्रल्हादराव तेलगोटे
मु.पो. सोमवार वेस, ता. अकोट,
जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.डि.के.देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त, नगर पालिका प्रशासन,
अमरावती विभाग, अमरावती.

सौ.गिता ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अकोट,
जि. अकोला. **.....**
**उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १२३१/२००७ मध्ये दिनांक ९.११.२००५ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी म्हणून तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपालिका, अकोट श्री. आर. आर. चव्हाण यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक १.१.१९८६ ते दिनांक १.१२.१९९० या कालावधीत डॉ.अडोकार अकोट नगरपालिकेचे नगराध्यक्षपदी विद्यमान असतांना त्यांचे कार्यकाळात आकोट नगरातील प्रत्येक सर्व वार्डमध्ये नाली बांधकाम करण्यात आले ते उपरोक्त काळात प्रती वर्षी किती नाली बांधकाम व कुण्या वार्डात

... २



काम केले, त्यावर एकूण किती खर्च झालेत. त्यासंबंधी सर्व कागदपत्रे नालीबांधकाम करणेबाबतचे नगरसेवकांचे ठरावांपासून तर नालीबांधकाम निविदा मंजूरात व नालीबांधकामाचे बील मंजूरात पर्यंतचे सर्व कागदपत्राचे माहिती पुराव्यानिशी देण्याची कृपा

करावी. २) दिनांक १.१.२००५ ते दिनांक १.११.२००५ या कालखंडात डॉ.मनिष मते नगराध्यक्षापदी विराजमान असतांना या कालावधीत अकोट नगरातील सर्वच वार्डमध्ये मंजूर झालेली नाली बांधकामे व पूर्ण झालेली नालीचे सर्व प्रकारचे बांधकामे यासंबंधिचे नालीबांधकाम सर्व वार्ड मध्ये करणेबाबत सर्वच नगरसेवकांनी घेतलेल्या ठरावापासून तर नालीबांधकाम निविदा मंजूरात व मंजूर झालेल्या नालीबांधकामाचे बील मंजूरात पर्यंतचे सर्व कागदपत्रानिशी व पुराव्यानिशी माहिती देण्यात यावी ही विनंती. सदरची माहिती ही दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे व टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.११.२००५ रोजी आपण दिनांक १.१.१९८६ ते १.१२.१९९० या कालावधी मधील अकोट नगरातील प्रत्येक सर्व वार्डामध्ये नाली बांधकाम बाबतचे रेकॉर्ड हे २० वर्षापूर्वीचे असल्यामुळे तसेच सदर रेकॉर्ड गोळा करण्याकरिता १ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्यामुळे सदर आपल्या अर्जानुसार महाराष्ट्र माहितीचा अधिकार अर्जातील माहिती पुरविणे शक्य नाही. तसेच आपण दिनांक १.१.२००५ ते दिनांक १.११.२००५ या कालावधीत अकोट शहरातील सर्वच वार्डातील नाली बांधकाम संबंधित मागितलेली माहिती सुध्दा काढण्याकरिता १ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागतो. त्यामुळे महाराष्ट्र माहितीच्या अधिकार अंतर्गत माहिती पुरविणे शक्य नाही. तरी साधा अर्ज करुन सदर माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.३.२००६ रोजी देण्यात आलेला असून मुख्याधिकारी, नगरपरिषद, अकोट यांनी अपीलकारास त्यांचे अर्जानुसार माहितीचा शोध घेवून व त्यानुसार अपीलकाराकडून नियमानुसार फीची रक्कमेचा भरणा करुन घेवून दिनांक १०.५.२००६ पर्यंत माहिती पुरवावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक ४.६.२००६ रोजी दुपारी २.३० वाजता प्राप्त ६९ पाने दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... ३



३. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक ३.५.२००६/४.६.२००६ अशी तारीख घातलेली व वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक ४.६.२००६ रोजी माहिती प्राप्त झाल्याची पोच असल्याची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, सदरची माहिती दिनांक ३.५.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याच बाबतची पोच त्यांच्या नगरपरिषदेच्या नस्तीवर नाही. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिली हे दाखविण्याकरिता सदरची छायांकित प्रतीवर स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये दिनांक ४.६.२००६ ही तारीख घातली असून प्राप्त ६९ पाने व तारीख ४.६.२००६ ही दाखल केलेली आहे. यावरुन अपीलकर्ता हे सुध्दा प्रामाणिक नाही असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ७.११.२००५ च्या अर्जाप्रमाणे जे उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तरातून व माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहिती ही अतिशय जुन्या कालावधीतील असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याकरिता जी मुदत वाढवून देण्यात यावी अशी विनंती केली आहे ती योग्य आहे असे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रथम अपीलात सुध्दा सदरच्या माहितीचे व्यापक स्वरुप लक्षात घेता दिनांक १०.५.२००६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात यावी ते ही योग्य आहे. तसेच अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलामध्ये ८ मधील (१) मध्ये १ ते ६ क्रमांकाची संपूर्ण जी माहिती मागितली आहे ती माहिती ही नवीन मागितली आहे व त्यावरुन असे दिसून येते की, संदर्भीय माहिती ही व्यापक जनहिताचे दृष्टिने न मागता स्वहिताच्या दृष्टिने मागितली आहे. माहिती अर्जामध्ये जी माहिती मागितली असते त्यापेक्षा नवीन माहिती प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात मागता येत नाही. माहितीच्या अर्जात ज्या काही त्रुटी

असेल त्या संदर्भात प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावयाचे असते. त्यामुळे द्वितीय अपीलात मुद्या ८ मधील १ ते ६ वरील माहिती ही उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. एकंदरच हया प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती जूनी असल्यामुळे विलंबाने उपलब्ध झली असली तरी सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १२३२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००६ रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद, अकोट यांना माहिती मागितलेली दिसून येते. अकोट नगरपरिषद क्षेत्रात घोषीत असलेल्या

... ४



झोपडपट्टीची नांवे ? ज्या झोपडपट्टीत जे उपनगर, मोहल्ले येत असतील तो परीसर, तथा त्यांमध्ये असलेली प्रत्येक झ ोपडपट्टीत समाविष्ट असलेले नझ्रूल शीट नंबर, सर्व्हेनंबर सह माहिती, झोपडट्टपटी घोषित झाल्याचे वर्ष व शासनाचे आदेश, कुणाचे आदेशान्वये झोपडपट्टी घोषीत झाली इत्यादी माहिती सत्यप्रतीसह पुरविण्यात यावी. तसेच कोणती झोपडपट्टी नझुल शीटनंबर हे विकास/योजनातील प्रारुप आराखडयाचे बाधीत आहे इत्यादींची माहिती. तसेच सोबत नकाशात दाखविल्याप्रमाणे शीट नंबर ३० सी, प्लॉट नं. २४ या प्लॉटचे लागून असलेले प्लॉट नं. २०, २१, २२, २३ हे समाविष्ट धरुन प्लॉट नं. २४ चे लगत समोरील बाजूस रहदारीस किती जागा शिल्लक आहे किंवा कसे ? रहदारीस अडथळा आहे काय ? किंवा कसे ? उदा. २४ शेजारी उत्तर- दक्षिण बाजू लक्ष्मीबाई विद्यालय ते श्री.विजय घाटोड यांचे हे अंतर किती चौ.फूट, पूर्व-पश्चिम गणगणे विद्यालय व श्री.तेलगोटे यांचे घर ते श्री.वानरे यांचे घर यातील अंतर किती ? श्री.वानेर यांचेघर ते शे.जाबीर यांचे घर ते प्लॉट नं. २४ यामधील अंतर किती ? इत्यादी संबंधी माहिती पुराव्यासह, नकाशासह प्रमाणित नकाशासह माहिती सत्यप्रतीसह देण्यात यावी ही विनंती. सदरची माहिती नोंदणीकृत पोस्टाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. माहितीचा कालावधी १९८० ते २००६ पर्यंत. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००६ रोजी प्रथम अपील आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय झाला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे निश्चितच दोषी आढळून येतात. परंतु माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकारी, नगरपरिषद, अकोट यांनी श्री.बी.आर.शिंदे यांनी खुलासा दाखल करतांना अर्जदाराने मागितलेल्या माहितीच्या तपशीलाचे संदर्भामध्ये प्राधिकरणातील अन्य कर्मचाऱ्यांस पाठविले असल्यास ती तारीख व पुरावा या संदर्भामध्ये जावक क्रमांक ४९१, दिनांक १०.२.२००६ अकोट, नगरपरिषद कार्यालयातून दिलेले आदेश हे १) श्री. एन. जी. येवतकार, कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, अकोट

... ५



२) श्री. संजय अढाऊ, सल्लागार अभियंता, नगरपरिषद, अकोट ३) श्री.आर.के.तेलगोटे, बांधकाम लिपिक, नगर परिषद, अकोट असे असून विषयांकीत माहिती ही अर्जदारास दिनांक २०.२.२००६ पावेतो द्यावयाची आहे. त्याकरिता अर्जामध्ये

मागितलेली माहिती दिनांक १७.२.२००६ पर्यंत न चुकता सादर करावी. असे पत्र खुलाश्यासोबत दाखल केलेले आहे. त्यामुळे श्री.एन.जी.येवतकार, श्री.संजय अढाऊ व श्री.आर.के.तेलगोटे हे अधिनियमाचे कलम ५(५) अन्वये माहिती अधिकारी म्हणून समजण्यास हरकत नाही. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी ही दिनांक ५.६.२००६ रोजी घेण्याकरिता दिनांक १८.५.२००६ च्या नोटीसद्वारे कळविण्यात आले होते असे दिसते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या खुलाश्याप्रमाणे दिनांक ५.६.२००६ च्या सुनावणीची नोटीस अपीलार्थी यांनी घेण्यास टाळाटाळ केलेली असून दिनांक १८.५.२००६ च्या नोटीसवर दिनांक २२.५.२००६ रोजी दुपारी १.०० वाजता गजानन तेलगोटे यांचे घरी गेलो असता त्यांनी मी नगरपरिषद मध्ये येतो तेंव्हा घेतो. तुम्ही जा असे म्हटले असा शेरा अ.तु.बुंदेले, शिपाई यांनी दिलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक २६.५.२००६ ला सकाळी ११.०० वाजता त्यांचे घरी गेलो ते घरी नव्हते. त्यानंतर एक तासाने घरी गेलो तेंव्हा त्यांनी मी नगरपरिषद मध्ये येतो असे म्हटले व बाहेर निघून गेले. दिनांक २९.५.२००६ रोजी ते नगरपरिषद मध्ये आले व त्यांनी आवक जावक लिपिक समोर म्हटले की, मला बाहेर गावी लग्नाला जायेचे आहे दोन दिवसांनी घेईल. अ.तु.बुंदेले शिपाई यांनी शेरा लिहून दिलेला दिसून येतो. दिनांक १.६.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजता श्री.गजानन तेलगोटे हे नगरपरिषद आले त्यांनी सदर कागदपत्रे पाहिले असता आयुक्तांनी हे वापस कसे पाठविले. पहिले फोनवर आयुक्ताशी व्यक्तीशः बोलतो व त्यानंतर ही नोटीस घेतो. त्यांना समजवण्याचा खूप प्रयत्न केला परंतु मला आज काम आहे असे म्हणून निघून गेले असे आवक लिपिक यांचा शेरा दिसून येतो व तसा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेवून अपील अर्ज नस्ती करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचे संकल्पने प्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी ही दोन्ही पक्षकारांच्या उपस्थित घेणे आवश्यक आहे. परंतु अपीलार्थी हजर होते तर जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये छाननी करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे करिता आदेश करणे आवश्यक असते. कोणत्याही प्रकारचा अर्ज, अपील अर्ज हा नस्तीबध्द करता येत नाही. माहिती मिळण्याची प्रक्रिया ही द्वितीय अपीलाचे निर्णयानंतर संपते व

... ६



त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा आवश्यक असतोच याची नोंद प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. अपीलकर्ता हा नोटीस घेत नाही याबद्यल शिपाई व आवक लिपिक यांनी जो शेरा दिलेला आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे नोटीस घेत नाही किंवा अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नसावी असा ही निष्कर्ष काढता येतो. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे माहिती ही ३० दिवसात उपलब्ध करुन देणे हा प्राथमिक मुद्या ठरतो व त्याप्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्तर हे ३० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना दिलेले नसल्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात व माहिती अधिकारी यांनी ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी चे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे सहाय्य घेतले असेल अश्या अधिकारी/कर्मचाऱ्यांस सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून दोषी आढळून येतात व त्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ७



# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२३१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२३२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी व ज्यांचे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेतले आहे अशा अधिकारी/कर्मचारी श्री. एन. जी. येवतकार, कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, अकोट २) श्री. संजय अढाऊ, सल्लागार अभियंता, नगरपरिषद, अकोट ३) श्री.आर.के.तेलगोटे, बांधकाम लिपिक, नगर परिषद, अकोट हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येत असून शास्ती लादण्यात येत आहे.

३) सदरच्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, अमरावती विभाग, अमरावती यांनी हा निर्णय मिळाल्यापासून तीन महिन्याचे आंत कार्यवाही करुन आयोगास अहवाल सादर करावा.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी. सदरचा निर्णय हा प्रादेशिक संचालक यांचे निदर्शनास जे कर्मचारी आणणार नाही ते शास्तीस पात्र राहतील.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २.४.२००८**
HIREKHAN/BHUJI/ ९-१५/२.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७६/२००७.

श्री. मिर्झा वाजीदबेग अहेमद बेग
द्वारा- अली मेडीकल, मु.पो.कलगांव,
ता. दिग्रस, जिल्हा यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती.

श्री.आर.जी.काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री.ए.एस.देशपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे सन २००२ ते २००५ या कालावधीमधील इकरा माध्यमिक एज्युकेशन संस्था द्वारा

... २



संचालित श्री.शिवाजी उर्दु हायस्कूल, रुई (वाई), ता.जि.यवतमाळ सदर शाळा अनुदानास निकष पात्र ठरविण्यासाठी दोन वेळा केलेल्या तपासणीत संबंधित शाळेने सादर केलेला जसाच्यातसा दस्तऐवज फोटो सहीत, संस्थेची व शाळा समितीची कार्यकारीणी, खर्चाचा अहवाल, (उपलब्ध असल्यास बिलासहीत) व ऑडीट रिपोर्ट या विषयीची संपूर्ण माहिती कृपया लवकरात लवकर देण्यांत यावी. यासाठी येणारा खर्च मी आपले पत्र मिळताच भरण्यास तयार आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक

२.११.२००६ रोजी शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २.१.२००७ रोजी उपरोक्त विषयाचे अनुषंगाने माहिती अधिकारी कार्यालय शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्ज सादर केल्यानुसार त्यांचेकडून माहिती प्राप्त न झ ाल्याने आपण या कार्यालयाकडे अपील अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत आपणास कळविण्यात येते की, अधिक्षक (माध्यमिक) कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ हे माहिती अधिकारी असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ हे अपीलीय अधिकारी आहेत. त्यामुळे आपणास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. आपले अपील या सोबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे पाठविण्यात येत आहे. प्रतिलिपी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव. श्री.मिर्झा वाजीद बेग यांनी माहितीचे अधिकारात मागविलेली माहिती आपल्या कार्यालयाकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी या कार्यालयास अपील दाखल केलेले आहे. तेंव्हा संबंधिताचा अपील अर्ज आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहे. संबंधितास आपल्या स्तरावरुन माहिती तात्काळ पुरविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००७ रोजी ३१८ पृष्ठांचे बुकलेट मिळाले अशी पोच पावती त्यांनी दिलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक ७.८.२००६ रोजीचा असून दिनांक १३.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना

... ३



सदरची माहिती शिक्षण विभाग (माध्यमिक) यांचेकडे उपलब्ध आहे. आपण व्यक्तिशः कार्यालयात येवून आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रतींची झेरॉक्स काढून स्वखर्चाने प्राप्त करावी असे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी माझे दिनांक १०.८.२००६ चे माहिती अधिकाराचे अर्जानुसार मी अर्जात स्पष्टपणे माहिती टपालाद्वारे पाठवावी अशी विनंती केली असून आपण आपल्या अधिकारात असतांना सुध्दा मा.बेग साहेब (विस्तार अधिकारी शिक्षण विभाग माध्यमिक) यांना भेटून माहिती घेवून जावे असे नमुद केले ही बाब माहितीचा अधिकार कायद्यास विसंगत असल्याचे जाणवते. उपरोक्त कायद्यानुसार ३० दिवसाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण व्हायला पाहिजे होती. परंतु १३.९.२००६ रोजी आपण पाठविलेले पत्र दिनांक २१.९.२००६ रोजी प्राप्त झाले त्यामुळे माहितीचा अधिकार कलम ६ मधील पोटकलम (१) नुसार कालमर्यादेचे पालन करण्यात कसूर केले असेल तर विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती माहिती मोफत देण्यात येईल असे प्रावधान आहे. तरी मी अपरिहार्य कारणामुळे व्यक्तिशः उपस्थित राहू शकत नसल्याने माझे पत्र मिळाल्यापासून सात दिवसाचे आत आपणाकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात यावी. माझ्या अपरिहार्य कारणाचे स्पष्टीकरण हवे असल्यास ते मी मा.कलेक्टर साहेब यांचेकडे प्रत्यक्ष भेटून देण्यास तयार आहे. अन्यथा उपरोक्त कायद्या २००५ कलम १९(१) मधील जोडपत्र "ब" नुसार वरिष्ठांकडे अपील अर्ज सादर करील. सदरच्या पत्राचे अनुषंगाने दिनांक ११.१०.२००६ रोजी आपणास आवश्यक असलेली माहिती दोन बुकलेट संचामध्ये पाठविण्यात येत आहे. १) फेरमुल्यांकन १ ते ७५ पाने एकूण १५० पेजेसचे बुकलेट. २) शिवाजी उर्दु हायस्कूलचे बुकलेटचे १ ते १५९ पाने एकूण ३१८ पेजेस. असे पाठविल्याचे कळविल्याचे दिसते. परंतु एकूणच प्रथम अपील दाखल केलेले असून माहिती मिळालेली नाही म्हणून दिलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये दिनांक ११.१०.२००६ रोजी आम्ही आपणास आवश्यक असलेली माहिती दोन बुकलेट संचात पाठवित आहे अशा आशयाचे साध्या लिफाफ्यात पत्र पाठविले परंतु त्यासोबत कोणत्याही प्रकारचे बुकलेट आले नाही. यासंबंधी चौकशी

केली असता टपाल कार्यालयाच्या नोंदी अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारचे कोणतेही कागदपत्रे आपल्या पत्त्यावर आलेली नसल्याचे सांगण्यात आले. त्याच तारखेस या दोन्ही प्रकारावरुन शैक्षणिक संस्था व शिक्षण विभाग यांचे साटेलोटे असल्याचा व माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा मला संशय आहे. तरी आपण माहिती देण्याची सुचना करावी व माहिती टपालाद्वारे पाठविण्यात यावी असे नमुद केल्याचे दिसून येते.

... ४



४. अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती मिळालेली असल्यामुळे त्यांनी त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये शास्तीचे बद्यल कोणत्याही प्रकारची विनंती केलेली नसल्यामुळे शास्ती लादण्याच्या संदर्भात विचार करता येत नाही. परंतु अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे मागितलेली माहिती ही अर्ज केल्यापासून ३० दिवसात उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे व या प्रकरणात सदरची माहिती ३० दिवसात उपलब्ध न करुन देता त्यानंतर पत्रव्यवहार व माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यातही माहिती उपलब्ध करुन देतांना द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटल्याप्रमाणे साध्या लिफाफ्यात पत्र आले. परंतु माहितीचे कागदपत्र आले नाही यावरुन जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील गलथानपणा व निष्काळजीपणा दिसून येतो व त्याबाबत चौकशी करुन संबंधित कर्मचाऱ्यांवर आधीच शिस्तभंगाची कार्यवाही करावयास पाहिजे होती. परंतु ती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली नाही. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या झालेल्या विलंबाकरिता जरी संयुक्तिक कारण दिलेले असेल तरी ती माहिती मोफत उपलब्ध करुन देण्यात यावी अशी अधिनियमाचे कलम ७ मध्ये तरतुद आहे. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये विलंबाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण करण्यात आलेले नसल्यामुळे विलंब हा निष्काळजीपणे किंवा बेपर्वाईने झ ालेला दिसून येतो व त्याकरिता ज्या कर्मचाऱ्यांकडून किंवा अधिकाऱ्यांकडून ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन न देण्यास विलंब झालेला आहे त्याबाबतची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पृष्ठांच्या संदर्भामध्ये प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे वसूल करण्यात येवून "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ५



## आ दे श

१) अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व त्याबाबत कोणत्याही प्रकारची त्यांची तक्रार नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे त्या संदर्भामध्ये जे अधिकारी किंवा कर्मचारी हे जबाबदार असतील त्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पृष्ठांच्या प्रती २/- रुपये प्रमाणे वसूल करुन ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन सदरच्या लेखाशिर्षामध्ये जमा करुन तशा प्रकारचा अहवाल आयोगास एक महिन्यास सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.४.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ १५- २०/४.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७७/२००७.

श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे
द्वारा- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अमरावती,
जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.बी.डब्ल्यू.दिवाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री.आर.जी.काळे,
जनमाहिती अधिकारी तथा

उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री.पी.ए.तट्टे,
जनमाहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धामणगांव रेल्वे
जिल्हा अमरावती. ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००५ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे यांचेकडे १) प्रवास भत्ता देयक, २) रजा प्रवास सवलत २००१ ते २००४ व २००५ ते २००८,

... २



३) सेवा पुस्तिकेबाबत. माहितीचा कालावधी १) २००२-०३ व २००४-०५, २) २००३-०४ ते २००४-०५, ३) २००५-०६ १) मी डिसेंबर २००२ ते मे २००३ या कालावधीतील दिनांक ५.८.२००३ ला सादर केलेल्या तीन प्रवास भत्ता देयकाची मंजूर देयकाची माहिती व प्रमाणक क्रमांक. तसेच सन २००४-०५ मधील माझे प्रलंबित भत्ता देयकाबाबत माहिती. २) सन २००३-०४ व २००४-०५ मध्ये प्रवास सवलत मंजूर केलेल्या ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी यांची यादी (मंजूरीचे दिनांकासह) माहिती २००४-०५ मध्ये सदर रजा प्रवास भत्ता देयकांपैकी मंजूर देयकाची माहिती (कर्मचाऱ्यांचे नावानिशी) सन २००४-०५ मध्ये माझी मंजूर केलेली रजा प्रवास सवलत कोणत्या कालखंडातील आहे याची माहिती. ३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक २७.५.२००५ चे आदेशाने पंचायत समिती, अमरावती येथे स्थानांतरण होवूनही सेवापुस्तिका अद्याप न पाठविण्याची कारणे. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.११.२००५ रोजी वरील संदर्भीय विषयान्वये माहितीचा अधिकार २००५ मध्ये माहितीबाबतचा अर्ज कार्यालयाला प्राप्त झाला. आपण २००२-०३ व २००३-०४ तसेच २००५ ते २००६ ची माहिती मागितलेली आहे. परंतु सदर माहितीसाठी १५ ते २० दिवसाचा कालावधी लागणार आहे. तेंव्हा याबाबतची माहिती आपणास दिनांक २५.१२.२००५ पूर्वी देण्याबाबतची कार्यवाही करण्यांत येईल. दिनांक २२.१२.२००५ रोजी माहिती पुरविण्यासाठी तयार आहे. आपणास ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये २७/- इतके आहे. आपणास विनंती करण्यात येते की, हे शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डर पाठवावी किंवा शासकीय कोषागारात भरणा करावा आणि या कार्यालयास चलनाची एक प्रत पाठवावी आणि माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्रानुसार माहितीचा खर्चाचा भरणा अतिरिक्त शुल्क अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००५ रोजी भरणा केलेली असल्यामुळे दिनांक २९.१२.२००५ रोजी अर्ज व चलानचा संदर्भ देवून गटविकास अधिकारी यांनी सदरची माहिती गटविकास अधिकारी (उच्चश्रेणी) पंचायत समिती, अमरावती यांचे मार्फत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याकरिता पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ

ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपूर्ण व अयोग्य माहिती देण्यात आली व विलंबाने देण्यात आली या कारणाकरिता द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... ३

... ३ ...

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १०.११.२००५ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे त्याबाबतचा अर्ज हा कार्यालयास प्राप्त दिनांक १४.११.२००५ असा दिसून येतो व त्यामुळे दिनांक १४.११.२००५ ते २४.११.२००५ या ३० दिवसामध्ये ही माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे असा होतो. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००५ रोजी जरी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता १५ ते २० दिवसाचा कालावधी लागणार आहे असे म्हटले तरी सदरचे पत्र हे मुदतीत दिलेले होते व त्यातही दिनांक २५.१२.२००५ पूर्वीच कार्यवाही करण्यात आली होती. नंतर दिनांक २२.१२.२००५ रोजी अतिरिक्त शुल्क भरण्याचे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राप्रमाणे दिनांक २८.१२.२००५ रोजी खर्चाचा भरणा केलेला असून माहिती ही दिनांक २९.१२.२००५ रोजी उपलब्ध झालेली आहे. अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे माहिती ही शुल्क भरण्याच्या वेळेसहीत ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी जरी दिनांक २२.१२.२००५ ला पत्र दिले असले तरी पत्र मिळून मुदतीत खर्चाचा भरणा करुन मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे हे त्यावर शक्य वाटत नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ३ दिवसाचे पत्राचे पूर्वीच गृहीत धरली तर ३ दिवस हा विलंब झालेला आहे. त्यामुळे ३ दिवसाचे विलंबास माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अपीलकर्ता यांनी दुसरा मुद्या त्यांचा दिनांक १३.५.२००५ रोजी पाठविलेल्या प्रवास सवलत देयकाचे संदर्भात उपस्थित करुन सदरची माहिती ही त्यांना दिशाभूल करणारी आहे असे सांगितले. त्याकरिता त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी जुन, जुलै व ऑगष्ट २००४ या तीन महिन्याचे एकत्रित प्रवास भत्ता देयके हे रुपये १३२७/- एक वर्षाचे मुदतीचे आंत सादर केलेले असून सुध्दा एक वर्षाचे आंत सादर केलेली नाही या कारणास्तव परत करण्यात येत आहे याबाबतचे उत्तर जे दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. त्याकरिता कार्यालयाचे आवक नोंदवही तपासणी केली. सदरच्या नोंद वही मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००६ रोजी पाठविलेले प्रवास भत्ता देयकाची नोंद आहे. परंतु त्यामध्ये देयकाचा तपशील नाही. परंतु अपीलकर्ता यांना जे देयके मुदत बाहय म्हणून परत केली आहे त्या संदर्भामध्ये आवक नोंदवहीमध्ये सदरचे देयक रुपये १३२७/- असा तपशील दिलेला आहे. याचा अर्थ सदरचे देयक हे दिनांक २.९.२००५ रोजी नोंद झालेले दिसून येते. परंतु सदरच्या देयकांवर अपीलकर्ता यांची जी सही आहे ती मात्र दिनांक १३.५.२००७

... ४

... ४ ...

रोजी आहे व त्यामुळे सदरचे देयक हे २ वेळ केलेले दिसून येते किंवा विलंबाने नोंद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरचे तेच देयक गटविकास अधिकारी, अमरावती यांचेकडे दिलेले होते व त्यांनी दाखविलेले पत्राप्रमाणे ते दिनांक १३.५.२००५ रोजी दिलेले होते व त्यामुळे गटविकास अधिकारी, अमरावती यांनी सदरचे देयक विलंबाने कार्यवाहीस पाठविले असल्याने ते अपीलकर्ता यांचा दोष नाही. असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती कार्यालयाचे अभिलेखात आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या नोंदीमध्ये जे काही गैरप्रकार झाले असेल त्या गैरप्रकाराबद्यल अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे न्याय मागवून घेता येईल.

त्यातही प्रवास भत्ता मुदत बाहय आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे देयक हे स्थायी समितीकडे सादर करण्यात येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी सदरचे देयक स्थायी समिती कडे सादर करावे व झालेल्या गैरप्रकाराबाबत स्थायीसमिती निर्णय घेईल. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की सदरचे देयक स्थायी समितीकडे सादर करावयाचे असले तरी अपीलकर्ता यांना परत करण्याची आवश्यकता नव्हती. तरी याबाबत सदरच्या प्रकरणामध्ये स्वतंत्रपणे तक्रार करुन न्याय मागवून घेता येईल. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता माहिति उपलब्ध करुन द्यावी. कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अधिनियमाचे कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकारी पेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल करावयाचा उद्येश हा प्रथम अपीलीय अधिकारी हा त्याच कार्यालयातील असल्यामुळे त्याच कार्यालयाच्या स्तरावर ही माहिती उपलब्ध होवू शकेल हा उद्येश दिसून येतो. परंतु सदरच्या उद्येशाचा गैरफायदा हा जवळ जवळ सर्वच प्रथम अपीलीय अधिकारी घेत आहेत असे दिसून येते. अपील ही संकल्पना दोनही पक्षकारांच्या उपस्थित कारण मिमांसा देणारा निर्णय देणे असा आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांची प्रशासकीय आदेश काढण्याच्या पलीकडे कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसून येत नाही व त्यामुळे द्वितीय अपील दाखल करावे लागते. या प्रकरणात सुध्दा संदर्भीय अर्जान्वये श्री.सुरेश माणिकराव भारसाकळे, ग्रामसेवक यांनी मागितलेली माहिती दिनांक २५.१२.२००५ पूर्वी त्यांना पाठविण्याबाबत पत्र क्रमांक २६१४ दिनांक २९.११.२००५ अन्वये त्यांना देण्याबाबत कळविण्यात आले आहे

... ५



त्याप्रमाणे त्यांचेकडून आवश्यक शुल्क भरुन घेवून नोंदणीकृत डाकेद्वारे त्यांना दिनांक २५.१२.२००५ पूर्वी माहिती पाठविण्यात यावी व तसा अहवाल मला सादर करावा. याप्रकरणी विलंब झाल्यास प्रतिदिवस रुपये २५०/- प्रमाणे दंड आकारणी होवू शकते. याबाबत कृपया जाणीव ठेवावी. असे गट विकास अधिकारी यांनी श्री.पी.डी.वासेवाल, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे यांना पत्र पाठविलेले दिसून येते. सदरच्या प्रशासकीय पत्राचे संदर्भामध्ये जे कळविण्यात आलेले आहे ते वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे यांना माहिती आहे. ते गट विकास अधिकारी यांनी त्यावर कळविले हे त्यांना माहितीच आहे. त्यामुळे प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे कार्यवाही झालेली नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे उल्लघंन केलेले आहे असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्याबाबत सक्त ताकीद देणे आवश्यक आहे. दिनांक १८.१.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.१.२००६ चे प्रथम अपील प्रकरणाचे संदर्भात अशा प्रकारचे आदेश काढलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांना माहिति उपलब्ध झालेली असली तरी ती ३ दिवस विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे विलंबाचे प्रत्येक दिवसास रुपये २५०/- प्रमाणे शास्तीस पात्र राहतील. सदरच्या शास्तीचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे काहीही नाही असे त्यांनी कबुल केले.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती ही ३ दिवस विलंबाने प्राप्त झालेली असल्यामुळे विलंबाचे प्रत्येक दिवसाप्रमाणे रुपये २५०/- प्रमाणे रुपये ७५०/- शास्ती ही जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द

लादण्यात येत आहे व सदरच्या शास्ती ही त्यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

... ६



२) सदरच्या शास्तीची वसुली ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी करुन तसा अहवाल आयोगाचे कार्यालयास तीन महिन्याचे आंत सादर करावा व त्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे सदरच्या निर्णयाची प्रत स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांना रजा प्रवास सवलत २००१ ते २००४ व २००५ ते २००८ या गट वर्षाची मंजूर करण्यात आली आहे असे स्पष्ट आदेश असल्यास त्या आदेशाची प्रत द्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ २१-२६/४.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये

# अपील क्रमांक १३८७/२००७.

श्री. प्रल्हाद माधवराव केदार
प्लॉट नं. १०५, प्रफ्पुल निवास,
रा. जिजामाता नगर,
ता. जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. सूद,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन),
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. एन. रामबाबू,
जनमाहिती अधिकारी तथा
वनसंरक्षक, (मानव संसाधन व विकास),
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आपले प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. हयांचे कार्यालयात महाराष्ट्र शासनाचे आर.के. सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे अनुषंगाने आरक्षणाबाबतचे विषयांतर्गतचा अनुशेष भरण्याबाबतचे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी/१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,

... २



दिनांक १८.१०.१९९७ नुसार नियुक्ती अधिकाऱ्यांने कार्यालयीन अधिक्षकाचे मंजूर पदाची टक्केवारी निश्चित करण्याच्या अनुषंगाने दिनांक २.७.१९९७ रोजी पदोन्नतीसाठी निश्चित केलेली बिंदू नामावली त्याचप्रमाणे आज माहिती देण्याचे १ दिवस अगोदर पर्यंत किंवा दिनांक ३०.६.२००६ रोजीची त्या संवर्गाची अद्यावत बिंदु नामावली केली आहे किंवा करुन त्या दिनांक २.७.१९९७ ला असलेली व दिनांक ३०.६.२००६ ची कार्यालयीन अधिक्षकाचे संवर्गाची बिंदू नामावलीच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती मला पाहिजे आहे. तेंव्हा आपणास विनंती आहे की, कृपया आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे देता येवू शकते. अशी कार्यालयीन अधिक्षकांचे बिंदु नामावलीच्या त्या प्रत्येक बिंदु नामावलीचे सुरुवातीला दिनांक २.७.१९९७ रोजीची व दिनांक ३०.६.२००६ रोजीची कार्यालयीन अधिक्षकांचे संवर्गाची बिंदु नामावली असे हेडिंग/शिर्षक असलेली प्रत्येकी एक प्रमाणित झेरॉक्स प्रत सदर अधिनियमाचे नुसार पुरविण्यात याव्यात. २) तसेच दिनांक २.७.१९९७ ला आपले कार्यालयातील कार्यालयीन

अधिक्षकाचे संवर्गाची बिंदु नामावली निश्चित केल्यानंतर त्यानुसार असलेला अनुशेष किंवा रिक्त जागा भरण्यासाठी आपण किंवा नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्या संवर्गाचे पदासाठी. ३) दिनांक २.७.१९९७ नंतर जेंव्हा जेंव्हा कार्यालयीन अधिक्षकांचे निवडीसाठी निवड समितीची नियुक्ती केली असेल किंवा जेंव्हा केली असेल तेंव्हाची पत्राची एक झेरॉक्स प्रत. ४) दिनांक २.७.१९९७ पासून झालेल्या प्रत्येक निवड समितीचे समोर कार्यालयाने कार्यालयीन अधिक्षकांचे बिंदु नामावली नुसार असलेल्या अनुशेषाची व रिक्त जागा भरण्यासाठी ठेवलेल्या माहितीची एक झेरॉक्स प्रत. ५) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड समितीने कार्यालयीन अधिक्षकांचे निवडीकरिता ज्या मुख्य लेखापालांची माहिती ज्या मुद्यांवर मागितली त्या मुद्यांचे पत्रासह मुख्य लेखापालांची यादीची एक झेरॉक्स प्रत. ६) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड समितीसाठी ज्या मुद्यांचे प्रमाणनुसार संबंधित मुख्य वनसंरक्षक हयांचेकडून माहिती, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) हयांना प्राप्त झाली त्या प्रत्येक माहितीचे पत्राची एक झेरॉक्स प्रत. ७) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड समितीसमोर बोलविलेल्या मुख्य लेखापालांचे यादीतून निवड समितीने सभा घेवून जो निर्णय दिला त्या समितीचे निर्णयांचे कार्यवृत्तांत प्रत्येकी एक झेरॉक्स प्रत. ८) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड समितीचे कार्यालयीन अधिक्षकाचे पदावर पदोन्नतीसाठी निवड केलेल्या मुख्य लेखापाल हयांचे यादीची एक झेरॉक्स प्रत. ९) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड

... ३



समितीने केलेल्या मुख्य लेखापालांना पदोन्नती देवून पदस्थापना केल्या त्या प्रत्येक आदेशाच्या प्रत्येकी एक झेरॉक्स प्रत. १०) दिनांक २.७.१९९७ पासून पदोन्नती होवून पदस्थापनेचे जे आदेश झाले त्यानुसार संबंधित पदोन्नत कार्यालयीन अधिक्षकांचे रुजू झाल्याचे जे अहवाल प्राप्त झाले असतील त्या प्रत्येकाची एक झेरॉक्स प्रत. ११) दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक आदेशानुसार ज्या ज्या मुख्य लेखापाल हयांनी पदोन्नती स्विकारली नाही व तसे लिहून दिले त्या लेखी पत्राच्या एक झेरॉक्स प्रत. वरील प्रमाणे दिनांक २.७.१९९७ पासून प्रत्येक निवड समितीची कार्यालयीन अधिक्षकाचे निवडीसाठी वरील मुद्याची माहे जून २००६ अखेर झालेल्या निवड समितीचे माहितीसह व कार्यवृत्तासह प्रत्येक माहितीची एक झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन पुरवावी. १२) तसेच श्री.कोटूरकर, कार्यालयीन अधिक्षक, वन्यजीव बोरीवली हे बोरीवली हयांची झालेली पदोन्नती व पदस्थापनेच्या आदेशाची एक प्रत. १३) श्री. कोटूरकर, कार्यालयीन अधिक्षक, वन्यजीव, बोरीवली कार्यालयात जेव्हा रुजू झ ाले त्याबाबत रुजू झाल्याबाबतचा जो अहवाल प्राप्त झाला असेल त्या अहवालाची एक झेरॉक्स प्रत. १४) श्री. कोटूरकर हयांनी औरंगाबाद वन वृत्त (प्रा) कार्यालयात बदलीसाठी अर्ज जो मुख्य वनसंरक्षक (प्रा) बोरीवली हयांनी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) म.रा.नागपूर हयांना सादर केला त्या पत्राची अर्जासह एक झेरॉक्स प्रत. १५) त्या पत्राचे व अर्जाचे अनुषंगाने अप्पर मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) हयांनी जे उत्तर दिले असेल त्या उत्तराचे पत्राची व अर्जाची प्रत. १६) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) हयांची श्री. कोटूरकर हयांचे औरंगाबाद वन वृत्त कार्यालयात जे बदलीचे आदेश काढले. त्या बदलीचे आदेशाची एक झेरॉक्स प्रत. १७) श्री.कोटूरकर कार्यालयीन अधिक्षक हयांनी आपल्या कार्यालयीन अधिक्षक, बोरीवली वन्यजीव वृत्त पदाचा कार्यभार हस्तांतर यादीची एक झेरॉक्स प्रत. १८) श्री.कोटूरकर कार्यालयीन अधिक्षक, हे मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद हयांचे कार्यालयात रुजु झालेल्या अहवालाची एक झेरॉक्स प्रत ३(३/१९) कार्यालयीन अधिक्षकाचे सन २००३ व २००४ ची जेष्ठता यादीची प्रत्येकी एक झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन पुरवाव्यात. वरील प्रमाणे सर्व झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन मला पुरवाव्यात. येणे प्रमाणे दिनांक २.७.१९९७ पासून ते ३०.६.२००६ पर्यंतची माहिती उपरोक्त प्रमाणे संघटनेला पुरवून सहकार्य करावे. सदरच्या माहितीचा कालावधी संबंधित वर्ष १९९७ व त्या पुढील ३० जून २००६ पर्यंतची आहे

अशी नोंद केलेली दिसून येते. सदरची माहिती साध्या डाकेने पाठवावी असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक

... ४



४.८.२००६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातील जावक क्रमांक कक्ष-७/मासंवि/माहिती अधि./५०६ प्रमाणे एन.रामबाबु, वनसंरक्षक, मानव संसाधन विकास तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संदर्भीय अर्जान्वये मागितलेली माहिती पुरविण्यासाठी तयार असून आपणांस ही माहिती पुरविण्यासाठी शुल्क रुपये ५६६ + १०० (अंदाजे टपालखर्च) = ६६६ इतके मनीऑर्डर करुन किंवा कोषागारात चलनाद्वारे भरुन त्याची एक प्रत या कार्यालयास दिनांक १४.८.२००६ पर्यंत पाठविण्यात यावी जेणेकरुन आपल्याला माहिती पुरविणे सोयीचे होईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र दिनांक २१.८.२००६ रोजी प्राप्त झाले व सदरच्या पत्रावरील तारीख व उपलब्ध तारीख या संदर्भात आक्षेप घेतलेले दिसून येतात व त्यामुळेच दिनांक १५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १३.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांना निर्णय दिलेला असून सदरच्या निर्णयामध्ये वनसंरक्षक (मानव संसाधन विकास) तथा जनमाहिती अधिकारी यांनी आपणास आपला अर्ज कार्यालयात दिनांक ७.७.२००६ रोजी प्राप्त झाला असल्यामुळे नियमानुसार ३० दिवसांचे आंत त्यांचे पत्र क्रमांक ५०६, दिनांक ४.८.२००६ नुसार रक्कम भरण्याबाबत कळविलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(३)(अ) नुसार रक्कम भरण्यासाठी ज्या दिवशी सुचना निर्गमित करण्यात आली त्या दिवसापासून ती रक्कम प्रत्यक्ष अदा केलेल्या दिवसापर्यंतचा कालावधी कलम ७(१) प्रमाणे ठरवून दिलेल्या ३० दिवसाच्या मुदतीच्या व्यतिरिक्त धरण्यात येतो. वनसंरक्षक (मानव संसाधन विकास) तथा जनमाहिती अधिकारी, नागपूर यांनी खर्चाच्या संदर्भात केलेली मागणी ही नियमानुसार व आदेशानुसार आहे व आपण त्यांनी केलेल्या रुपये ६६६/- च्या मागणीचा भरणा न केल्याने आपणास माहिती पुरविता आली नाही असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आलेली आहे असे दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००६ रोजी रुपये ६६६/- चा भरणा केल्याची जनमाहिती अधिकारी यांना कळवून सोबत चलान सादर केलेली दिसून येते व त्यातच मागितलेली सर्व माहिती बिनचूक अर्धवट नसलेली सेवासंघाचे उपरोक्त पत्त्यावर पाठवावी अशी विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ४.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वंजारी कर्मचारी सेवासंघ, जिल्हा शाखा बुलढाणा या पत्त्यावर माहिती पाठविलेली

... ५



दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांना पत्र पाठवून प्रत्येक मुद्यांची संदर्भामध्ये त्यांना २८३ पृष्ठे पाठविलेली असतांना सुध्दा अपूर्ण व माहिती पाहिजे ती सोडून इतर माहिती पुरविलेली आहे असे नमुद करुन आक्षेप दिलेले दिसून येतात. तसेच वास्तविक पाहता बिदूं नामावलीची मागितलेली माहिती पुरवितांना अवास्तव व अनावश्यक व असंबंध अशी माहिती पुरवून कागदाची संख्या वाढविली आहे. आपण १९६ पेजेस पाठविले आहे त्याची रुपये २/- प्रती प्रमाणे ३९२/- रुपये होतात व पोस्टाचा हा जास्त खर्च घेतला असून मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे व त्यामुळेच त्यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वंजारी कर्मचारी सेवा संघ म्हणून मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे माहिती ही व्यक्तीशः मागविण्याची तरतुद आहे. कोणत्याही संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना माहिती मागता येईल अशी तरतुद नाही. त्यामुळे सकृतदर्शनी अपीलकर्ता यांचा अर्ज फेटाळण्यास पात्र होता. परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला असल्यामुळे सदरचा मुद्या निकाली निघतो. अपीलकर्ता यांनी १९९७ पासून माहिती मागितली आहे व माहिती मागतांना ज्या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये श्री. प्रल्हाद केदार यांचेशी संबंधित नसलेली माहिती सुध्दा उपलब्ध करुन द्यावी लागलेली आहे व त्यामुळेच सदरच्या दिनांक १७.११.२००६ च्या पत्रामध्ये त्यांना अनावश्यक माहिती उपलब्ध करुन दिली असे म्हटले आहे. उत्तरवादी यांचे म्हणण्याप्रमाणे सदरची माहिती असंबंध नसून मागितलेल्या माहितीच्या संदर्भातच आहे व त्यामुळे अनावश्यक पृष्ठे वाढविले हे अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य नाही. दिनांक १७.११.२००६ रोजीच्या पत्रामध्ये १९ मुद्यांमध्ये जी माहिती मिळालेली नाही असे म्हटले आहे ती माहिती ही जास्तीची माहिती आहे व त्याच दिवशी अपीलकर्ता यांनी नवीन माहितीचा अर्ज दाखल करुन तीच माहिती मागितलेली असल्यामुळे संबंधित माहितीचा खर्च रुपये ८५/- चा भरणा करुन दिनांक ४.१.२००७ रोजी प्राप्त करुन घेतली आहे असा जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे व तसे नसते तर अपीलकर्ता यांनी नवीन माहितीचा अर्ज दाखल क रुन व त्याही बाबत खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेतलेली

... ६



दिसते व यावरुनच दिनांक ५.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिली होती ती मागितलेल्या प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेली होती असेच म्हणता येईल व याबाबत अपीलकर्ता यांनी सुध्दा आयोगाकडे कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे उत्तरवादी यांचे म्हणणे हे खरे आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व त्यानंतरही त्यांना मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्या सर्व माहितीचा खर्चाचा भरणा त्यांनी केलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९५/२००७.

श्री. सतनामसिंग गुजराल
व्यवस्थापक,
हनिफ मजूर सहकारी संस्था मर्यादीत,
मुर्तीजापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए.एच.बेलेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक कामगार आयुक्त,
ऋतुराज बिल्डींग, विद्यानगर,
अकोला.

श्री. एस.एस.बहुरुणी,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ,
ऋतुराज बिल्डींग, विद्यानगर,
अकोला. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून सचिव, अकोला माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचेकडे दोन अर्ज दाखल करुन खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार किती हमाल व मजूर सहकारी संस्था व शा.धा.गोदामावर हमालीचे काम करणारे कॉन्ट्रक्टरदार माथाडी मंडळात नोंदीत झाल्या आहेत. यापैकी

... २



कोणकोणत्या संस्थेच्या/कॉन्ट्रक्टरदाराकडून आपण मजुरीसह लेव्ही रक्कम वसुल केली आहे. त्या सर्व संस्थेची नोंदणीची दिनांक व संस्थेचे नांवासह वसुल केलेल्या सर्व रक्कमेची माहिती द्यावी. ज्या संस्था/कॉन्ट्रक्टरदार आपल्या मंडळात नोंदणीकृत झाले नाहीत. परंतु त्यांनी शा.धा.गोदामावर हमालीचे काम केले अशा कॉन्ट्रक्टरदाराकडून आपण वसूल केलेली मजुरीसह लेव्ही रक्कमेची, त्यांच्या नावासह यादी द्यावी. एखादी संस्था/कॉन्ट्रक्टरदार आपल्या माथाडी मंडळात नोंदणीकृत नसेल तर त्या संस्थेकडून आपल्या अधिकारातील कोणत्या कायद्यानुसार त्यांच्याकडून मजुरीसह लेव्हींच्या रक्कमेची वसुली आपणांस करता येते याची माहिती द्यावी. वर्ष २००१ ते २००५ पर्यंतच्या कालावधीत माथाडी बोर्डात नोंदणी होण्यासाठी अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील किती मालक किंवा संस्थेवर लेबर कोर्टात केसेस दाखल केले व आजपर्यंत किती मालक किंवा संस्था नोंदणी झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द नोदणीसाठी केलेले केसेस आपणच परत घेतले. तसेच किती मालक व संस्थेवर नोंदणीसाठी केलेले केसेस दाखल केल्यापासून ते नोंदणी झाल्यापर्यंतच्या कालावधीची मजूरीसह लेव्ही रक्कमची वसुली आपणाकडून करण्यात आली. त्या मालक व संस्थेची नांवासह व रक्कमेसह तपशीलवार माहिती द्यावी ही विनंती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.४.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्ता यांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळात किती हमाल मजूर सहकारी संस्था/कंत्राटदार नोंदीत झाले आहेत, नोंदणी दिनांक, कंत्राटदाराकडून मजूरी/लेव्हीची किती रक्कम वसुल केली आहे इत्यादी माहिती सोबत जोडलेली आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २१.९.२००६ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त तथा अपीलीय अधिकारी, अकोला यांनी अपीलाचे पत्र दिनांक २०.७.२००६ चा संदर्भ देवून शासकीय माहिती अधिकारी, अकोला यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३००/०६ व ३०१/०६ नुसार दिनांक ३.५.२००६ ने माहिती प्रत्यक्षात दिलेली आहे. सदर अर्जात मागणी केल्यानुसार कार्यालयास रजिस्टरला/रेकॉर्डला उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकारी यांनी वेळेच्या आंत पुरविलेली आहे अशा निर्णयाप्रत मी आलो आहे. सबब आपला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१)

... ३



अन्वये दाखल केलेल्या दिनांक २१.७.२००६ चा अपिलाचा अर्ज नस्ती करण्यांत येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीला सोबत त्यांनी खालील प्रमाणे अपील करण्याची कारणे दिलेली आहेत. १) अपीलीय अधिकाऱ्याने अपील दाखल केल्यानंतर ४५ दिवसांमध्ये सुनावणी घेवून अपीलाचा निर्णय द्यावयास पाहिजे. परंतु अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीची पहिली तारीखच ४५ दिवसांचा अवधी संपल्यानंतर दिली. वास्तविक पाहता अपील दिनांक २१.६.२००६ रोजी दाखल करण्यांत आले होते व दिनांक २१.९.२००६ रोजी निकाली काढण्यांत आले. अश्या प्रकारे अपीलीय अधिकारी यांनी कायद्यानुसार विहित वेळेत अपीलाचा निकाल दिलेला नाही. २) अपीलीय अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती व माहिती अधिकाऱ्याने दिलेली माहिती याची कुठलीही पडताळणी न करता माहिती अधिकारी, अकोला यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३००/६ व ३०१/०६ यानुसार दिनांक ३.५.२००६ चे पत्राने प्रत्यक्षात माहिती दिलेली आहे. सदर अर्जात

मागणी केल्यानुसार कार्यालयास रजिस्टरला/रेकॉर्डला उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकारी यांनी वेळेच्या आत पुरविली आहे या निर्णयास मी आलो आहे. असे लिहून अपील निकाली काढलेले आहे. वास्तविक पाहता अर्जदाराने त्याचे दिनांक १.६.२००६ चे अर्जाद्वारे वर्ष २००१ ते २००५ या कालावधीत नोंदणी करण्यासाठी अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील किती मालक किंवा संस्थेवर लेबर कोर्टात केसेस दाखल केल्या आहेत व आजपर्यंत किती मालक व संस्था नोंदणी झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द केलेल्या केसेस आपण परत घेतल्या आहेत. तसेच किती मालक व संस्थेवर नोंदणीसाठी केलेल्या केसेस दाखल केल्यापासून तर नोंदणी झाल्यापर्यंतच्या कालावधीची मजूरीसह लेव्हीची रक्कम आपणांकडून वसूल करण्यांत आली आहे. त्या मालक व संस्थेची नावांसह, रक्कमेसह तपशीलवार माहिती द्यावी. हया माहितीच्या आधारावर मला फक्त २००१ पासून दाखल केलेल्या १२ केसेसची लेबर व जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केलेल्या केसेस म्हणून माहिती देण्यांत आली. परंतु ज्यांच्या विरुध्द नोंदणी केलेली नाही म्हणून केसेस दाखल करण्यांत आल्या होत्या व नोंदणी केल्यानंतर त्यांच्या विरुध्दच्या केसेस परत घेण्यांत आल्या हयाची माहिती देण्यांत आलेली नाही. तसेच ज्यांच्या वरील केसेस मागे घेण्यांत आल्या त्यांचेकडून ज्या कालावधीकरिता ते नोंदीत नव्हते अश्या कोणत्या मालकाकडून व संस्थेकडून नोंदीत झाल्यानंतर केसेस

... ४



दाखल केल्यापासून ते नोंदीत होई पर्यंतच्या कालावधीची रक्कम वसुल करण्यांत आली त्या मालक व संस्थेची माहिती तपशीलवार देण्यांत आलेली नाही ही बाब अपीलीय अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून देखील अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यावर कुठलीही कार्यवाही केलेली नाही. अश्या प्रकारे माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण माहिती दिलेली आहे व खरी माहिती देण्यांस टाळाटाळ केलेली आहे व त्रोटक व दिशाभूल करणारी माहिती देवून योग्य माहिती दिलेली नाही. हया सर्व बाबींवर अपीलीय अधिकाऱ्यांनी देखील हयाची दखल न घेता अपील निकाली काढलेले आहे. ३) अपीलीय अधिकाऱ्यांनी मी दिनांक १.४.२००६ चे अर्जानुसार शासकीय माहिती अधिकाऱ्यांस मागितलेल्या माहितीबाबत पूर्ण माहिती दिली किंवा नाही तसेच योग्य व खरी माहिती दिली किंवा नाही याची शहानिशा न करता आपला निर्णय दिलेला आहे तो पुर्णतः चुकीचा आहे व अश्याप्रकारे अपीलीय अधिकारी यांनी शासकीय अधिकाऱ्यांस संरक्षण देण्याकरिता कुठलीही चौकशी न करता अपील निकाली काढलेले आहे. ४) मी शासकीय माहिती अधिकाऱ्यांस माननीय उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार आजपर्यंत अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील किती हमाल व मजूर सहकारी संस्था व शासकीय धान्य गोदामावर हमालीचे काम करणारे कंत्राटदार माथाडी मंडळात नोंदीत आहे. त्यापैकी कोणकोणत्या संस्थेच्या कंत्राटदारांकडून आपण मजूरीसह लेव्ही रक्कमेची वसूली केली आहे त्या सर्व संस्थेची नोंदणीचे दिनांक व संस्थेच्या नावांसह वसुल केलेल्या रक्कमेची माहिती मागितली होती. परंतु वसुल केलेल्या रक्कमेची माहिती न देता भरणा केलेल्या रक्कमेची माहिती दिलेली आहे. तसेच शासकीय माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीमध्ये त्या संस्था कधी पासून कार्यरत नाहीत जर कार्यरत नाहीत तर रजिस्ट्रेशन कशासाठी ठेवले आहे हयाबाबतची कुठलीही माहिती दिलेली नाही. तसेच ज्या संस्था मंडळात नोंदणीकृत झाल्या नाहीत परंतु त्यांनी शासकीय गोदामावर काम केले आहे अश्या कंत्राटदारांकडून आपण वसुल केलेली मजूरीसह लेव्हीची रक्कम त्यांच्या नांवासह द्यावी. हयाबाबत शासकीय अधिकाऱ्यांने कुठलीही माहिती दिलेली नाही अश्या प्रकारे शासकीय अधिकाऱ्यांने अपूर्ण माहिती दिली व खरी माहिती देण्यांत टाळाटाळ केलेली आहे‍ऽ असे असतांना देखील अपीलीय अधिकाऱ्यांनी ही सर्व माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांना शासकीय माहिती अधिकाऱ्यांस संरक्षण देण्याचे उद्येशाने कुठलाही रेकॉर्ड न पाहता अपील निकाली काढले आहे व माहिती देण्यांतस टाळाटाळ केली आहे. ५) तसेच मी शासकीय माहिती अधिकाऱ्यांस एखादी संस्था अथवा कंत्राटदार

... ५

आपल्या माथाडी मंडळात नोंदणीकृत नसेल तर त्या संस्थेकडून आपल्या अधिकारातील कोणत्या कायद्यानुसार त्यांच्याकडून मजूरीसह लेव्हींच्या रकमेची वसुली आपणांस करता येते याची माहिती मागितली होती कारण सदरहु माहिती अधिकारी हे माथाडी मंडळाचे सेक्रेटरी असून त्यांनी विद्यमान कलेक्टर यांची दिशाभूल करुन त्यांचेकडे जमा असलेले माझे कामाचे बिलातून ज्या कालावधीकरिता मी माथाडी मंडळात नोंदीत नव्हतो त्या कालावधीची रक्कम रुपये २,५९,५६४/- देखील कापून घेतलेली आहे. म्हणून अश्या प्रकारे कुठल्या कायद्याच्या तरतुदीनुसार लेव्हीची रक्कम आपणांस वसूल करता येते हयाबाबतची माहिती देखील माहिती अधिकाऱ्यांने दिलेली नाही व अश्या प्रकारे अपूर्ण माहिती देवून योग्य माहिती देण्यांस टाळाटाळ केली आहे ही बाब अपीलीय अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून देखील अपीलीय अधिकाऱ्यांनी देखील कुठलीही कारणमिमांसा न देता माहिती अधिकाऱ्यांने दिलेली माहिती रेकॉर्डनुसार व योग्य आहे हया सबबीखाली अपील खारीज करुन शासकीय माहिती अधिकाऱ्यांस संरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे व योग्य माहिती देण्यांस नकार दिलेला आहे. म्हणून अपीलीय अधिकारी तसेच शासकीय माहिती अधिकारी यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. म्हणून हे अपील दाखल करण्यांत आलेले आहे. तरी आपणांस विनंती की, शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना मी मागितलेल्या माहितीबाबत त्यांचेकडे उपलब्ध असलेला सर्व रेकॉर्ड घेवून बोलाविण्यांत यावे व त्यांनी अपूर्ण व योग्य माहिती न दिल्याबद्यल योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी ही विनंती. तसेच हया अपीलाच्या सुनावणीकरिता मला प्रत्यक्ष बोलाविण्यांत यावे व मला माझे वकीलामार्फत बाजू मांडण्याची संधी द्यावी.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००६ (कार्यालयास प्राप्त दिनांक ३.४.२००६) च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.४.२००६ व दिनांक २९.४.२००६ रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्याकरिता त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलासोबत सुध्दा त्यांनी त्यांचे म्हणणे मांडलेले होते. परंतु त्याबाबत कोणताही विचार न करता जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला होता व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे दोनही अर्जावर माहिती जी उपलब्ध झालेली नाही त्याबद्यल अपीलकर्ता यांनी तोंडी

... ६



प्रत्येक अर्जातील मुद्येनिहाय माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून सांगितले. त्याप्रमाणे कोणकोणत्या संस्थेच्या कंत्राटदारांकडून मजूरीसह लेव्ही वसूल केली आहे त्या सर्व संस्थांची वसूली दिनांक व संस्थेच्या नावासह वसूल केलेली रक्कमेची माहिती दिलेली नाही. उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये क्रमांक १५ व १६ इंद्र हमाल कामगार सहकारी संस्था, जळगांव जामोद व विजय वामनराव वानखडे, दाळफैल, खामगांव ही संस्था कार्यरत असतांना त्यांचेकडून वसूल केलेली पूर्ण रक्कमेची माहिती दिलेली नाही. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ मधील माहिती अपूर्ण आहे व त्यानंतर अर्ज क्रमांक २ मधील आजपर्यंत किती मालक व संस्था नोंदणी झाल्यानंतर त्यांचे विरुध्द नोंदणीसाठी केलेल्या केसेस आपण परत घेतले याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना ती मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते. तसेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे आज जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाश्यामध्ये नोंदीत नसलेल्या आस्थापनेवरुन कोणतीही वसुली करता येत नाही हा त्यांनी आज लेखी खुलासा केलेला आहे. तीच माहिती त्यांनी

त्यावेळी दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांनी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करता आली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सदरची माहिती ही मागितलेल्या माहितीप्रमाणे पूर्णपणे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या अभिलेखामध्ये माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु आज अपीलाचे सुनावणीमध्ये संपूर्ण अभिलेखाची तपासणी, निरिक्षण करणे आवश्यक नसल्याने अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या कालावधीतील अकोला माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला संदर्भात अभिलेखाची पाहणी करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती किंवा त्यांच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसेच जी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे त्याबाबत त्यांना लेखी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाचे सोबत जोडलेल्या कारणांचा विचार करुन निर्णय दिला असता तर अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यता राहीली नस्ती व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध झालेल्या माहितीची छाननी न करता त्यांनी त्यांच्यावर सोपविलेली

... ७



जबाबदारी ही टाळलेली आहे व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले आहे. त्याकरिता त्यांना समज देणे आवश्यक आहे. परंतु सदरचे प्रथम अपीलीय अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहे असे विद्यमान अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १.४.२००६ च्या दोनही अर्जातून मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती अपूर्ण उपलब्ध झालेली आहे असे त्यांना वाटते त्या माहितीच्या संदर्भामध्ये मागितलेल्या माहितीच्या कालावधीतील संबंधित अभिलेख पाहून व निरिक्षण करुन सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना सदरच्या अभिलेखाची पाहणी किंवा निरिक्षण करण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी वेळ व तारीख ही कळवावी व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सदरच्या अभिलेखाची पाहणी व निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील आवश्यक असलेली माहितीच्या पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच दोनही अर्जावर ज्या मुद्यांच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली नसेल ती माहिती त्यांना लेखी उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६३/२००७.

सौ.कल्पना भारत फुलाडी
रामदासपेठ, दामले मार्ग,
अकोला -४४४ ००१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. द. गो. जगताप,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती. **..... उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १२.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांचेतर्फे श्री.बी.एम.फुलाडी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २८.६.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी कार्यालय, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितेली दिसून येते. १) माहितीचा अधिकार कायदा, २००५ प्रकरण २, कलम ४(ख) अंतर्गत अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत, लोकांना माहिती करुन देणे किंवा कळविणे बंधनकारक असलेल्या माहितीची प्रत. २) शासन परिपत्रक क्रमांक ममाअ-२००४/प्र.क्र. १ व ५/०४/०५, दिनांक १६.१०.२००४ ची संपूर्ण प्रत. ३) शाळा न्यायाधिकरणांच्या आदेशांचे पालन करण्याबाबत निर्देश करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या सर्व परिपत्रकांच्या प्रती. ४) आपल्या माहिती अभिलेखांमध्ये उपलब्ध असलेली अपील नं. ६३/१९९४-अ ज्यात

... २



आपण "प्रतिवादी क्र. ४" होता च्या दिनांक ४.४.१९९४, २०.७.१९९४, १८.७.१९९५ व १२.२.२००२ च्या निर्णयांच्या प्रती. त्यावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या टिपण व शेऱ्यांसहील. ५) आपल्या माहिती अलिलेखांमध्ये उपलब्ध असलेली मा.उच्च

न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्याकडील रिटपीटीशन नंबर २०७७/२००२ ज्यात आपण प्रतिवादी क्र. २ आहात च्या १६.७.२००२ च्या आदेशाची प्रत. त्यावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या टिपण व शेऱ्यांसहीत. सदरचा अर्ज अपीलकर्ती यांनी सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग असे प्रमाणपत्र घेवून दिनांक २८.८.२००६ रोजी पाठविलेले दिसून येते. परंतु सदरचा अर्ज शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयात मिळालेला नाही व शिक्षण उपसंचालक या कार्यालयातील आवक विभागामध्ये नोंदी झालेली दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकरी यांनी सांगितले. परंतु विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.७.२००६ रोजी प्रथम अपील शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचे सोबत जोडपत्र-अ ची प्रतही अपीलकर्ती यांनी जोडलेली होती व ती उपलब्ध झाली होती असे उत्तरवादी यांनी सांगितले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.८.२००६ रोजी देण्यात आलेला असून दिनांक ३१.७.२००६ च्या दिनांकाच्या अर्जाच्या संदर्भात आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहिती तयार आहे. आपणास ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये ३८/- इतके आहे. वरील शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डर पाठवावी किंवा शासकीय कोषागारात भरणा करावा आणि या कार्यालयास चलनाची एक प्रत पाठवावी आणि माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या खर्चाचा भरणा अपीलकर्ती यांनी दिनांक २८.८.२००६ रोजी केलेला असून त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे असे दिनांक ३०.८.२००६ च्या पत्रावरुन दिसून येते. परंतु सदरची माहिती ही अपूर्ण दिलेल्या कारणासाठी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्याबाबत मुद्येनिहाय स्पष्टीकरणही द्वितीय अपील मेमोमध्ये देण्यात आलेले आहे ते खालील प्रमाणे आहे. १) माहितीचा अधिकार कायदा, २००५ प्रकरण २ कलम ७(२) नुसार माहिती नाकारल्याचे मानण्यात आले होते म्हणूनच कलम १९(१) अन्वये अपील करण्यात आले होते. (दिनांक ३१.७.२००६) परंतु अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या निर्णयात माझ्या अपील अर्जाचा उल्लेख माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ असा केला आहे. माझ्या दिनांक २८.६.२००६ च्या अर्जानुसार माहिती कां देण्यात आली नाही

... ३



याचा कुठेच उल्लेख नाही. या अर्जावर काय निर्णय घेतल्या गेला व कां घेतल्या गेला हेही कळविण्यात आलेले नाही. २) कलम ७(६) नुसार माहिती मोफत देणे बंधनकारक होते परंतु तरीही ३८/- रुपये शुल्क आकारण्यात आले. ३) शासनास केलेल्या प्रदानाच्या पावती वर विशिष्ट हेतुनेच "माहितीचा अधिकार नियम २००२" अशी नोंद करण्यात आली आहे. ४) माझ्या अर्जातील क्रमांक १ ची माहिती देण्यात आलेली नाही ही माहिती प्रसारित करणे प्रत्येक कार्यालयास कायदयाने बंधनकारक असूनही ही माहिती देण्यात आलेली नाही याची गंभीर दखल घेण्यात यावी व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रकरण ५ कलम २० नुसार जास्तीत जास्त शास्ती करण्यात यावी. ५) मी मागितलेली क्रमांक ३ ची माहिती या कार्यालयाने माझ्यावर केलेल्या सततच्या अन्यायाला वाचा फोडणारी असल्यामुळेच देण्यात आलेली नाही. या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी परस्परांच्या बेकायदेशीर कृत्यांवर व चुकांवर पांघरुण घालण्याचेच कामात व्यस्त आहेत. ६) क्रमांक ४ नुसार मागितलेल्या प्रती देण्यात आल्या आहेत. परंतु त्यावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या शेरे, टिपण व निर्देशांची प्रत देण्यात आलेली नाही. यावरुन सदर माहिती नष्ट केल्याची शंका निर्माण होत आहे. ७) क्रमांक ५ नुसार मागितलेली माहिती देण्यात आलेली नाही. ८) सदर कार्यालयातून मी गेली चार महिने न्यायालयीन निर्णयांचे पालन का करण्यात आलेले नाही या आशयाची माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु येथील अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार कायदा, २००५ हा एक थट्टा मस्करीचा विषय बनवून ठेवला आहे.

३. अपीलकर्ती यांनी दिनांक २८.६.२००६ चा अर्ज हा कार्यालयात प्राप्त नसल्यामुळे त्यावर कार्यवाही झालेली नाही. परंतु प्रथम अपील दिनांक ३१.७.२००६ रोजी दाखल केल्यानंतर व त्यासोबत दिनांक २८.६.२००६ चा अर्ज दाखल केला असतांना त्या अर्जातील मागितलेली माहिती ही मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली नाही त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात. वास्तविक अपीलकर्ती यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे खर्चाचा भरणा केलेला आहे ते एकत्रित संपूर्ण माहितीच्या संदर्भात कळविण्यास पाहिजे होते व त्यावरुन अपीलकर्ती यांना जी माहिती पुरविण्यात आलेली आहे ती अपूर्ण आहे हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ व ७ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन द्यावयाची असते. याचा अर्थ माहिती

... ४



उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया संपूर्ण खर्चाचे भरणा सहीत ही ३० दिवसाचे आंत पूर्ण करावयाची असते मात्र खर्चाचा भरणा करावा असे कळविल्यापासून ते प्रत्यक्ष खर्चाचा भरणा केल्याचा दिनांकापर्यंतचा कालावधी वगळुन मिळतो व त्यामुळे दिनांक २.११.२००६ रोजी पुन्हा सदरच्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेल्या माहितीचा खर्च पुन्हा रुपये ४/- भरावे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या खर्चाचा भरणा हा दिनांक १३.९.२००६ चे अर्जाचे संदर्भात आहे असे उत्तरवादी यांनी सांगितले व त्यामुळे त्या अर्जाचे संदर्भामध्ये या अपीलामध्ये विचार करता येत नाही. उत्तरवादी यांचे म्हणणे असे की दिनांक २८.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यासोबत कोणत्याही प्रकारच्या माहितीबद्यल ते मुद्येनिहाय पत्र दिलेले दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांनी असे म्हटले की, दिनांक २८.६.२००६ च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळेच त्यांना पुढील अर्ज करावा लागला आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक २८.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व जी अपूर्ण राहिलेली आहे त्याबाबतचा उल्लेख राज्य माहिती आयोगाकडे दिलेला आहे ती माहिती हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.७.२००६ च्या प्रमाणे अपील सोबत दिनांक २८.६.२००६ चा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जाप्रमाणे सूंपर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/-ची शास्ती लादण्यात येत आहे.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १७.४.२००८**
HIREKHAN/BHUJI/ ४०- ४३/१७.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०४/२००७.

श्री. वसंतराव सारंगधर डांगे,
रा.सराफा बाजार, रिसोड,
जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी.के.देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त,
संचालक, (नगर प्रशासन),
अमरावती विभाग, अमरावती.

श्री. यशवंत गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
(नगर प्रशासन),
वाशिम. **..... उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.४.२००८ रोजी ठेवण्यात आली आहे. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, अमरावती हयांचा आदेश क्र. प्रासनप्र/अम/निरी-१ कावि ८/०४, दिनांक ८.१.२००४ रोजी जिल्हाधिकारी, नगरपरिषद प्रशासन, वाशिम यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे नमुद करुन सहपत्रामध्ये त्यांनी दिनांक १०.२.२००६, दिनांक २०.३.२००६, दिनांक २७.४.२००६ (मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई), दिनांक

... २



३१.५.२००६ या माहितीच्या अधिकारातील तीच माहिती मागण्याच्या अर्जाचे संदर्भ दिलेला आहे. त्यांचा दिनांक १०.२.२००६ च्या माहिती मागण्याच्या अर्जाचे संदर्भामध्ये अपील क्रमांक ६३४/२००७ हया राज्य माहिती आयोगाकडील अपीलाची सुनावणी होवून दिनांक १२.११.२००७ रोजी निर्णय झालेला आहे व त्या निर्णयाचे अनुषंगाने त्यांना दिनांक १३.१२.२००७ रोजी जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे पुन्हा त्याच माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक १०.२.२००६ च्या अर्ज व त्यावरील अपील व त्याच माहितीच्या संदर्भातील

इतर माहितीचे अर्ज या संदर्भात पुन्हा न्याय करणे हे संयुक्तिक असणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १०.२.२००६, दिनांक २०.३.२००६, दिनांक ३१.५.२००६ या माहितीच्या अर्जामधील प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, अमरावती आदेश क्रमांक प्रासनप्र/अम/निरी-१ कावि ८/०४, दिनांक ८.१.२००४ च्या संदर्भामध्ये अपील क्रमांक ६३४/२००७ चा निर्णय होवून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ४४- ४५/१९.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०६/२००७.

श्री. संदिप रामदास राऊत,
जिल्हा परिषद कॉलनी, अमानखॉ प्लॉट,
श्री.सवाई यांचे घर, शास्त्रीनगर,
अकोला - ४४४ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग,
(प्राथमिक),
जिल्हा परिषद, बुलढाणा. .....
**उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.४.२००८ रोजी ठेवण्यात आली आहे. अपीलकर्ता हे विनाअनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. जी.बी.काळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००६ रोजी सर्व शिक्षण मोहिमे अंतर्गत डाटा एंन्ट्री ऑपरेटर पदावर निवड प्रक्रिये संदर्भात उमेदवारांबाबत माहिती. यासोबत जोडलेले १ ते ५ मुद्दे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा केली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असे अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद, बुलढाणा यांना लिहून दिलेले असल्यामुळे व तसे त्यांनी आयोगाकडे सादर केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर.** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १९.४.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ४६/१९.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८६/२००७.

श्री. राजेश इमानुएल कुजूर,
प्लॉट नं. २८२, कस्तुरबानगर,
जरिपटका, नागपूर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका (सामान्य प्रशासन विभाग),
नागपूर.

श्री. दि. मा. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
(नगर रचना विभाग),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. .....
**उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे. a) कस्तुरबा नगर में कितने प्लॉट है ?  b) कस्तुरबा नगर के कितने प्लॉट में पक्का बांधकाम हुआ है ?  c) कस्तुरबा नगर के कितने प्लॉट में एन.आय.टी./म.न.पा. से नक्शा पास करवाकर बांधकाम किया गया है ?  d) कस्तुरबानगर के कितने प्लॉट में नक्शे के अनुसार काम नही हुआ है ? e) जिन्होंने बिना नक्शा पास करवाये पक्का बांधकाम  किया है, उनके खिलाफ म.न.पा./एन.आय.टी. द्वारा क्या कार्यवाही की जा रही है ?  माहिती प्रत्यक्ष घेणार असे

... २



लिहून दिलेले आहे.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना (b, d आणि e) सोडून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.  सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी पुन्हा माहितीचा अर्ज दाखल करुन महोदय मैंने अपने पत्र दिनांक १९.७.२००६ द्वारा आपसे प्रश्न पूछे थे.  आपने म.न.पा.ना./न.र.वि./मा.अ.अ./१४२३, दिनांक ५.८.२००६ द्वारा अधूरी जानकारी दी थी.  मेरे प्रश्न क्र. (b), (d) व (e) के उत्तर मुझे अभी तक नही मिले है.  मै इस माध्यमद्वारा इन्हीं तीन प्रश्नों के उत्तर चाहता हूँ.  माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले दिसून येते.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.११.२००६ रोजी आपणास मंजूर नकाशाच्या प्रती पाहिजे असल्यास नकाशा क्रमांक देणे आवश्यक आहे.  योग्य शुल्क भरल्यास आपणास मंजूर नकाशाच्या प्रती देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते.  परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी निगम आयुक्त, केंद्रीय कार्यालय, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २८.५.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तीन मुद्दे (b), (d) व (e) ची माहिती मिळाली नाही.  त्यावर माहिती अधिकारी यांनी झोनमधून माहिती मागितली आहे.  त्यामुळे ही माहिती १५ दिवसांचे आंत देण्यांचे निर्देश देण्यांत आले. दरम्यान अपीलार्थीस माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.३.२००७ नुसार उर्वरित मुद्यांसह संपूर्ण माहिती दिलेली आहे व अपिलार्थी त्यानंतर एकदाही हजर झालेले नसल्यामुळे त्यांना आवश्यक माहिती मिळाली आहे असे गृहीत धरुन प्रकरण निकाली काढण्यांत येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो.  परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी जान बुझकर अधूरी, गलत एवं गुमराह करनेवाली जानकारी प्रदान करना, माहिती अधिकारी दोषी होने के बावजूद  दंड न सुनाना, आदेश के बावजूद आजतक मुझे सूचना प्रदान न किया जाना, अपील की सुनवाई के लिखित आदेश की प्रती प्रदान न किया जाना, कस्तुरबानगर, जरीपटका, नागपूर के प्लॉट एवं पक्के बांधकाम संबंधी सूचना देणे अशी कारणे दिलेली आहे.  सदरच्या अपीलाचे सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी जानबुझकर अधूरी, गलत एवं गुमराह करण्याच्या संदर्भामध्ये तपशिलात विचारले असता त्यांनी त्याकरिता प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.  परंतु सदरच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तपशील दिलेला नाही.  मात्र तोंडी युक्तीवादामध्येच असे सांगितले की, ३४७ प्लॉट असतांना त्यांनी ३४६ प्लॉटची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याकरिता त्यांचेकडे

... ३



उपलब्ध असलेला नकाशा त्यांनी दाखविला.  सदरच्या नकाशा हा त्यांनी नागपूर सुधार प्रन्यास कडून उपलब्ध करुन घेतलेला दिसतो व सदरच्या नकाशा प्रमाणे उत्तरवादी यांनी पुन्हा निश्चित प्लॉट किती आहे असे तपासण्याकरिता सांगितले असता आज

महानगरपालिका विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेला खुलाश्यानुसार कस्तुरबानगर या जागेचा अभिन्यास नकाशा नागपूर सुधार प्रन्यास द्वारे मंजूर करण्यास आलेला आहे व या अभिन्यास नकाशामध्ये एकूण ३४७ प्लॉटस दर्शविण्यात आलेले आहेत. तरी कस्तुरबानगर अभिन्यासामध्ये एकूण ३४६ प्लॉटस ऐवजी ३४७ प्लॉटस आहेत असे संबोधण्यात यावे. चुकीची माहिती देण्याचा किंवा माहिती लपविण्याचा कार्यालयाचा कोणताही उद्देश नव्हता. अर्जदाराजवळ माहिती उपलब्ध असतांना देखील अर्जदाराने कार्यालयाकडून माहिती मागितली व ती अर्जदारास देण्यात आली. परंतु अनावधानाने त्यामध्ये चुक झाली. परंतु त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की त्यांचे जवळ जी माहिती उपलब्ध झाली आहे ती दिनांक १९.७.२००६ रोजी नव्हती तरी ती त्यांनी नागपूर सुधार प्रन्यासकडून उपलब्ध करुन घेतली होती व त्या आधारावर त्यांनी चुकीची माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांचे म्हणणे आहे. सदरची चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती हे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केलेले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ज्यांचे सहाय्य घेण्यात आलेले आहे ते सर्व या संबंधामध्ये दोषी आढळून येतात. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक १९.७.२००६ च्या अर्जावरील (b), (d) व (e) वरील माहिती ही कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नसल्यामुळे सदरची माहिती ही माहितीच्या अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे येत नाही. नकाशानुसार काम झाले नाही अशी किती प्लॉटवर कार्यवाही केली अशी माहिती कार्यालयात उपलब्ध नसते. तक्रार केल्यानंतरच व त्याबाबत चौकशी झाल्यानंतरच सदरचे बांधकाम हे बेकायदेशीर आहे की नाही हे सिध्द होते व माहिती मागितलेल्या तारखेस अशी माहिती उपलब्ध असेल असे नाही व त्यामुळे सदरची माहिती ही तयार करुन देणे अपेक्षित नाही. मात्र अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याबाबत चुकीची माहिती आहे असे अपीलकर्ता यांनी म्हटले आहे. त्याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे सदरची माहिती उपलब्ध करुन देणारे अधिकारी हे दोषी आहेत त्या व त्याबाबत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी जबाबदारी निश्चित करुन, विभागीय चौकशी करणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४



## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये जे अधिकारी जबाबदार असतील त्यांना जनमाहिती अधिकारी समजून अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही ही आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी करुन तीन महिन्याचे आंत अहवाल सादर करावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१५/२००७.

श्री. उध्दव आनंदराव वानखडे,
मु. पो. इत्तमगांव (शहीद),
ता. वरुड, जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. पि.जी.भागवत,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम विभाग)
अमरावती. **.....**
**उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००६ रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अमरावती यांनी इत्तमगांव येथे श्री मारोती संस्थान र.नं. ७४८ चे मंदिर बांधकामाकरिता आपणांस दिनांक २४.५.१९९० ला ड्राप क्र. ६६६८०८ नुसार किती रक्कम दिली. मंदिर बांधले काय ? नसेल बांधले तर ही रक्कम कोठे खर्च केली हि माहिती मिळावी. सदरची माहिती व्यक्तिगत लेखी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक १६.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी किंवा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २



३.	अपीलकर्ता यांनी दिनांक १४.२.२००६ रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.५.२००६ रोजी १) उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग, मोर्शी व २) सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती वरील विषयाबाबतची प्राप्त तक्रारीची झेरॉक्स प्रतही आपणाकडे पाठविण्यात येत असून आपणांस सूचित करण्यात येते की, सदरची माहिती ही ७ दिवसांचे आंत या कार्यालयास सादर करावी. सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना माहितीकरिता आपणांस कळविण्यांत येते की, सदर प्रकरण तपासणी करीता संबंधित उपविभागास १५ दिवसांचा अवधी देण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.५.२००६ रोजी उपअभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, मोर्शी यांनी वित्तीय व्यवहार उपविभागाशी होत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या बाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिनांक २४.५.१९९० ला ड्राफ्ट क्रमांक ६६६८०८ ची माहिती या उपविभागात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे दिनांक ५.६.२००६ रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १६.५.२००६ चे अपीलाचे अनुषंगाने पुनर्वसन विभागाचे रेकार्डस हे वेगवेगळया ठिकाणी हस्तांतरीत झाल्यामुळे रेकार्डस शोधण्यास बराच विलंब लागू शकतो. त्यामुळे रेकार्डस उपलब्ध होताच आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल. रेकार्डस उपलब्ध नसल्यामुळे सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक ५.६.२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मोर्शी व सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. वास्तविक उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मोर्शी यांनी दिनांक २३.५.२००६ रोजी कळविलेले दिसून येते. त्यामुळे त्यांना पुन्हा स्मरणपत्र पाठविण्याची आवश्यकता होती असे दिसून येत नाही. तसेच रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे सुनावणी घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही हे म्हणणे योग्य नसून रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याकरिता सुनावणी घेवून आदेश देणे आवश्यक होते. अपील याचा अर्थ दोन्ही पक्षकारांच्या उपस्थितीमध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये छाननी करुन अपीलकर्ता किंवा अर्जदार यांना न्याय कसा मिळेल याबाबतचा निर्णय देणे असा आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. तत्कालीन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली

... ३



नसल्यामुळे त्यांनी सुध्दा अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे अधिनियमाचे कलम २० च्या अनुषंगाने तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. त्यातही ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेतले असेल असे अधिकारी हे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी सुध्दा समजण्यात येईल व ते सुध्दा अधिनियमाचे कलम २०

प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची शिफारस करणे हे संयुक्तिक राहील. तसेच माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असल्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यांचे सहकार्य घेवून सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत रेकॉर्ड शोध घेण्याकरिता अपीलकर्ता यांचे सहकार्य घेवून विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेला दिसून येत नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा त्यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे निर्णयाची प्रत पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २१.४.२००८**

HIREKHAN/BHUJI/ ४७- ५०/१९.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१९/२००७.

श्री. नितीन सहदेव लोणकर,
सुधीर कॉलनी (मतेच्या चक्कीजवळ),
ता. जिल्हा अकोला - ४४४ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एल. मेश्राम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
जिल्हा परिषद (सामान्य प्रशासन)

वाशिम. .....

**उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे वतीने श्री.एम.एच.जैस्वाल हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती शासकीय माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे मागितलेली दिसून येते. मराठी लघुलेखक "उच्चश्रेणी" पदावर नेमणूक देणेबाबत/भरती प्रक्रियेबाबत मुद्या क्रमांक १ ते ६ बाबत माहिती. १) दिनांक ११.६.२००६ रोजी लेखी परिक्षेस बसलेल्या उमेदवारांची संख्या :- एकूण उमेदवार संख्या. २) दिनांक ११.६.२००६ रोजी लेखी परीक्षेत गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या (रेशोनुसार) :- एकूण

... २



उमेदवार ३) दिनांक ११.६.२००६ रोजी लेखी परीक्षेत गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी, जी यादी दिनांक १२.६.२००६ ला प्रसिध्द केली त्या यादीची झेरॉक्स प्रत :- ४) दिनांक २४.७.२००६ रोजी लघुलेखनाची स्किल टेस्ट व प्रत्यक्ष मुलाखतीत बोलावण्यांत आलेल्या उमेदवारा बाबतची माहिती खालील प्रपत्रात देण्यात यावी :-

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | बैठक क्रमांक | लेखी परिक्षेत मिळालेले गुण | स्किल टेस्ट मध्ये एकूण गुण | स्किल टेस्म मध्ये मिळालेले गुण | प्रत्यक्ष मुलाखती मध्ये मिळालेले एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

५) निवड समितीने निवड केलेल्या/निवड समिती समोर प्रत्यक्ष मुलाखतीत उपस्थित असलेल्या, अंतिम निवड यादीबाबत माहिती खालील प्रपत्रात देण्यांत यावी :-

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | बैठक क्रमांक | लेखी परिक्षेत मिळालेले गुण | स्किल टेस्ट मध्ये मिळालेले गुण | प्रत्यक्ष मुलाखतीत मिळालेले गुण | एकूण पैकी मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

६) अंतिम निवड यादीची झेरॉक्स प्रत :- माहितीचा कालावधी दिनांक ११.६.२००६ ते व दिनांक २४.७.२००६ रोजी घेतलेल्या मुलाखतीबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००६ रोजी जावक क्रमांक जिपवा/साप्रवि/स्था १/४०१२/२००६ च्या

पत्राप्रमाणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद, वाशिम यांनी रजिस्टर पोस्टाने आपण मागविलेली विषयांकित माहिती ५ प्रतित असून सदर माहितीचे प्रतीची रक्कम चलानद्वारे भरणा करुन संदर्भीय पत्रान्वये मागविलेली माहिती कार्यालयीन वेळेत येवून घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक ४.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी सदरच्या खर्चाचे संदर्भामध्ये संपूर्ण खर्च कळविण्यात यावा असे पत्र दिलेले दिसून येते. मात्र दिनांक २५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले

... ३



दिसून येते. त्यानंतर दिनांक १३.११.२००६ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खर्चाचे विवरण कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक २३.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले होते व त्यामुळेच कदाचित आज अपीलकर्ता माहिती उपलब्ध झाल्यामुळे हजर राहिल्याचे दिसून येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना सदरच्या त्यांच्या दिनांक २.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२४/२००७.

श्री. प्रकाश भास्कर कुळकर्णी,
मु.पो. मोठया विहिरीजवळ,
सिव्हील लाईन, खामगांव,
जिल्हा बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन.एस. शिंगनाथ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार, खामगांव,
जिल्हा बुलढाणा.

श्री.एस. टी. महाले,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, पारखेड,
ता. खामगांव, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००६ रोजी मौजे पारखेड, ता. खामगांव मधील गट नं. ४१२ मधील २.०४ आर (५ एकर ४ गुंठे) जमीनीचा मोबदला कोणास दिला. कारण ७/१२ व सरकार म्हणून नोंद आहे. त्याची माहिती द्यावी अथवा ७/१२ दुरुस्त करुन द्यावा व कोणाच्या अधिकाराखाली सरकार म्हणून नोंद केली व कोणी केली व कोणत्या पदाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केली. मौजे पारखेड, ता.खामगांव भाग नं. २ मधील गट नं. ४१२ मधील ३.९७ आर जमीन पाझर तलावात वजा जाता उर्वरित ५ एकर ०४ गुंठे कर्ता प्रकाश भास्कर कुळकर्णी हयांच्या जमीनीच वरील लिहिलेली माहिती द्यावी. सदरच्या माहितीचा कालावधी २००५-

... २



२००६ ७/१२ (८ दिवस) २००५-२००६ वर्षाचा ७/१२ व माहिती स्वतः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे दिनांक ३.८.२००६ रोजी तलाठी, पारखेड, श्री.एस.टी.महाले यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. सहपत्र ७/१२ उतारा जोडून दिलेला दिसत आहे. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी

तहसीलदार, खामगांव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये १९७४-७५ साली पलडग प्रोजेक्टमध्ये ज्या जमीनी सरकार जमा झाल्या त्यात वि.ना.कुळकर्णी (हल्लीचा कर्ता वारसदार अर्जदार) यांची जमीन वरील प्रोजेक्टकरिता गेली नाही. (मागील २०-२५ वर्षाचे ७/१२, अवार्ड, सरकारी मोजणीचा अहवाल कॉपेनेशेशन नाही) तरी सरकार म्हणून नोंद कोणत्या आधारे व कोणाच्या अधिकारात गेली याबद्यल माहिती असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.९.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, खामगांव यांनी निर्णय देवून अपीलार्थी यांचा अपील अर्ज मंजूर करीत आहे व पुढे असा आदेश देण्यांत येत आहे की, अपीलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती संबंधित विभागाकडे दाखल करुन (जमिनीचे मोबदल्याबाबत) माहिती प्राप्त करुन घ्यावी तसेच एस.टी.महाले, तलाठी यांनी जमिनीचे गांव नमुना १२ मध्ये सरकार म्हणून केलेली नोंद बाबत माहिती अपीलार्थीस ७ दिवसाचे आंत पुरविण्यांत यावी. तसे न केल्यास तलाठी यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील १९८१) नियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यांत येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरी सुध्दा तलाठी तथा माहिती अधिकारी, पारखेड यांनी रेकॉर्ड दुरुस्त केलेला नसल्यामुळे सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलमध्ये प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने आदेश देवूनही माहिती अधिकाऱ्यांने त्याचे पालन केले नाही व खोटा अहवाल दिला व माहिती जाणूनबुजून चुकीची दिली. माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच चुकीचा व खोटा दिलेला ७/१२ (पेरेपत्रक) दुरुस्त करुन देणेबाबत विनंती केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपात सदरचे दस्ताऐवज

... ३



किंवा अभिलेखाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तरी सुध्दा दिनांक ३.८.२००६ रोजी तलाठी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच त्यामध्ये सदरचे क्षेत्र दुरुस्तीकरिता अर्ज करता येईल असे ही कळविलेले दिसून येते. त्यात जमिनीची दुरुस्ती तत्कालीन तलाठी यांनी केली आहे असे ही कळविले आहे व सोबत ७/१२ उतारा दिलेला आहे यावरुन माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलामध्ये तहसीलदार यांनी जे आदेश दिलेले आहेत व त्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली असून ती तलाठी, पारखेड यांनी आता पर्यंत केलेली कार्यवाही देत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या भाग हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार यांचा आदेश असल्यामुळे माहिती अधिकारी तथा तलाठी, पारखेड यांनी तातडीने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेशाचे पालन करणे हे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, पारखेड यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ५७- ५९/२२.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२८/२००७, अपील क्रमांक १४२९/२००७ व अपील क्रमांक १४३०/२००७.

श्री. संतोष गणपतराव चौके,
रेणुकानगर, डाबकी रोड,
ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एम. शेख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोला.

श्री. ए. एस.बननोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, अकोला. **..... उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपील क्रमांक १४२८/२००७ मध्ये दिनांक १६.११.२००६ रोजी, अपील क्रमांक १४२९/२००७ मध्ये दिनांक १६.११.२००६ रोजी व अपील क्रमांक १४३०/२००७ मध्ये दिनांक १६.४.२००७ रोजी तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२.	सदरच्या तीनही अपीलांच्या सुनावणीच्या वेळेस सचिव, ग्रामपंचायत, कापसी रोड श्री.पांडूरंग काशीनाथ भोरे यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे खालील प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

"विषय :- श्री.सतिष गणपत चौके, रा.कापशी रोड हे माहिती अधिकारात माहिती मागून मानसिक

... २



छळ व पैशाची मागणी करत असल्याबाबत. महोदय, मी विनंती पूर्वक अर्ज सादर करतो की, श्री.सतिष गणपत चौके हा मला माहिती अधिकारामध्ये माहितीची मागणी करतो व त्याला माहिती पुरविली असता माहिती स्विकारुन पोच देत नाही. उलट भांडण करुन जीवे मारण्याची धमकी देतो व पैशाची वेळोवेळी पैशाची मागणी करतो. त्यामुळे माझे मानसिक स्वास्थ बिघडले असल्यामुळे व मला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करत आहे. करिता महोदय मला आपणा कडून योग्य न्याय मिळावा ही नम्र विनंती."

३.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४२८/२००७ मध्ये दिनांक ५.९.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक २२.८.२००६ रोजी दिलेल्या अर्जात (अप्पर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या) ग्रामसचिव, श्री. पी.के. भोरे, यांनी पुरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीच प्रत्यक्ष सर्वेचे काम करीत असल्याचे कळविले, त्याबाबत आपले त्यांना तसे आदेश होते काय ? असल्यास आदेशाची सत्यप्रत द्या. २) दिनांक २८.८.२००६ ला पुन्हा त्यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांना मी बियाणे वाटपाच्या याद्या तयार करत आहे असे लेखी कळविले हे खरे आहे काय ? सविस्तर तपशील द्या. ३) आपले पत्र क्रमांक २७८०, दिनांक ३१.८.२००६ ला माझ्या माहितीच्या अर्जा संदर्भात माहिती दिली ती माहिती संदर्भात स्पष्टीकरण द्या. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ७.१०.२००६ रोजी प्रथम अपील पुन्हा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचेकडेच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्या प्रथम अपीलाचे माध्यमातून माहिती उपलब्ध न झाल्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४.	सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी पंचायत समिती कार्यालय, अकोला असे संबोधून स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १२.९.२००६ रोजी मा.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचे पत्र क्र. पंसअ/कृषि/क्यू/ २००६ कार्यालय पंचायत समिती, अकोला दिनांक ११.९.२००६ चे पत्र श्री.सतिष गणपत चौके यांनी मी ग्राम

... ३



पंचायत कर्मचारी महादेव पुंडलिक वरणकार स्वतः पत्र पोच केले आहे. दिलेल्या पत्राची पोच देण्यास त्यांनी नकार दिला माहितीसाठी सादर करतो. महादेव वरणकार, ग्रामपंचायत कर्मचारी, कापशी रोड यांची सही दिसून येते व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील सुध्दा त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे केलेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय

दिलेला दिसून येत नाही. एकूण दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तोंडी युक्तीवाद करतांना जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाही म्हणून ग्रामपंचायत सचिव हे पंचायत समितीमध्ये आले असतांना अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी व माहितीचे पत्र त्यांचे सोबत दिलेले होते. सचिव, ग्रामपंचायत यांनी असे सांगितले की, त्यांचा शिपाई जवळ त्यांचे पत्र दिले होते व शिपाई यांनी वर नमुद केल्यानुसार पोच दिलेली आहे. याचा अर्थ माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढणे संयुक्तिक राहील.

५. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४२९/२००७ मध्ये दिनांक १२.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव, ग्रामपंचायत कापशी रोड, ता.जि.अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक २२.११.१९९९ च्या ग्रामपंचायत कार्यालय, कापशी रोड यांच्या मासिक सभेचा ठराव क्रमांक ७ अन्वये आदर्श ज्ञानदान बहुउद्येशीय मंडळ, कापशी रोड यांना ६० x ५० फूट आकाराची जागा देण्यात आली. सदर जागेचा चतु:सिमा नकाशा द्यावा. २) सदर जागेवर बांधकाम झाले आहे काय ? सविस्तर तपशील द्यावा. ३) कोणत्या कारणासाठी जागा दिली गेली ? ४) सदर संस्थेचा जागा मागणीबाबतच्या अर्जाची सत्यप्रत द्यावी. त्यामध्ये त्यावेळेसचा ग्रामपंचायतचा आवक क्रमांक स्पष्टपणे नमुद करावा व सोबत आवक रजिस्टरची सत्यप्रत सोबत द्यावी. ५) सदर संस्थेस जागा ग्रामपंचायतने ३५ वर्षाचे लिजवर दिली ती लिज रक्कम किती ? ६) लिजची रक्कम जमा करण्यात येणाऱ्या प्रक्रियेसंबधी सविस्तर माहिती द्यावी. तसेच आजपर्यंत संस्थेने किती रक्कम जमा केली ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००६ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक ७.१०.२००६ रोजी प्रथम अपील

... ४



दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील गट विकास अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ११.१०.२००६ रोजी सबब प्रकरणी तात्काळ माहिती पुरवून कोणतीही तक्रार राहणार नाही असे श्री.पि.के.भोरे, ग्राम पंचायत सचिव, यांना पत्र दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून व प्रथम अपीलाचे अर्जावर कोणताही आदेश निर्गमित केला नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, कापसी रोड यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपण माहिती अधिकारात मागितलेली माहिती तयार असून नियमानुसार फी भरुन ग्रामपंचायत, कापसी रोड येथून उपलब्ध माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्रावर महादेव पुं. वरणकार, ग्रामपंचायत शिपाई यांची सही असून शेरा दिलेला आहे. सदरच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी हे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांचेकडे स्वतः माहिती उपलब्ध करुन घेण्यास जाणे आवश्यक आहे. ३० दिवस पूर्ण होण्याचे आधी स्वतः न जाता स्मरणपत्र देणे व त्यातही माहिती तयार आहे नियमानुसार फी भरुन घेवून जावी असे कळविल्यानंतर दिनांक २७.९.२००६ रोजी स्मरणपत्र देणे यावरुन अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

६.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४३०/२००७ मध्ये दिनांक २८.१२.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.  १) मौजे कापशी रोड येथे ग्रामपंचायतच्या मालकीचे किती प्लॉट आहेत.  प्रत्येक प्लॉटची चतु:सिमेसहीत माहिती द्यावी. २) मागील १५ वर्षात ग्रामपंचायतने कोणाकोणाला लिजवर जागा दिल्या.  त्या प्रत्येकाचे नांव, जागेचे क्षेत्रफळ, जागेच्या चतु:सिमा, किती कालावधीसाठी दिल्या, लीजच्या रक्कमेची उचल किती व कशा प्रकारे झाली याची सविस्तर माहिती.  ३) ग्रामपंचायत कार्यालयाने पाणीपुरवठा योजना सुरु झाल्यापासून कशाप्रकारे राबविली.  त्यामध्ये ठेकेदारी पध्दतीचा अवलंब केला होता की स्वत: ग्रामपंचायत कार्यालयाने कार्यान्वित केली.  ४) ग्रामपंचायत कार्यालयाच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीपासून

... ५



मिळणारे उत्पन्न किती, इमारतसहीत स्पष्टीकरण द्यावे.  ५)  ग्रामपंचायत कार्यालयाच्या हद्यीतील झाडांचे संरक्षण व विल्हेवाट यासंबंधी ग्रामपंचायतचे धोरण काय आहे स्पष्टीकरण द्यावे.  ६) ग्रामपंचायतच्या मालकीचे यंत्रसामुग्री किती आहे यासंबंधी माहिती द्यावी.  ७) ग्रामपंचायतचे कर्मचारी व त्यांचे वेतन यासंबंधी सविस्तर माहिती द्यावी.  ८) ग्रामपंचायतच्या आठवडी बाजाराच्या हर्राशी संदर्भात सविस्तर माहिती द्यावी व उत्पन्नाच्या (हर्राशीच्या) खर्चा संदर्भात स्पष्टीकरण द्यावे.  ९) २००३-२००४ च्या पाणी टंचाई मध्ये १ लाख ५०००/- रुपये मिळाले.  त्यामध्ये साहित्य खरेदी केली ती कुठे आहे.  त्यासंबंधी सविस्तर माहिती द्यावी.  १०) २००३ ते २००६ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाने गावातील घरांचा प्रतिवर्षीक किती टॅक्स वसूल केला (सर्व प्रकारचा टॅक्स) व त्या पैशांचा (रुपयांच्या) कोणत्या कामावर खर्च केला.  संपूर्ण सविस्तर माहिती द्यावी.  सदरची माहिती व्यक्तिशः उपलब्ध घेणार असे नमुद केलेले आहे.  अपीलकर्ता यांना दिनांक १६.२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.  परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती मिळाली असून ती चुकीची आहे.  माहिती चुकीची व दिशाभूल करणारी किंवा खोटी आहे अशी तक्रार केल्यास अपीलकर्ता यांना ती माहिती चुकीची, खोटी कशी आहे हे सिध्द करावी लागते.  त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे अर्जातील मुद्येनिहाय छाननी करुन कोणती माहिती खोटी आहे.  यावरुन तपासणी केली असता अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये खोटी माहिती दिली असे सांगितले.  त्यासंदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००६ च्या अर्जाच्या आधीचे कागदपत्र आहेत व त्यामध्ये दिनांक २६.८.२००६ च्या पत्रामध्ये पाणी पुरवठा योजना ठेकेदारी पध्दतीचा अवलंब केला आहे असे अपीलकर्त्यांचे म्हणण्यानुसार कळविले नसून दुसऱ्या व्यक्तीला देणेबाबत चौकशी केली असता वरील काम ग्रामपंचायतीने करण्याचे ठरविले आहे असे दिसून येते व त्याप्रमाणे त्यावेळेस असलेली वस्तुस्थिती ही सदरची माहिती चुकीची होत नाही.  मुद्या क्रमांक १० च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही ग्रामपंचायत कार्यालयाने गावातील घरांचा प्रतिवार्षिक  किती टॅक्स वसूल केला ही विचारलेली माहिती असल्यामुळे ती माहिती तयार आहे ती उपलब्ध करुन देता येईल.  परंतु अपीलकर्ता यांनी माहिती घेवून पोच देत नाही असे त्यांनी तोंडी युक्तिवाद केला.  त्यामुळे सदरच्या अपीलामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे.  परंतु मुद्या क्रमांक १० च्या माहिती बद्यल अपीलकर्ता यांना खर्चाचे विवरण कळवून खर्चाचा भरणा त्यांचेकडून उपलब्ध करुन घेवून त्यांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

... ६



७.	माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमुद केल्याप्रमाणे जो तक्रार अर्ज दाखल केला आहे त्या तक्रार अर्जाचे संदर्भात अपील क्रमांक १४२८/२००७ मध्ये पत्र व्यवहार केल्याची सत्यता दिसून येते.  माहिती

अधिकारी यांनी माहिती ही दिनांक ११.९.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली असून दिनांक १२.९.२००६ रोजी ग्रामपंचायत कर्मचारी श्री.महादेव वरणकार यांनी पोचच्या संदर्भामध्ये माहिती दिलेली आहे. परंतु पोच देण्यास नकार दिला व त्यानंतरच अपीलकर्ता यांनी स्वतः न जाता स्मरणपत्र दिलेले दिसून येते. तशाच पध्दतीने अपील क्रमांक १४२९/२००७ मध्ये श्री.महादेव वरणकार यांनी खर्चाचा भरणाच्या संदर्भातील पत्र दिनांक २५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना दिले व त्यानंतरच अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे स्मरण पत्र दिलेले दिसून येते. दोन्ही स्मरणपत्रे ही विहित मुदतीत ३० दिवसाचे आधीचे आहेत व यावरुन उत्तरवादी यांनी दिलेल्या तक्रार अर्जास समर्थन मिळते. असे असल्यामुळे सदरच्या अर्जामध्ये श्री.पी.के.भोरे यांनी गंभीर आरोप केलेले असल्यामुळे व आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्यात येत असल्यामुळे सदरच्या तक्रार अर्जावर अपीलाच्या मुद्यांवर चौकशी होणे हे जरुरीचे आहे. अन्यथा त्यातून वाईट घटल्यास न्याय दिल्या सारखे होणार नाही व त्याकरिता सदरचा अर्ज हा पोलीस अधिक्षक, अकोला यांचेकडे चौकशीसाठी पाठविणे संयुक्तिक राहील.

८. अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक १४२९/२००७ संदर्भातील अर्जानुसार माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यास पात्र आहे. अपील क्रमांक १४२८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी स्वतः ग्रामसचिव, ग्रामपंचायत, कापशी रोड, यांचे कार्यालयात जावून खर्चाची माहिती घेणे व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणे व त्याबाबत पोच देणे संयुक्तिक राहील. अपील क्रमांक १४३०/२००७ मध्ये वर नमुद केल्या प्रमाणे अर्जातील मुद्या क्रमांक १० प्रमाणे उपलब्ध असलेल्या माहितीचे विवरण अपीलकर्ता यांनी स्वतः ग्रामसचिव यांचे कार्यालयात जावून उपलब्ध करुन घेवून खर्चाचा भरणा करुन घेवून माहिती उपलब्ध करुन घेणे हे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ७



## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४२९/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १४२८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी स्वतः माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांचेकडे मागितलेल्या माहितीचे संदर्भात खर्चाचे विवरण घेवून त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेवून पोच द्यावी.

३) अपील क्रमांक १४३०/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अर्जातील मुद्या क्रमांक १० प्रमाणे उपलब्ध असलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांचेकडे स्वत- जावून खर्चाचे विवरण घेवून त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर छायांकितप्रती माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

४) जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दिलेली तक्रार अर्जाचे संदर्भामध्ये सदरच्या निर्णयाची एक प्रत व सोबत सदरच्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत ही जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांचेकडे चौकशीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी व सदरच्या अर्जाप्रमाणे जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला

यांनी तक्रारीची चौकशी करुन हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २३.४.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ६०- ६६/२३.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३२/२००७.

श्री.रमेश भाऊराव पवार,
रा.संभाजीनगर, आदर्श कॉलनी,
ता. जि. अकोला- ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. डी. गिरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ,
अमरावती.

श्री. एस.एस.शेवगेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (चौकशी अधिकारी)
उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३,
धामणगांव रेल्वे, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००६ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक ३.११.२००६) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००६ रोजी कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३, धामणगांव यांना मार्फत कार्यालय कार्यकारी अभियंता, शेगांव येथील वानप्रकल्प शेगांव येथील केलेल्या कामाची रक्कम अधिकाऱ्यांचा

खोडसाळपणामुळे न मिळाल्यामुळे झालेला अन्याय दुर करणेबाबत. तसेच माझे कामाचे देयक दुसऱ्या ठेकेदाराचे नावे काढून संबंधित अधिकाऱ्यांने केलेल्या भष्ट्राचार बाबत चौकशी करणे बाबत. चौकशी चालू केलेली आहे तरी कार्यालय कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केली त्या तारखेचे

... २



चौकशी संपूर्ण स्टेटमेंट. अकर्ते सा.चे हुमणे व अंबाळकर यांचे स्टेटमेंट मिळणेबाबत प्रत कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३ धामणगांव यांनी केलेल्या चौकशीच्या प्रती मिळण्याबाबत. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज दिनांक १.२.२००६ रोजी कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३ धामणगांव यांना प्राप्त झालेला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २०.२.२००६ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचेकडे दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या प्रथम अपील हे अपीलावर कार्यवाही करण्यासाठी अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्याने अपील अर्ज दिनांक २१.२.२००६ नुसार पुढील कार्यवाहीस्तव हया कार्यालयाकडे पाठविण्यात आला. असा खुलासा अधिक्षक अभियंता यांनी केलेला दिसून येतो. दिनांक २६.७.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी अर्जात नमुद केलेली आवश्यक माहिती व दस्ताऐवज मंडळ कार्यालयातून प्राप्त करुन तात्काळ पुरविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००६ रोजीच्या अर्जामध्ये खुलासा करतांना सदरच्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३, धामणगांव यांचेकडे प्राप्त झाला आहे. अपीलकर्ता अर्जदारास गोपनीय जावक क्रमांक ५२/उवकावि-३/प्र.लि./चौकशी/ वान प्रकल्प/०६, दिनांक १३.२.२००६ नुसार सदर प्रकरणी विभागीय चौकशी चालू असल्यामुळे आपणास थेट माहिती पुरविणे शक्य नसल्याचे कळविले असे खुलाश्यात म्हटले आहे व त्याबाबतची छायांकिंत प्रत सोबत जोडलेली आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे प्राथमिक चौकशीचा अहवाल अपूर्ण असल्याने आपणास चौकशीच्या कामात अडथळा निर्माण होवू नये. याबाबी लक्षात घेवून अपीलकर्त्यास अधिनियमातील तरतुदीनुसार सद्यःस्थितीत माहिती देता येणार नाही असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. प्राथमिक चौकशीचा अहवाल कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक ३, धामणगांव यांचे गोपनीय पत्राने दिनांक १२.७.२००६ नुसार हया कार्यालयास प्राप्त झाला.

... ३



त्यानंतर या कार्यालयाने दिनांक २६.७.२००६ अन्वये संबंधित माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले की, अर्जात नमुद केलेली आवश्यक माहिती व दस्ताऐवज मंडळ कार्यालयातून प्राप्त करुन श्री.आर.बी.पवार, यांना तात्काळ पुरविण्यात यावी. हया पत्राची प्रत अर्जदार श्री. आर.बी. पवार हयांना देखील पुरविण्यात आली. त्यामुळे संबंधित कार्यालयाकडून माहिती पुरवून घेणे सहज शक्य होते. परंतु त्याप्रमाणे योग्य पाठपुरावा न करता श्री.आर.बी.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केला. श्री.पवार यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त करुन

घेतली नाही. माहिती प्राप्त करण्यासाठी वेळोवेळी कार्यालयात उपस्थितीबाबत अवगत करण्यात आले आहे याबाबत उचित निर्णय व्हावा असा खुलासा केलेला आहे व त्या संदर्भामध्ये झालेल्या पत्र व्यवहाराच्या छायांकित प्रत दाखल केलेली आहे.

४. संपूर्ण प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व खुलाश्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता अर्जदार यांच्या संदर्भामध्ये चौकशी सुरु होती. चौकशी सुरु असतांना त्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या ८(८) प्रमाणे अपवाद आहे. परंतु चौकशी संपल्यानंतर त्या चौकशीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येवू शकतात व त्याप्रमाणे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यास चौकशी सुरु आहे असे कारण दिलेले होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिल्यानंतर संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली असती किंवा पाठपुरावा केला असता अश्या प्रकारचा खुलासा हा अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांनी माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमुद केले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व त्यामुळे अपीलकर्ता यांचेकडून प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचेकडून अपेक्षा करणे हे गैर आहे व त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यामुळे ते अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. परंतु सदर माहिती ही दोन दिवसापूर्वी उपलब्ध

... ४



करुन दिलेली आहे. याचा अर्थ आयोगाकडे चौकशी आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे त्यामुळेच ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी पाठपुरावा करुन माहिती उपलब्ध करुन घेतली असती तर त्यांना मिळाली असती असे मत अधिक्षक अभियंता यांचे असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले नसते तर त्यांना माहितीच उपलब्ध करुन दिलेली नसती हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये विलंब झालेला आहे हा निष्कर्ष वर काढण्यात आलेला आहे व त्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला असेल त्या अधिकाऱ्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजणे संयुक्तिक राहील व त्याप्रमाणे त्यांचे विरुध्द सुध्दा जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द सुध्दा कलम २०(२) प्रमाणे शास्ती लादणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशानंतर ज्या संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास जे जबाबदार असतील त्यांना सुध्दा कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी करावयाची असून त्यांनी अहवाल तीन महिन्यांचे आंत आयोगास सादर करावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अभियंता, जल संपदा विभाग, अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २४.४.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ६७-७०/२४.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३३/२००७.

श्री.रमेश भाऊराव पवार,
रा.संभाजीनगर, आदर्श कॉलनी,
ता. जि. अकोला- ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी.बी.बेहळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, अकोला.

श्री. भारत कडूकार,
जनमाहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तेल्हारा,
जि. अकोला. **.....**
**उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००६ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक ३.११.२००६) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळालेली असल्यामुळे दिनांक २४.४.२००८ रोजी ठेवण्यात आलेली अपीलाची सुनावणी रद्य करण्यात यावी व प्रकरण खारीज करण्यात यावे असे लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे गटविकास अधिकारी यांनी सुध्दा सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व अपील मागे घेतल्याचे असे लेखी दिलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २४.४.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ७१/२४.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३९/२००७.

श्री.राजेंद्रप्रसाद उपाध्याय,
रा.धानोरा रोड, लांजेडा,
ता. जि. गडचिरोली- ४४२ ६०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु ,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
परिक्षा नियंत्रक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. .....

**उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचेकरिता आज मा.राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती महोदयांच्या कार्यालय राजभवन, मुंबई येथे आयोजित बैठकीत हजर राहणे अति आवश्यक असल्यामुळे उपरोक्त दिवशी सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहण्याकरिता परवानगी मागितलेली असून सहाय्यक कुलसचिव यांना उपस्थित राहण्यासाठी प्राधिकृत केले आहे व त्याप्रमाणे सौ.विमल मेश्राम, सहाय्यक कुलसचिव हया हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. My daughter Ku.Rajani R. Upadhyay appeared in M.A. Pary II Geography Exam. from Vasantrao Naik Government Art & Social Science Institute, Nagpur in paper

... २



Geographical Thought & Urban Geography on २३.४.२००३ & २८.४.२००३ respectively. Her papers were scratched and not properly valued by the Valuer. She applied for revaluation on १.८.२००३

and the result is still awaited. १) Result of Revaluation and the name of Valuar & Revaluar with qualification and their medium of Instructions. २) Date of Revaluation and cause of delay in Result information. ३) The penalty imposed on I st Valuar for his/her misconduct to scratch the paper and not valued the answer sheets properly. ४) What steps were taken by the University authorities to save the carrer of Ku.Rajani R.Upadhyay student of M.A. II Geography, Roll No. १४१४६८ dated २३.४.२००३, University Registration No. H/४३३७०. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी प्रथम अपील प्र कुलगुरु यांच्याकडे दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२००७ रोजी दिलेला असून सदरच्या आदेशाची प्रत दिनांक ५.२.२००७ रोजी श्री. राजेंद्र उपाध्याय, धानोरा रोड, लांजेडा, गडचिरोली या पत्त्यावर पाठविलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये परिक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कार्यालयीन अभिलेखानुसार अर्जदाराला त्यांच्या माहिती अर्जात नमुद केल्यानुसार कार्यालयीन वस्तुस्थिती कार्यालयीन पत्र क्रमांक पुनर्म/९१९, दिनांक १५ जानेवारी, २००७ अन्वये कळविण्यात आलेली असल्यामुळे दाखल करण्यात आलेली सदर अपील खारीज करण्यात येत आहे असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे उत्तरपत्रिकेची प्रत आहे त्या पत्रात चNo Changeछ असा शेरा दिलेला आहे. त्यामुळे पुनर्मुल्यांकन करण्याच्या शिवायच त्यांना सदरची प्रत ही पाठवून दिलेली आहे व त्यामुळे पुनर्मुल्यांकन न करताच पाठवून दिलेली असल्यामुळे पुनर्मुल्यांकनाची फी कां घेतली

... ३



असा ही त्यांचा प्रश्न आहे. तसेच दिनांक १५.१.२००७ चे पत्र त्यांना जुलै मध्ये मिळाले असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच पुनर्मुल्यांकन निर्णय सुध्दा विद्यार्थीनीस पाठविलेला नाही अशा प्रकारे माहिती ही दिशाभूल करणारी दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्यावर सहाय्यक कुलसचिव यांनी खुलाशा करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे जवळ जी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत आहे ती परीक्षेचा निकाल लागल्यानंतर जी प्रत विद्यार्थीनीस उपलब्ध होते ती प्रत आहे त्या प्रतीच्या आधारावरच नंतर पुनर्मुल्यांकन अर्ज केला जातो व त्यानंतर सनियंत्रकाचा निर्णय व प्र कुलगुरु यांचा निर्णय असतो. तशा प्रकारची कार्यपध्दती ज्या आदेश नं. १३ मध्ये आहे त्या आदेशाची प्रत ही आयोगाचे निदर्शनास आणली. सदरच्या आदेशातील खुलासा हा अपीलकर्ता यांना सुध्दा वाचून दाखविण्यात आला व त्या कार्य पध्दतीप्रमाणे त्यांना दिनांक १५.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सहाय्यक कुलसचिव यांनी सांगितले वास्तविक त्यांच्या जवळ असलेल्या उत्तर पत्रिकेच्या प्रतिबद्यल त्यांना त्यांच्या मुलीनेंच माहिती द्यावयास पाहिजे होती. ती न दिल्यामुळेच त्यांनी माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे म्हटलेले दिसून येते. असे उत्तरवादी यांनी युक्तीवाद केला व आयोगाने सुध्दा संपूर्ण प्रक्रिया जाणून घेतल्यानंतर क्रमश: प्रत्येक कार्यवाहीचा विचार केला व त्यावरुन त्यांना दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती दिली आहे असे नाही. अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. पुनर्मुल्यांकनाचा निर्णय हा त्यांना कां पाठविण्यात आला नाही याबद्यल अर्थातच आदेश क्रमांक १३ मध्ये पुनर्मुल्यांकन अर्ज ज्या महाविद्यालयातून केला जातो त्याच महाविद्यालयामध्ये सदरचा निर्णय पाठविला जातो व त्या प्राचार्या कडून त्या विद्यार्थीनीने संकलीत करावयाचा असतो ही कार्यपध्दती आहे असे सहाय्यक

कुलसचिव यांनी सांगितले.  त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही दिशाभूल करणारी दिली नाही व खोटी दिलेली नाही. असा निष्कर्ष काढावा लागेल व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४



## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००६ च्या अनुषंगाने योग्य माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २५.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/ ७२-७४/२५.४.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४३/२००७.

श्री.राजु किसनराव वानखेडे,
रा. श्रीराम वार्ड, ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. श्रीधर एन. मालेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, बल्लारपूर,
जि. चंद्रपूर.

श्री. पु. गं. हरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
पंचायत समिती, बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. .....
**उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.४.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी मार्फत मा.मुख्याध्यापक, जनता हायस्कूल, (डेपो विभाग), बल्लारपूर जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. पंचायत समिती, बल्लारपूरच्या शिक्षण विभागाअंतर्गत तालुकास्तरीय विज्ञान २००६-०७ आयडियल इंग्लिश मिडीयम स्कूल, श्रमिक भवन, बल्लारपूर येथे दिनांक १०, ११ व १२ डिसेंबर, २००६ ला आयोजित करण्यात आली. त्याबाबत खालीलप्रमाणे माहिती पाहिजे. १) सर्वच स्पर्धेचे गुणदान तक्ते. (झेरॉक्स) (परिक्षकांचे स्वाक्षरीचे व नावासहीत). २) श्री.आनंद लोणारे, सहाय्यक शिक्षक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, बल्लारपूर व श्री.

... २

मनोहर माडेकर, सहाय्यक शिक्षक, नगरपरिषद गांधी विद्यालय, बल्लारपूर यांनी दिनांक ३ डिसेंबर, २००६ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर आपले शैक्षणिक साहित्य कां आणून ठेवले ? त्यांना सूट कशी देण्यांत आली ? ३) श्री.आनंद लोणारे व श्री.मनोहर माडेकर हे दोघे स्वत: स्पर्धेत सहभागी व आपआपल्या शाळेतील विद्यार्थी मार्गदर्शक (श्री.आनंद लोणारे) असतांना आपल्या विभागाने त्यांना परिक्षकांचे मागे फिरण्याचा आदेश किंवा लेखी नमुद असल्यास प्रत द्यावी. ४) श्री.आनंद लोणारे व श्री.मनोहर माडेकर यांची बाब (परिक्षकांचे मागे फिरण्याची) मी दिनांक १०.१२.२००६ ला श्री.रमेशजी मुलकलवार, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बल्लारपूर यांचे लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी त्या दोघांना हटकले कां नाही ? परिक्षक अज्ञान होते काय ? ५) श्री. आनंद लोणारे यांचे शैक्षणिक साहित्य परिक्षकांसमोर फेल झाले, उदा. (१) बॅटरी काम न करणे, $CO_2$ वायू पास न झाल्याने तोंडाने वायू नलिकेतून द्रावण घेवून परिक्षकासमोर थुंकणे आदी कृत्य केल्यानंतरही त्यांचा दुसरा क्रमांक का दिला ? कारण काय ? सदरची माहिती अपीलकर्ता यांनी ४८ तासामध्ये व्यक्तिश: मिळावी अशी विनंती केली होती. परंतु सदरची माहिती ४८ तासामध्ये न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.१२.२००६ रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय प्राधिकारी, पंचायत समिती, बल्लारपूर यांचेकडे सादर केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा करण्याकरिता कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे फीचा (खर्चाचा भरणा करुन) अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. माहिती उपलब्ध करुन दिलेले पत्र दिनांक २९.१२.२००७ चे आहे. परंतु सदरची माहिती त्यांना पुन्हा तात्काळ ४८ तासामध्ये उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ४८ तासात उपलब्ध करुन दिलेली नाही याबद्यलचा युक्तीवाद करतांना मागितलेल्या माहिती प्रमाणे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती व त्या प्रदर्शन व स्पर्धामध्ये ज्या काही त्रुटी नंतर झाल्या होत्या त्या त्रुटीमध्ये सुधारणा व्हावी व त्यांना ४८ तासात माहिती मागितली होती. परंतु त्यांना ती ४८ तासामध्ये माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम व द्वितीय अपील दाखल

... ३



केले आहे. अन्यथा त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे. त्यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे पुढील प्रदर्शनी व स्पर्धामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे व त्यामुळे आता सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अधिनियमाचे कलम ७(१) च्या परंतुकामध्ये "परंतु जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवीत व स्वातंत्र्य या संबंधातील असेल, तर विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांच्या आत ती देण्यात येईल" असे विहीत करण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरच्या माहितीचे संदर्भामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या जीवीत व स्वातंत्र्य यांचा संबंध दिसून येत नाही. एखाद्या स्पर्धेमध्ये जर त्रुटी असतील व त्या त्रुटीमध्ये सुधारणा करावयाच्या झाल्या तर त्या संदर्भात त्याच वेळी ती तक्रार करणे आवश्यक असते. परंतु अशा संदर्भात जीवीत व स्वातंत्र्य याचा आधार घेवून माहिती मागणे हे त्या तरतुदीशी सुसंगत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ४८ तासात माहिती उपलब्ध झाली नाही हे म्हणणे अधिनियमाचे तरतुदीशी सुसंगत नाही. असे असले तरी आता त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार नाही असे त्यांनी तोंडी सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे त्यांनी तोंडी सांगितल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २५.४.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**